अल्पावधीत लोकप्रिय ठरलेले
ग्रंथप्रसाराला वाहिलेले दर्जेदार मासिक

# मेहता मराठी ग्रंथजगत

मे २०११ । किंमत १५ रुपये















# T बुक क्लब २०

सभासद फी ५०रु. आजच सभासद व्हा! नोंदणी सुरू

**टी बुक क्लब २० मधून प्रकाशित होणारी पुस्तके**



## स्क्रीम फॉर मी

**मूळ लेखक** **अनुवाद**

करेन रोझ अनु. दिपक कुळकर्णी



## अल्टिमेटम

**मूळ लेखक** **अनुवाद**

मॅथ्यू ग्लास अनु. सुदर्शन आठवले



## अ प्रिझनर ऑफ बर्थ

**मूळ लेखक** **अनुवाद**

जेफ्री आर्चर अनु. लीना सोहोनी




## द लास्ट ज्यूरर

**मूळ लेखक** **अनुवाद**

जॉन ग्रिशॅम अनु. विभाकर शेंडे




## ब्लड मनी

**मूळ लेखक** **अनुवाद**

क्रिस कॉलेट अनु. वैशाली रानडे




## क्रिटिकल

**मूळ लेखक** **अनुवाद**

रॉबिन कुक अनु. डॉ. प्रमोद जोगळेकर

◆ मे २०११
◆ वर्ष अकरावे
◆ अंक पाचवा

# मेहता मराठी ग्रंथजगत

— *अनुक्रमणिका* —

| | |
|---|---|
| **संपादकीय** | ४ |
| **साहित्यवार्ता** | १४ |
| **पुस्तक परिचय** | |
| **भोकरवाडीच्या गोष्टी** | |
| : द. मा. मिरासदार | ५६ |
| **नथिंग टू लूज** | |
| : अनु. उदय कुलकर्णी | ६२ |
| **ए रशियन डायरी** | |
| : अनु. शोभना शिकनीस | ७० |
| **उद्ध्वस्त** : उमेश कदम | ७८ |
| **विमुक्ती** : दिपा महानवर | ८२ |
| **पुरस्कार** | ८६ |
| **वाचकांचा प्रतिसाद** | ९९ |
| **श्रद्धांजली** | १०१ |
| **बालनगरी** | १०४ |

संपादक :
सुनील मेहता

कार्यकारी संपादक :
शंकर सारडा

संपादन साहाय्य :
वंदना घाटगे

अंकाची किंमत १५ रु.

वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी.

प्रसिद्धी
दरमहा ११ तारखेस

मांडणी-अक्षरजुळणी
***मेहता पब्लिशिंग हाऊस***

संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर, पुणे-४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२
Extension **(ग्रंथजगत विभाग) - २२७/२४३**
**Email -** info@mehtapublishinghouse.com
**Website - www.mehtapublishinghouse.com**

**वार्षिक वर्गणी १५० रु. तीन वर्षांची ३५०रु. पाच वर्षांची ५००रु.**
**३ किंवा ५ वर्षांसाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट !**

*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*

# संपादकीय

## नव्या वाचनसंस्कृतीची नांदी

नवी दिल्ली येथे काही दिवसांपूर्वी राष्ट्रीय ग्रंथप्रसार प्रोत्साहन धोरण ठरविण्याच्या दृष्टीने एक गोलमेज बैठक केंद्रीय मानवबळ विकास मंत्रालयाच्या पुढाकाराने घेण्यात आली. या खात्याचे मंत्री कपिल सिब्बल यांनी या बैठकीत अध्यक्ष म्हणून अनेक गोष्टी सुचवल्या. उत्तम लेखन व्हावे आणि देशभर वाचकांना पुस्तके सहजपणे उपलब्ध व्हावी या उद्देशाने इंडियन सोसायटी ऑफ ऑथर्स या संस्थेने तयार केलेल्या राष्ट्रीय पुस्तक धोरणाचा त्यांनी पुरस्कार केला. तामीळनाडूमध्ये खाजगी उद्योग क्षेत्राच्या सहकार्याने 'आदर्श ग्रंथालय आंदोलना'ने वाचकांची ग्रंथवाचनाची अभिरुची वाढवण्यासाठी जे विविध उपक्रम कल्पकतेने राबवले त्यांची दखल घेऊन सर्व राज्यांनी त्याचे अनुकरण करावे अशी सूचनाही ना. सिब्बल यांनी केली.

या गोलमेज बैठकीत ग्रंथसंस्कृतीच्या विकासाच्या दृष्टीने अनेक प्रस्तावांचा ऊहापोह करण्यात आला आणि काही धोरणात्मक निर्णय घेण्यात आले.

देशव्यापी ग्रंथालय चळवळ मजबूत करणे, मुलांसाठी आकर्षक वाचनीय पुस्तकांची निर्मिती व्हावी म्हणून बालसाहित्याचे एक राष्ट्रीय केंद्र स्थापन करणे, दृष्टिदोष असणाऱ्यांसाठी आणि शारीरिकदृष्ट्या कमतरता असणाऱ्यांसाठी ब्रेल लिपीतील आणि सोयीस्कर स्वरूपातील पुस्तकांची व्यवस्था करणे, प्रकाशनक्षेत्रात प्रशिक्षित व्यक्तींची मोठ्या प्रमाणावर गरज असल्याने प्रकाशनाशी संबंधित लहानमोठे अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी एखादी संस्था काढणे, ग्रंथ वाचकांच्या आवडीनिवडी आणि गरजा यांचे राष्ट्रव्यापी सर्वेक्षण करणे वगैरे गोष्टींचा या धोरणात्मक निवेदनात समावेश आहे. समाजाच्या विविध घटकांना ज्ञानरंजनाच्या विविध साधनांचा सहजपणे लाभ घेता यावा या दृष्टीने या सर्व उपक्रमांची गरज आहे हे वेगळे सांगण्याची गरज नाही.

प्रकाशनक्षेत्राला इंडस्ट्रीचा दर्जा देणे, भारतीय पुस्तके व लेखक यांचा परदेशात प्रसार करणे, कागदाचे प्रमाणीकरण करणे, पुस्तकांना टपालदरात सवलत देणे वगैरे सूचनाही या बैठकीत विचारात घेण्यात आल्या. ग्रंथालयांची

संख्या आणि उपक्रमशीलता वाढावी या करता जे प्रयत्न अपेक्षित आहेत त्यात 'ई बुक्स' ना अनुकूल मानसिकता तयार करण्यावरही या बैठकीत चर्चाविमर्श झाला.

ई-बुक्समुळे ग्रंथालयांचे स्वरूपच पूर्णतया बदलून जाणार आहे. ग्रंथालय म्हटले की पुस्तकांनी भरलेली कपाटे असे दृश्य समोर उभे राहते. ग्रंथालयात जितकी जास्त पुस्तके तितकी जास्त कपाटे आणि जागा यांची सोय करावी लागते. मोठमोठ्या इमारती त्यासाठी बांधाव्या लागतात. परंतु ई-बुक्सचा प्रसार आता होऊ लागला आहे आणि ई-बुक्सना मोठ्या जागेची किंवा कपाटांची गरज नसल्याने एखाद्या छोट्याशा खोलीतूनही हजारो सदस्यांना पुस्तके पुरवता येतील. ग्रंथालयाच्या सदस्याकडे ई-रीडर असेल, तर त्याला हवी असणारी पुस्तके त्यावर डाऊनलोड करून वाचायला मिळू शकतील. ॲमेझॉनचे किंडल, बार्न्स अँड नोबलचे नूक, सोनी रीडर वगैरे वाचनयंत्रे दीडशे ते पाचशे डॉलर्सना उपलब्ध आहेत. आयपॅड, आयपॉड, आय फोन, संगणक यावरही ई-बुक्स वाचता येतील. त्यापेक्षाही सोयीस्कर म्हणजे स्मार्टफोन किंवा मोबाईल. मोबाईलचा प्रसार गेल्या आठदहा वर्षात प्रचंड वेगाने होत राहिलेला आहे. आज मितीला भारतात ६०-६५ कोटी मोबाईल आहेत, म्हणजे दर दोन व्यक्तींपैकी एका व्यक्तीकडे मोबाइल आहे. जगात २०१० अखेर १६० कोटी मोबाईल आहेत. मोबाइल कंपन्या अब्जावधी डॉलर्स गुंतवत आहेत. आज नवीन मोबाईल मॉडेल बाजारात आणताना उत्पादकांना गेम्स, व्हिडिओ, म्युझिक याप्रमाणे ई-बुक्सचाही विचार करावा लागत आहे.

७ फेब्रुवारी २०११ रोजी स्प्रिंटने नवा स्मार्टफोन बाजारात आणला. तो समृद्ध वाचनानुभव देणारा आहे. त्याला साडेतीन इंची दोन स्क्रीन आहेत. त्या दोन स्क्रीनमुळे पुस्तक उलगडून आपण वाचतोय असा फील येतो. या फोनवर गोस्पोकन ही जगातील आजची सर्वांत मोठी ई-बुक्स प्रोव्हाइड करणारी कंपनी एक बुकशॉप प्रीलोड करील. या कंपनीची ऑरेंजशीही भागीदारी आहे. वाचनाची क्रिया सुलभ आणि जलद व्हावी यासाठी ड्युअल फोल्ड आऊट स्क्रीनप्रमाणेच स्प्रिंटमध्ये वेगवान प्रोसेसर्स आणि इन-बिल्ट इंकची व्यवस्था आहे. गोस्पोकनचा मुख्य कार्यकारी अधिकारी टोनी लिंच याने म्हटले आहे की व्होडाफोन, टीमोबाइल वगैरे मोबाइल कंपन्यांनाही ई-बुक प्लॅटफॉर्म हवा आहे. 'किंडल'सारख्या स्वतंत्र वाचनयंत्रापेक्षा टॅब्लेटस आणि मोबाईलवर ई-बुक्स वाचणे अधिक सोयीचे ठरेल आणि वाचकांची संख्या वाढत जाईल अशी त्यांची खात्री आहे. पुढच्या काळात मोबाइल संगणकाला मागे टाकतील. इंटरनेटवर जाण्यासाठी डेस्कटॉप संगणकाचा वापर आजवर होत आला आहे, आता मोबाइलचा वापर इंटरनेटवर जाण्यासाठी

अधिक होत आहे आणि २०१४ मध्ये ३०० कोटी लोक स्मार्टफोनद्वारे इंटरनेटवर जातील असे भाकीत मॉर्गन स्टॅनले कंपनीच्या मेरी मीकर या तज्ज्ञ विश्लेषिकेने केले आहे. २०१०च्या शेवटच्या तिमाहीत अँड्राइड बेड स्मार्टफोनची विक्री ३ कोटी ३ लाख एवढी झाली आणि वर्षात ३० कोटी स्मार्टफोन विकले गेले. व्होडाफोन आज युरोपमध्ये मोबाइलवर प्रीपेड म्युझिक पुरवण्यात आघाडीवर आहे. आज लक्षावधी गाणी विकणारी ही कंपनी लक्षावधी पुस्तके विकण्याची जिद्द बाळगून आहे. मोबाइलवर ई-बुक्सची विक्री करणेही सोपे जाणार आहे. त्या पुस्तकाची किंमत जमा रकमेतून एका क्लिकसरशी वळती करून घेता येईल. ग्राहकांना नव्या पुस्तकांची माहितीही एसएमएसवरून हवी तेव्हा देता येईल.

मोबाईलवर पुस्तक वाचण्याची सोय झाली तर ग्रंथालयांना कागदावर छापलेल्या पुस्तकांची कपाटे ठेवण्याची गरज उरणार नाही. वाचकाला पुस्तक घेण्यासाठी ग्रंथालयात जाण्याची गरज उरणार नाही. मोबाईलवरून मेसेज पाठवून हवे ते पुस्तक ग्रंथालयाकडून किंवा ई बुक प्रोव्हाइडकडून डाऊनलोड करून घेता येईल. त्याचे पैसे प्रीपेड रकमेतून वळते करून घेतले जातील किंवा ई-बँकिंगद्वारेही देता येतील. ग्रंथालयात मोठी कपाटे ठेवावी लागणार नाहीत. वाचकांची वर्दळ राहणार नाही.

ग्रंथसंस्कृती, वाचनसंस्कृती नवे रूप धारण करीत आहे आणि नव्या तंत्रज्ञानामुळे ग्रंथालये, विद्यालये, प्रकाशन क्षेत्र, वितरण केंद्रे, ग्रंथवाहतूक, पोस्ट वा कुरियर सेवा या सर्वांनाच नवी जुळणी करावी लागणार आहे.

मोबाईल हे साधन या नव्या क्रांतीच्या केंद्रस्थानी असणार आहे.

मानवबळ विकास मंत्रालयाने ग्रंथसंस्कृतीबाबत नवे धोरण ठरवताना सध्याची छापील पुस्तकांशी निगडित व्यवस्था आणि भावी काळातील मोबाईल केंद्रित ई-बुक संबंधित प्रणाली या दोन्ही पर्यायांचा उचित विचार करायला हवा. ॲपलने ई-बुक्स १.२ या प्रणालीद्वारे चित्रमय सजावट आणि मजकूर यांचे मिश्रण करण्यात यश मिळवले आहे. त्यामुळे रंगीत, चित्रमय ई-बुक्सही विकसित करणे शक्य होईल. छापील पुस्तकामुळे मिळणारा वाचनानुभव आणि ई-बुकद्वारे मिळणारा अनुभव यात त्यामुळे अंतर जाणवणार नाही. भारतात इंटरनेटचा वापर व प्रसार तुलनेने कमी असल्याने ई-बुक्स बाबत आस्तेकदम मानसिकता होती, परंतु स्मार्टफोनमुळे ई-बुक्सचे तंत्र आता सहजपणे व स्वस्तात सर्वत्र उपलब्ध होत असल्याने पारंपरिक प्रकाशनक्षेत्रातही बदल घडवण्याची निकड जाणवणार आहे. मुद्रित पुस्तकांचे प्रकाशन अनंतकाळापर्यंत चालू राहील अशा आत्मसंतोषाने भागणार नाही.



## दिवाळी अंकासाठी विषय सुचवा-बक्षीस मिळवा

रसिक वाचक व बालमित्रांनो,

**'मेहता मराठी ग्रंथजगत'** हे ग्रंथविश्वातील सर्वांगीण माहिती देणारे मासिक महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यात व महाराष्ट्राबाहेरील मराठी मंडळांपर्यंत नियमितपणे जात आहे.

यावर्षीच्या **'मेहता मराठी ग्रंथजगत'** च्या वैशिष्ट्यपूर्ण दिवाळी अंकासाठी विषय सुचवा. एका यशस्वी स्पर्धकाला १०००रुपयांची पुस्तके बक्षीस देण्यात येतील.

आपले कार्ड १० जून २०११ पर्यंत मिळायला हवे

**आमचा पत्ता**

मेहता पब्लिशिंग हाऊस,<br>
संपादक, मेहता मराठी ग्रंथजगत<br>
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३०.<br>
फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२ (२२७/२४३)

## सभासदांना सूचना

आमच्या प्रिय वाचकांनी, तसेच सभासदांनी वर्गणीचे नूतनीकरण करावे.<br>
वर्गणीत वाढ झालेली आहे,<br>
हे लक्षात ठेवून कृपया वर्गणीची पूर्ण रक्कम पाठवावी.<br>
पुस्तक खरेदीस येताना मेंबरकार्ड जरूर आणावे,<br>
ही नम्र विनंती.

**कोल्हापूर येथे वर्गणी भरण्यासाठी व पुस्तके मागविण्यासाठी खालील पत्त्यावर संपर्क साधा**

## मेहता बुक सेलर्स, कोल्हापूर

३२२ भाऊसिंगजी रोड, भवानी मंडपाजवळ, कोल्हापूर ४१६ ०१२.<br>
वेळ : सकाळी ९ ते रात्री ८ (शनिवारी बंद)<br>
फोन : (०२३१)२५४२९०१ टेलिफॅक्स : (०२३१)२५४१८८१.<br>
Email : mehtabooks@eth.net

**आगामी**




# एका परिसाची कथा

**मिलिंद जोशी**

**२००रु. पोस्टेज २५रु.**

संध्याकाळ होताच सतीश बागेत आला.
रचना आधीपासूनच तिथे हजर होती.
तिच्या टपोऱ्या डोळ्यांमधून प्रेम ओसंडून वाहत होतं.
सतीशच्या डोक्यात थैमान घालणारं
विचारांचं वादळ दूर पळालं.
रचना दृष्टीस पडताच तिच्याबद्दलच्या जिव्हाळ्यानं त्याचं
मन उचंबळून आलं.
त्याला जाणवली, तिच्यातल्या ममत्वानं आणि कणखर
स्त्रीत्वानं त्याला मिळवून दिलेली आध्यात्मिक शांतता.
त्याला जाणवले,
तिच्या मनस्रोताचे निर्मळ आणि पवित्र झरे.

आगामी




# ग्युर्नसे वाचक मंडळ

**मेरी ॲन शाफर**
**ॲनी बॅरोज**

अनु. **मैत्रेयी जोशी**

**२५०रु. पोस्टेज २५रु.**

ग्युर्नसे - इंग्लिश चॅनल आयलंड वरील एक चिमुकले बेट.
जानेवारी १९४६, दुसरं महायुद्ध नुकतंच संपलंय. ग्युर्नसेबेटालाही युद्धाच्या झळा बसल्यायत. लंडनही या युद्धाच्या छायेतून वर येत, पुन्हा 'जीवनाला' सामोरं जातंय.
'इझ्झी गोज टू वॉर' या पुस्तकाने प्रकाशझोतात आलेली ज्युलिएट नव्या पुस्तकासाठी विषय शोधतीये. चार्लस् लँबचा निस्सीम भक्त डॉसी एका प्रतीवर ज्यूलिएटचं नाव पाहून तिला पत्र धाडतो आणि पत्रांचा सिलसिला सुरू होतो. 'ग्युर्नसे लिटररी ॲण्ड पोटॅटो पील- पाय सोसायटी' असे मजेदार नामकरण झालेल्या या वाचक मंडळातले अन्य सभासदही ज्यूलिएटचे 'पत्रमित्र' बनतात. त्यांच्या पत्रांतून ते अनोखे बेट, त्यांच्या आवडीनिवडी, त्यांची आवडती पुस्तकं आणि 'नाझी अंमला'तून स्वतंत्र झालेला, मोकळा श्वास घेणारा समाज असा विशाल पट उलगडत जातो. विलक्षण भावबंधांनी हे सर्वजण तिच्याशी बांधले जातात. मग ज्यूलिएट ग्युर्नसेच्या जलप्रवासाला निघते आणि याच बेटावर तिच्या आयुष्याला एक निर्णायक कलाटणी मिळते. कधी करुणरसात भिजलेली, तर कधी सौम्य विनोदाची पखरण असलेली ही स्नेहार्द्र पत्रे म्हणजे शब्दांचा आनंदोत्सव आहे.
हा जल्लोष रसिक वाचकांनाही तितकाच भावेल यात शंका नाही.

## आगामी




# द प्राइस ऑफ लव्ह

**निकोला टी. जेम्स**
अनु. **मीना टाकळकर**

**२२०रु.** पोस्टेज २५रु.

वडिलांनी केलेला हिंसाचार, त्यातच शाळेत गुंड मुलांनी धाकदपटशा दाखवून केलेला लैंगिक अत्याचार.

अशा अवस्थेतल्या निकोलाकडे तिच्या वडीलधाऱ्यांनी साफ दुर्लक्ष केले. तिची आत्मप्रतिष्ठा रसातळाला गेली.

त्यानंतर एका अनोळखी माणसाच्या छळाची ती शिकार झाली. त्याने तिचे आयुष्य जिवंत नरक बनवले.

तिचा नवरा नील. देखणा आणि भुरळ पाडणारा. पण या नवऱ्यानेही तिला भयंकर यातना दिल्या.

आपले तिच्यावर प्रेम आहे म्हणून आपण हे सारे करीत आहोत, असेही तो उलट आग्रहपूर्वक सांगत राहिला.

भयानक यातना भोगूनही आपले स्वत्व

आणि आंतरिक शक्ती कायम ठेवणाऱ्या एका स्त्रीची

अंत:करण पिळवटून टाकणारी कहाणी.

**आगामी**

# फिफ्टी इयर्स ऑफ सायलेन्स

**जॅन रफ्–ओ'हर्न**

अनु. **नीला चांदोरकर**

**२७०रु.** पोस्टेज २५रु.




मनातल्या खोल कप्प्यात दडवून ठेवलेली गोष्ट आपल्या मुलींना, नातवंडांना कशी सांगायची? कारण ही गोष्ट साधीसुधी नव्हतीच.

ती अत्यंत लज्जास्पद होती. तिची तीव्रता पन्नास वर्षांनंतरही कमी होत नाही.

थोडीथोडकी नव्हे, पन्नास वर्षं जॅननं कोंडमारा सहन केला. ''मग ठरवलं, ते सगळं आपण लिहून काढायचं, कागदावर उतरवायचं.''

१९९२ साली या कोंडमाऱ्यांचा उद्रेक झाला. ऐन तारुण्यात जॅनला जो शारीरिक आणि मानसिक त्रास सोसावा लागला त्याचं हृदयद्रावक वर्णन या पुस्तकात वाचायला मिळतं.

मृत्यूची टांगती तलवार तिच्या डोक्यावर होती. शिवाय घरादाराची अब्रू वेशीवर टांगली जाईल ही भीतीही होती.

लैंगिक अत्याचारांमुळे जे दु:ख तिला सोसावं लागलं त्याची ही कहाणी.

आगामी




# दिवा

**प्रमोदिनी वडके-कवळे**

**२७०रु.** पोस्टेज २५रु.

गेल्या पन्नास-साठ वर्षांत भारतीय स्त्रियांचे मनोविश्व बदलले पण त्यांच्याभोवतीचे वातावरण मात्र बदलले नाही. समाजाच्या अपेक्षाही बदलल्या नाहीत.

जगण्याची आधुनिक शैली स्वीकारताना स्त्रियांनी पारंपरिक बाज सांभाळावा आणि मध्यममार्गी जगण्याच्या चौकटीत राहूनच जगाचा वेध घ्यावा, अशी समाजाची अपेक्षा असते.

अशा तळ्यातमळ्यात जगणाऱ्या स्त्रियांचा आणि त्यांनी आपल्या परीने सोडवलेल्या काही सामाजिक गणितांचा वेध.

सहज सुंदर भाषा आणि ओळखीचं वातावरण, यामुळे या कथांतली पात्रं मनाचा अलगद ठाव घेतात.

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

**नवे कोरे**

# थ्री कप्स ऑफ टी

**ग्रेग मॉर्टेनसन**
**डेव्हिड ऑलिव्हर रेलीन**

अनु. सिंधु जोशी

**३५०रु.** पोस्टेज ३०रु.




‘कोणाही व्यक्तीबरोबर काम करायचे असेल तर आम्ही तिच्याबरोबर चहाचे तीन कप पितो.

चहाचा पहिला कप घेताना तुम्ही आमच्यासाठी अनोळखी व्यक्ती असता. चहाच्या दुसऱ्या कपाबरोबर आमचे तुमच्याशी मित्रत्वाचे नाते जुळते.

तिसऱ्या कपाबरोबर आम्ही तुमचे कुटुंबातील एक व्यक्ती म्हणून स्वागत करतो आणि तुमच्यासाठी सर्वस्वही पणाला लावतो. मागे पुढे बघत नाही.’ – हाजी अली.

१९९३ साली के-२ शिखरावरील मोहिमेत अयशस्वी ठरलेला गिर्यारोहक ग्रेग मॉर्टेनसन, वाट चुकून पाकिस्तानातील काराकोरम पर्वतराजीतील एका खेड्यात पोहोचतो. खेड्यातील लोकांच्या दयाळूपणाने भारावलेला मॉर्टेनसन परत येऊन मुलांसाठी शाळा बांधण्याचे वचन देतो. त्या वचनाची पूर्तताही करतो.

तालिबानच्या दहशतवादामुळे पाकिस्तान आणि अफगाणिस्तान या दोन देशातील वातावरण तंग आणि धोकादायक बनले तरी पर्वतराजींच्या कुशीत वसलेल्या दुर्गम खेड्यात मॉर्टेनसन एकच नाही, तर पंचावन्न शाळा बांधतो.

**खिळवून टाकणारे साहस आणि मानवतावादी चैतन्य यांचे प्रत्ययकारी चित्र.**

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

# साहित्यवार्ता



*** विश्वसाहित्य संमेलन**

पहिले विश्वसाहित्य संमेलन डोंबिवली येथे २७ फेब्रुवारी रोजी झाले. त्याच्या अध्यक्षपदी डॉ. मधुसूदन घाणेकर होते. आपल्या भाषणात ते म्हणाले, ''प्रत्येक धर्म हा सर्वांवर प्रेम करावे असेच सांगतो. कुठल्याच धर्मात, पंथात अथवा इझममध्ये संकुचित वृत्ती नसते. अजूनही काही देशांमध्ये वर्णभेद आहे. राष्ट्राराष्ट्रातील अराजकता, अस्थिरता, दहशतवाद, गुन्हेगारी, अत्याचार, गुलामगिरी, हुकुमशाही, अन्याय, जुलूम, दारिद्र्य यासारख्या विश्वशांतीला मारक ठरणाऱ्या गोष्टी थोपवण्याच्या दृष्टीने साहित्यिकांनी आपल्या शब्दसामर्थ्याच्या आधारे नैतिक योगदान देण्याची गरज आहे.''

गुन्हा का घडतो? चूक का होते? अत्याचार का होतात? बलात्कार का होतो? शोषण का केले जाते? गुलामीचे षड्यंत्र का रचले जाते? काळाबाजार का होतो? अन्याय का केला जातो? जुलूम का होतो? व्यसनाधीनता का वाढते? कुटुंब का उद्‌ध्वस्त होते? घटस्फोट का होतो? बंड का पुकारले जाते? युद्धे का होतात? अस्थिरता का वाढते? शांतता का भंग पावते? भ्रष्टाचार का घडतो? दहशतवाद का घडतो?

ह्या प्रत्येक प्रश्नाचे मूळ कारण जर शोधले तर ते एकच आहे. माणसाचे मन! जेव्हा मनावरचा ताबा सुटतो तेव्हाच सर्व काही बिघडायला सुरुवात होते.

या विश्वातील प्रत्येकानेच नियमितपणे चिंतन, मनन केले, आत्मशोध चालू ठेवला तर प्रत्येकाचे मन काबूत राहील. इंद्रियांवर विजय मिळविणे, षड्रिपूंना स्वत:च्या काबूत ठेवणे ह्या सर्व गोष्टी अध्यात्मात आहेतच. तसे हे सर्वांनाच कळते पण वळत नाही म्हणून प्रश्न निर्माण होतात.

चांगले म्हणजे काय?, वाईट म्हणजे काय? पाप म्हणजे काय? पुण्य म्हणजे काय? सुख म्हणजे काय? दु:ख म्हणजे काय?

या सर्व गोष्टी प्रत्येकजणच ठरवत असतो. या गोष्टी ठरवताना, जीवन यशस्वी करण्यासाठी पुढे पाऊल टाकताना 'माझा मनावरचा ताबा सुटणार नाही एवढीच खबरदारी घ्यायची. यासाठी एकमेव आधार म्हणजे अध्यात्म! परंतु एक निश्चितच

आहे की अध्यात्म समजायला सोपे पण आचरणास अत्यंत अवघड आहे. 'पलायनवाद' हा पर्याय नाही. याविषयी प्रबोधन घडवणारी अनेक माध्यमे आहेत. ग्रंथांबरोबरच गुरुजन, कीर्तनकार, प्रवचनकार, कथाकार यांपासून ते पार नाट्य-चित्रपटांपर्यंत सांस्कृतिक माध्यमे कार्यरत आहेत.'

योग, विपश्यना, एसएसवाय, हॅपी थॉट्स, आर्ट ऑफ लिव्हिंग, ब्रह्मविद्या, हास्ययोग, ध्यान, ब्रह्मध्यान आदि अनेक माध्यमांचा प्रसार अत्यंत समर्पक-आश्वासकरीत्या गतिमान होत आहे. मात्र या विश्वातील एकूण लोकसंख्येचा विचार करता श्री श्री रविशंकर, वामनराव पै, पांडुरंगशास्त्री आठवले, रामदेव महाराज यांसारखी माणसे प्रत्येक देशात जेव्हा निर्माण होतील तेव्हाच ह्या विश्वाचा कायापालट होऊ शकेल.

सदसद्‌विवेक म्हणजे काय? सन्मार्ग म्हणजे काय? अस्तित्वाचा नेमका अर्थ काय? जगण्याचा नेमका अर्थ काय? एकूण जगण्याविषयीचेच आत्मज्ञान आपल्या लेखणीतून समाजाला देऊन त्यातून समाज प्रबोधन करण्याचे सामर्थ्य हे प्रतिभासंपन्न साहित्यिकामध्ये असते. समाजामध्ये परिवर्तन घडवण्याची हुकमी क्षमता ही प्रतिभावंतांमध्येच असते. परंतु खऱ्या अर्थाने जर समाजात आदर्शवादी परिवर्तन घडवायचे असेल तर साहित्यिकाने 'आधी केले, मग सांगितले' हेच धोरण अंगिकारले पाहिजे. नुसती प्रतिभा असून उपयोगी नाही. साहित्यिकाचा स्वत:च्याच मनावर ताबा नसेल तर तो समाजापुढे काय आदर्श ठेवणार?

### * नॅशनल ट्रॅन्सलेशन मिशन

प्रमुख भारतीय प्रादेशिक भाषांमध्ये उच्च शिक्षणासाठी स्टडी मटेरियल उपलब्ध करून द्यावे अशी कल्पना पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी मांडली. त्यानुसार म्हैसूरच्या सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ इंडियन लँग्वेजेस अंतर्गत 'नॅशनल ट्रान्सलेशन मिशन'ची स्थापना करण्यात आली. उच्च शिक्षणाच्या विविध चौदा विद्याशाखांमध्ये उपलब्ध असलेले ज्ञान भारतीय भाषांमध्ये आणण्याचे काम हे मिशन करणार आहे.

प्रत्येक भाषेसाठी एक समिती नेमण्यात आली आहे. मराठी समितीमध्ये डॉ. प्रा. पंडित विद्यासागर, डॉ. धन्वंतरी हर्डीकर, अनुराधा मोहनी, अविनाश पंडित, के. एस. राज्यश्री, अशोक पाध्ये, निरंजन घाटे आदींचा समावेश आहे.

मेडिकल, इंजिनीअरिंग, सायन्स, कॉमर्स आणि आर्ट्स अंतर्गत १४ विद्याशाखांमधील सुमारे ७५ विषयांवर इंग्रजीसह इतर भाषांमध्ये उपलब्ध असलेले साहित्य भाषांतरित केले जाणार आहे.

ललित साहित्याचे भाषांतर आणि शैक्षणिक साहित्याचे भाषांतर यामध्ये फरक आहे. शैक्षणिक साहित्याचे भाषांतर करण्यासाठी विशिष्ट कौशल्ये; तसेच संबंधित विषयाचे पूर्वज्ञान असलेल्या व्यक्तींची निवड करण्यात येईल. भाषांतरासाठी कोणती पुस्तके निवडायची यासाठी सर्व्हे करून विद्यापीठातील अभ्यासक्रमाचा डाटाबेस

तयार करून एक शॉर्टलिस्ट करून या पुस्तकांचे कॉपीराईट मिळवून भाषांतरे मिशनतर्फे किंवा मूळ प्रकाशकांतर्फे प्रसिद्ध केली जातील.

*** दहावीला विज्ञानाचे एकच पुस्तक**

दहावीच्या जुन्या अभ्यासक्रमातील विज्ञान तंत्रज्ञान एक व दोन अशा दोन पुस्तकांऐवजी आता एकच क्रमिक पुस्तक असणार आहे. पुस्तकाची संख्या कमी करणे, विज्ञानाचा अभ्यास घोकंपट्टीच्या पलीकडे नेणे यासाठी नवा अभ्यासक्रम लागू करण्यात येणार आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या (एनसीईआरटी) आराखड्यानुसार तयार करण्यात आलेली दहावीची गणित-भूमिती व शास्त्र विषयाची पुस्तके नेमण्यात येतील. मराठी व इंग्रजी या दोन्ही माध्यमाची पुस्तके बाजारात आली आहेत.

राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्याचा स्वीकार केल्यानंतर राज्यात नववी ते बारावीसाठी फक्त गणित व शास्त्र या विषयांचा अभ्यासक्रम या आराखड्यानुसार लागू करण्यात आला आहे. त्यानुसार नववीचा अभ्यासक्रम बदलला आहे. येत्या शैक्षणिक वर्षात (२०११-१२) दहावी व अकरावीचे अभ्यासक्रम बदलणार आहेत. पुढील वर्षी (२०१२-१३) बारावीचा अभ्यासक्रम बदलणार आहे.

राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या गणित अभ्यासक मंडळाच्या सदस्यांनी सांगितले की, ''गणित-भूमितीच्या जुन्या अभ्यासक्रमाच्या तुलनेत काठिण्य पातळी काही प्रमाणात वाढली आहे. अकरावी व बारावीला असलेल्या काही घटकांची तोंडओळख दहावीत होणार असल्याने फायदेशीर ठरणार आहे. राज्य अभ्यासक्रम आराखड्यातील ज्ञानरचनावाद स्वीकारण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना विचार करायला लावणाऱ्या समीकरणांबरोबरच शिक्षकांनाही अध्यापन कसे करावे, याविषयी मार्गदर्शन केले आहे.''

पुस्तकात पाहून व्याख्या पाठ करण्याऐवजी कृतीवर भर देऊन विज्ञानाचा जीवनाशी निकटचा संबंध जोडताना सर्जनशीलता व नवनिर्मितीला चालना देण्याचा प्रयत्न केला जाईल.

*** ज्येष्ठांसाठी इंटरनेट**

तरुणाईचे आणि इंटरनेटचे सूर चांगलेच जुळले आहेत. फेसबुक, ऑर्कुट अशा नेटवर्किंग साईट्स त्यांचे पक्के दोस्त बनले आहेत. या नेटवर्किंग साईट्सनी आता आजी-आजोबांबरोबर हातमिळवणी केली आहे. त्यामुळे इंटरनेटची भाषा आता केवळ तरुणाईलाच नव्हे, तर ज्येष्ठ नागरिकांनाही अवगत होत आहे.

वास्तविक, इंटरनेट म्हटल्यावर बऱ्याच ज्येष्ठ नागरिकांच्या अंगावर काटा येतो. ती खूप गुंतागुंतीची प्रक्रिया आहे, असे वाटून याच्या फंदात पडायला नको, असाही विचार मनात येतो. प्रत्यक्षात, इंटरनेट वापरणे ही बाब अवघड नाही. थोडे

प्रयत्न केले, तर ज्येष्ठ नागरिकांनाही तंत्रज्ञानाशी मैत्री करता येईल. मोकळ्या वेळेत इंटरनेटच्या माध्यमातून अनेक लोकांशी गप्पा मारून आयुष्याला अर्थ प्राप्त करून देता येईल.

इंटरनेटशी दोस्ती केलेल्या समवयस्कांच्या मदतीने आपल्यालाही 'इंटरनेट फ्रेंडली' होता येईल. दोन पिढ्यांमधील अंतर कमी होऊ शकतो. आजकाल घरातील लहान मुले मैदानी खेळ खेळण्याऐवजी संगणकावर गेम खेळण्यात रमतात. अशा वेळी आजी-आजोबांना त्यांच्याबरोबर व्हिडिओ गेम्सचा आनंद लुटता येतो.

परदेशात मुले, नातवंडे असतील तर त्यांच्याशी इंटरनेटमुळे संपर्कात राहता येईल. ज्येष्ठ नागरिकांच्या कट्ट्यांवर आगळेवेगळे विषय हाताळले जात असल्याने, तरुणाईही त्यात सहभागी होऊ शकते. संगणक कसा वापरावा, फेसबुक, ऑर्कुट अशा नेटवर्किंग साईट्सवर अकाऊंट कसे उघडावे, याची ज्येष्ठ नागरिकांना माहिती देणारी verdurez.com, seniorindian.com, silverpeers.com, suddenlysenior.com ही संकेतस्थळे महत्त्वाची आहेत. काही की-बोर्डसना तर इंटरनेटवर जाण्यासाठी कायमस्वरूपी बटण दिले जाते. हे बटण दाबले की आपण माहितीच्या महाजालात प्रवेश करून समोर येणाऱ्या अॅड्रेस बारमध्ये वेबसाइटचे नाव लिहून एंटरचे बटण दाबले तरी काम होऊन जाते.

*** ग्रिप्स रौप्य महोत्स्व**

जर्मनीत लोकप्रिय असलेला 'ग्रिप्स' हा नाट्यप्रकार ज्येष्ठ अभिनेते डॉ. मोहन आगाशे यांनी भारतात आणला. पुण्यात ही चळवळ चांगलीच रुजली. गेल्या पंचवीस वर्षांत नाट्यकर्मींना या चळवळीने वेगळी दिशा दिली. उपेंद्र लिमये, विभावरी देशपांडे हे सध्याचे आघाडीचे कलाकार याच चळवळीतले.

ग्रिप्स भारतात येऊन पंचवीस वर्षे झाली म्हणून महाराष्ट्र कल्चरल सेंटरच्या वतीने वर्कशॉपचे आयोजन करण्यात आले आहे. यात ज्येष्ठ लेखक-दिग्दर्शक श्रीरंग गोडबोले, अभिनेत्री विभावरी देशपांडे आणि शुभांगी दामले मार्गदर्शन करणार आहेत. मोठ्या मुलांनी लहान मुलांचं काम करायचं, ही ग्रिप्सची मूळ कन्सेप्ट.



## २६/११ मुंबईवरील हल्ला

**संपादन : हरिंदर बावेजा अनुवाद : प्रा. मुकुंद नातू**

सागरी मार्गाने आलेल्या दहा दहशतवाद्यांनी देशाच्या आर्थिक राजधानीत घातलेल्या रक्तरंजित थैमानाची प्रत्यक्षदर्शी कहाणी.

**२५०रु. पोस्टेज २५रु.**

मागील काही वर्षांत सादर झालेली पण सध्या बंद असलेली काही नाटकं परत मंचावर येणार आहेत. श्रीरंग गोडबोले यांनी ग्रिप्ससाठी काही नाटकांचं लेखन केलं आहे. या नाटकाच्या दिग्दर्शनासह एक नवीन नाटकही ते लिहिणार आहेत.

रौप्यमहोत्सवाचा मुख्य कार्यक्रम सप्टेंबरमध्ये होणार आहे. यावेळी चर्चासत्रे, सेमिनार्सचे आयोजन करण्यात येणार आहे. जर्मनीतील एक लेखक आणि दिग्दर्शक पुण्यात येणार आहेत.

*** संमेलनाचे संकेतस्थळ**

''फुले-शाहू-आंबेडकर साहित्य संमेलन असो वा विद्रोही किंवा सम्यक साहित्य संमेलन या सर्व साहित्य प्रवाहांचे ध्येय एकच आहे. सर्व संमेलनांनी प्रागतिक विचार समृद्ध केला आहे,'' असे मत पुणे विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासनाचे प्रमुख डॉ. रावसाहेब कसबे यांनी व्यक्त केले.

सम्यक साहित्य संमेलनाच्या संकेतस्थळाचे उद्घाटन डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांच्या हस्ते झाले. ते म्हणाले, ''जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये समाजाची पूर्वस्थिती कायम ठेवण्यासाठी काहीजणांकडून इलेक्ट्रॉनिक माध्यमे आणि संदेशवहन यंत्रणा या आधुनिक माध्यमांचा उपयोग करून घेतला जात आहे. अशा स्थितीमध्ये ज्यांना समाजामध्ये बदल घडवायचा आहे, त्यांना अडचणींना समोरे जावे लागत आहे.''

वाघ म्हणाले, ''परंपरेने चालत आलेल्या गोष्टी आता जागतिकीकरणामध्ये कालबाह्य होत आहेत. त्यामुळे दलितत्वाच्या पलीकडे जाऊन कक्षा रुंदावण्याचे काम सम्यक साहित्य संमेलनाच्या माध्यमातून होत आहे. सर्वांना सामावून घेणारी आंबेडकरी चळवळीची विचारधारा या संकेतस्थळाद्वारे जगासमोर जाईल.''

*** सम्यक साहित्य संमेलनाचे उद्घाटन**

''प्रस्थापितांविरुद्ध आज बंड पुकारणारे उद्याचे प्रस्थापित असतात. मनुष्यजीवनाच्या सर्व क्षेत्रांत हा झगडा सातत्याने सुरू असतो. मग ते क्षेत्र राजकारणाचे असो किंवा विज्ञानाचे. कला आणि साहित्याचे क्षेत्रदेखील त्याला अपवाद नाही, साहित्यात नवा संप्रदाय जन्माला येतो, वाढतो आणि विकास पावतो. त्यात काही काळाने वैगुण्ये निर्माण होतात. त्याचा अतिरेक झाला की त्याविरोधात प्रतिक्रिया उमटू लागतात. त्याच अपरिहार्य कारणांतून पुढे नवीन संप्रदाय निर्माण होतो,'' असे मत प्रसिद्ध कवी आणि सम्यक साहित्य संमेलनाचे अध्यक्ष नामदेव ढसाळ यांनी व्यक्त केले.

आंबेडकर सांस्कृतिक महोत्सव समितीतर्फे आयोजित या संमेलनाचे उद्घाटन हिंदीतील प्रसिद्ध साहित्यिक उदय प्रकाश यांच्या हस्ते झाले. मावळते संमेलनाध्यक्ष दीनानाथ मनोहर, रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष रामदास आठवले, 'आयदान'च्या लेखिका उर्मिला पवार, महादेव जानकर, प्रा. विलास वाघ, परशुराम वाडेकर या वेळी उपस्थित होते.

ढसाळ म्हणाले, ''दलित साहित्याची चळवळदेखील आता विस्कटण्याच्या मार्गावर आहे. फुले-आंबेडकरांचा विचार पायाभूत असलेल्या दलित साहित्याला नवे राजकीय तत्त्वज्ञान, जागतिक तत्त्वज्ञान यांचे वावडे नाही. दलित साहित्यात वाङ्मयीन निर्मितीच्या नावाखाली सवंग साहित्य लिहिले जात आहे. दलितेतर लेखक-कवींपेक्षा त्यांनी हजारो पावले पुढे असावे एवढीच अपेक्षा आहे. परंपरा तोडण्याची शक्यता नाकारून दलित साहित्यानेही स्वत:च निर्माण केलेले सोवळे जपले. दलित साहित्यातील नकाराने विधायकतेला आत्मसात केले नाही. विद्रोह ही 'फेज' असते. त्यानंतर नवे रचण्याचा, घडविण्याचा सोस पुढे यायला हवा. वैज्ञानिक अर्थाने दलित साहित्याला अद्ययावत होता आले नाही. समता आणि बंधुता आमच्या कलाकृतीचा पाया आहे, असे म्हणत दलित साहित्य स्वत:नेच निर्माण केलेल्या नव्या मूलतत्त्ववादामध्ये अडकले. निर्मिती सर्जनापेक्षा नुसते तात्त्विक भाष्यकार होणे दलित लेखक-कवींना आवडू लागले. दलित साहित्य परंपरावाद्यांसारखे नव्या जाणिवांना जीर्णवादी बनवू लागले आहे. जगातील अन्य भाषिक लेखकांपेक्षा वैश्विक वाङ्मयाच्या जाणिवेच्या अर्थाने मराठीतील लेखक सर्वांत अडाणी आणि मागासलेले आहेत.''

उदय प्रकाश म्हणाले, ''राजकारण हे समाजपरिवर्तनाचे साधन झालेले नाही. तथाकथित आधुनिक समाजामध्ये वंचित राहिलेल्या लोकांचे लेखन हा व्यक्तिस्वातंत्र्याचा आविष्कार आहे. सच्चा लेखक हा दलितच असतो.'' दीपक म्हस्के आणि रमणी सोनवणे यांनी सूत्रसंचालन केले.

*** जातींचे ध्रुवीकरण - चर्चासत्र**

''समाजहितासाठी, एकोप्यासाठी जातींची मोठी अडचण ठरत आहे. अशा स्थितीत जातींचे ध्रुवीकरण होणे महत्त्वाचे आहे. मात्र, या ध्रुवीकरणाचा अंतिम हेतू जातिविनाश हाच असायला हवा,'' असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांनी केले. जातीविनाशासाठी प्रयत्न सुरू असताना भालचंद्र नेमाडे जाती टिकवण्यासंदर्भात लिहितात तेव्हा दु:ख होते, अशी भावनाही त्यांनी व्यक्त केली.

''सर्व शोषित घटकांनी एकत्र येऊन लढणे म्हणजे जातींचे ध्रुवीकरण होय; पण सध्या वेगवेगळ्या कारणांसाठी, स्वहितासाठी जात वापरता यावी, यासाठी अनेकांचे प्रयत्न सुरू आहेत. याबाबत केवळ साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावर चर्चा करून उपयोग नाही,'' असे डॉ. कोत्तापल्ले यांनी सांगितले.

'सम्यक साहित्य संमेलना'त साहित्य संमेलने व जातींचे ध्रुवीकरण या विषयावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. डॉ. शरणकुमार लिंबाळे, डॉ. प्रतिमा इंगोले, प्रा. फकरुद्दीन बेन्नूर, प्रा. विलास वाघ हे त्यात सहभागी झाले होते.

जात टिकवण्यासाठी संमेलनाचा, साहित्याचा आधार घेणे कितपत योग्य आहे,

असा सवाल उपस्थित करून प्रा. वाघ म्हणाले, ''अशी संमेलने देशाच्या ऐक्याला आणि समाज एकजिनसी होण्याला घातक ठरत आहेत.'' जातीच्या अंतासाठी समतेची चळवळ उभारायला हवी, असे बेन्नूर यांनी सांगितले.

''ज्यांनी आयुष्यभर कधी चार ओळीचे पत्रही लिहिले नसेल, अशी माणसे एकत्र येऊन भाषणात किंवा लेखनात दलित साहित्य हा शब्द वापरू नका; आंबेडकरवादी साहित्य असा शब्द वापरा, असे सांगतात. प्रसंगी धमकावतातही. त्यामुळे मला आता आंबेडकरवाद्यांचीच भीती वाटत आहे.'' असे लिंबाळे म्हणाले.

*** गांधीजींवरील पुस्तकावर बंदी निषेधार्ह**

महात्मा गांधी यांच्या आयुष्यावर लिहिलेल्या वादग्रस्त पुस्तकावर बंदी घालण्यात आल्यानंतर पुस्तकाचे लेखक जोसेफ लेलीव्हेल्ड यांनी बंदीला विरोध दर्शविला आहे.

पुलित्झर पुरस्कारविजेते लेखक जोसेफ लेलीव्हेल्ड यांनी 'ग्रेट सोल : महात्मा गांधी ॲण्ड हिज स्ट्रगल विथ इंडिया' हे पुस्तक लिहिले आहे. या पुस्तकामुळे वाद निर्माण झाल्यानंतर गुजरात सरकारने त्यावर बंदी घातली. हे पुस्तक म्हणजे महात्मा गांधी यांच्या आयुष्याचा वापर करून खळबळ माजविण्याचा प्रयत्न आहे, असे इतिहासतज्ज्ञ आणि गांधींच्या नातेवाईकांनी म्हटले आहे.

लेलीव्हेल्ड म्हणाले, ''भारतासारख्या राष्ट्रात जे पुस्तक कोणी वाचलेले नाही त्यावर बंदी घालणे अयोग्य आहे. बंदी घालणाऱ्यांनीही या पुस्तकातील जे मुद्दे वादग्रस्त ठरले त्याची पुस्तकातील पाने पाहण्याचा तरी प्रयत्न करायला हवा होता. ज्याबद्दल त्यांना आक्षेप आहे ती पाने पाहण्याचे कष्ट त्यांनी बंदीचा निर्णय घेण्यापूर्वी घ्यायला हवे होते.''

*** सेन्सॉर बोर्डाच्या अध्यक्षपदी लीला सॅमसन**

सेन्सॉर बोर्डाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ भरतनाट्यम नर्तिका लीला सॅमसन यांची नियुक्ती झाली आहे. या निर्णयामुळे बॉलिवूडमध्ये अनेकांना आश्चर्याचा धक्का बसला आहे. सेन्सॉर बोर्डाचे प्रमुख या नात्याने काम करताना अनेक आव्हानांचा सामना करावा लागणार असल्याचे वक्तव्य सॅमसन यांनी केले. गेल्या दोन वर्षांपासून बोर्डाच्या अध्यक्षपदी कार्यरत असलेल्या शर्मिला टागोर यांचा कार्यकाळ नुकताच संपला होता. सॅमसन या ५९ वर्षीय आहेत. भरतनाट्यम नृत्यातील योगदानाबद्दल १९९० मध्ये त्यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. क्वचितच चित्रपट पाहणाऱ्या सॅमसन यांची सेन्सॉर बोर्डाच्या अध्यक्षपदी नियुक्ती झाली आहे. सामान्य माणसाच्या नजरेतून आपण काम करणार असल्याचे सांगताना सॅमसन म्हणाल्या, बॉलिवूडमधील गटबाजीच्या आव्हानांना मला सामोरे जावे लागणार आहे. परंतु, क्षेत्र नवे असले तरी कला आणि बॉलिवूड वेगवेगळे नाही, असे मी मानते.

या पूर्वी शर्मिला टागोर यांच्या व्यतिरिक्त अनुपम खेर, विजय आनंद, आशा

पारेख आणि शक्ती सामंता यांनी हे पद भूषविले होते.

*** कथा उलगडणे हीच चित्रपटाची भाषा**

''कथा उलगडण्याची प्रक्रिया हीच चित्रपटाची खरी भाषा असते. ती दिग्दर्शकांनी अधिक प्रभावीपणे सादर करणे महत्त्वाचे आहे. कथा उलगडताना तंत्रज्ञानाचा वापर कथेच्या गरजेनुसार व्हावा. कारण, बऱ्याचदा दिग्दर्शकांकडून तंत्रज्ञानाचा अतिरेक होतो,'' असे मत दिग्दर्शक अभिनय देव यांनी व्यक्त केले.

जाहिरात क्षेत्रात स्वत:ची वेगळी मोहोर उमटविलेल्या देव यांनी आता चित्रपट दिग्दर्शनात प्रवेश केला आहे. 'गेम' या हिंदी चित्रपटाच्या निमित्ताने पत्रकार परिषदेत बोलताना ते म्हणाले, ''जाहिरात क्षेत्रात १७ वर्षे काम करता आले. वेगवेगळे अनुभव घेता आले. त्याचा फायदा मला चित्रपट दिग्दर्शनासाठी होत आहे. वेगळ्या रीतीने कथा उलगडण्याचा प्रयोग 'गेम'मध्ये केला आहे. चित्रपटात प्रत्येक दहा मिनिटाला वेगळा अनुभव पाहायला मिळेल. त्यासाठी तंत्रज्ञानाचा अवास्तव वापर केला नाही.'' चित्रपटात अभिषेक बच्चन, कंगना राणावत, सारा जेन डायस, अनुपम खेर, बोमन इराणी यांच्या भूमिका आहेत.

*** 'गीतारहस्य' - टिळकांची वाङ्मयीन मूर्ती**

''गीतारहस्य ही लोकमान्यांची वाङ्मयीन मूर्ती आहे. मानवाने निष्काम कर्मयोग आचरावा व कर्मातील अहंकार टाकून द्यावा, हाच समन्वय लोकमान्यांनी गीतेतून साधला आहे,'' असे प्रतिपादन विद्यावाचस्पती शंकर अभ्यंकर यांनी केले.

केसरी-मराठा ट्रस्ट व टिळक बंधू प्रकाशन यांच्या वतीने गीतारहस्य जयंती शताब्दी साजरी करण्यात आली. 'लोकमान्य टिळक व गीतारहस्य : एक समन्वय' या विषयावर अभ्यंकर यांचे प्रवचन झाले. दीपक टिळक, शैलेश टिळक उपस्थित होते. दीपक टिळक यांच्या हस्ते अभ्यंकर यांचा सत्कार करण्यात आला. नम्रता फडणीस यांनी आभार मानले.





## हृदयविकार निवारण

**शुभदा गोगटे**

डॉ. डीन ऑर्निश यांच्या हृदयविकार हटविण्याच्या कार्यक्रमाचा भारतीय आविष्कार..

**२२०रु. पोस्टेज २५रु.**

*** भारत इतिहास मंडळाच्या शताब्दीनिमित्त विशेष लिफाफा**

कलाकारांचे मार्गदर्शक केंद्र आणि इतिहासकारांचे चिकित्सेचे ठिकाण म्हणून भारत इतिहास संशोधक मंडळ नावारूपाला येण्याची गरज असल्याचे मत शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांनी व्यक्त केले.

मंडळाच्या शताब्दीनिमित्त टपाल खात्याकडून तयार करण्यात आलेल्या विशेष लिफाफ्याचे प्रकाशन त्यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमाला पुण्याचे पोस्टमास्टर जनरल कर्नल कमलेशचंद्र मिश्रा, लिफाफ्याचे डिझायनर डॉ. श्रीकांत प्रधान, श्री. मा. भावे आदी उपस्थित होते. देशात इतिहास संशोधनाची चळवळ १०० वर्षांपूर्वी सुरू झाली. इतिहास मर्म समजण्यासाठी अभ्यास होण्याची गरज आहे. नवीन संशोधन तसेच द्वेष आणि मत्सर दूर ठेवून सत्याला सामोरे जाणे यासाठी लेखक मंडळींनी १० टक्के जादा अभ्यास करण्याची गरज असल्याचेही पुरंदरे यांनी नमूद केले.

टपाल खात्याकडून तयार करण्यात आलेल्या विशेष लिफाफ्यावर देवनागरी, फारशी, इंग्रजी आणि मोडी भाषेत लिखाण करण्यात आले आहे.

भारत इतिहास संशोधन मंडळासाठी पालिकेच्या बजेटमध्ये ५० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली असली तरी राज्य सरकारकडून अद्याप मान्यतेचे पत्र न आल्याने मंडळाच्या हातात ही रक्कम पडलेली नाही. हा निधी इतिहास संशोधन मंडळाच्या देखभालीसाठी आणि शहराच्या इतिहासाची कागदपत्रे जमा करण्यासाठी आहे.

*** 'क्लिक'वर पुस्तक पोचले जगभर**

पुस्तक मग ते कोणत्याही विषयावरचे असो, अगदी कॉम्प्युटर क्षेत्रासंबंधी असले तरी पुस्तक प्रकाशन सोहळा म्हटलं की व्यासपीठावरील चार मान्यवर गिफ्ट पॅकमधून ते पुस्तक हाती घेणार आणि 'पुस्तकाचे प्रकाशन झाले' असे जाहीर करणार असेच सर्वसाधारण चित्र डोळ्यांसमोर येते. पण आता पुस्तक प्रकाशनाच्या कार्यक्रमाला हायटेक टेक्नॉलॉजीचीही जोड मिळाल्याने प्रकाशित झालेले पुस्तक जगभरातील वाचकांपर्यंत 'ई-बुक'द्वारे एका क्लिकवरून पोचेल.

डॉ. अरुण निगवेकर यांचे 'उच्च शिक्षण - समस्या आणि प्रवाह' हे पुस्तक पारंपरिक पद्धतीने तसेच ई-आवृत्तीच्या स्वरूपात प्रसिद्ध झाले. ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी आयपॉडवर क्लिक करून त्याचे प्रकाशन केले.

उच्च शिक्षणात सोशल नेटवर्किंगद्वारे ओपन रिसोर्स मुव्हमेंट आणण्यापासून, देशातील सर्व विद्यापीठे-शिक्षणसंस्था इंटरनेटवर जोडण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्पही प्रत्यक्षात उतरवण्याचा संकल्प करण्यात आला.

**∗ 'ग्यान की लायब्ररी'**

'मुलांनी मुलांसाठी चालवलेली लायब्ररी' म्हणून नावारूपाला आलेली 'ग्यान की लायब्ररी' ४०० गावांमधील ४०० शाळांद्वारे १ लाख विद्यार्थ्यांची वाचनाची आवड जोपासत आहे.

'रुरल रिलेशन' या संस्थेने २००८ मध्ये सातारा जिल्ह्यातील आसरे या गावात या लायब्ररी मोहिमेस सुरुवात केली. लायब्ररी सुरू करण्याविषयी शाळेने या संस्थेला पत्र लिहिल्यानंतर देणगीदारांच्या मदतीने कोणत्याही गावात १७० पुस्तकांचा संच देऊन लायब्ररी सुरू केली जाते असे प्रदीप लोखंडे म्हणाले.

**∗ 'बालगंधर्व'चा प्रीमियर शो कान्समध्ये**

नितीन देसाई यांच्या बहुचर्चित 'बालगंधर्व' या चित्रपटाचा प्रीमियर शो कान्स आंतरराष्ट्रीय फिल्म फेस्टिव्हलमध्ये ६ मे रोजी झाला. 'आंतरराष्ट्रीय फिल्म फेस्टिव्हलच्या ज्या ज्या प्रतिनिधींना मी या सिनेमांच्या रशेस दाखवल्या, त्या त्यांना खूप आवडल्या. प्रॉडक्शनची क्वालिटी आणि त्याचा आवाका पाहून ते खूष झाले,' असे नितीन देसाई यांनी सांगितले.

कान्सनंतर व्हेनिस, बर्लिन, टोरांटो येथेही हा चित्रपट इंग्रजी सब-टायटल्ससह दाखविला जाणार आहे. सुबोध भावेने बालगंधर्वांची भूमिका साकारली आहे. गुढी पाडव्याला ४ एप्रिलला 'बालगंधर्व'चं म्युझिक लाँच झाले.

**∗ 'पुण्याचे पक्षीवैभव'चे प्रकाशन**

वेगाने होणाऱ्या पुण्याच्या विस्तारामुळे टेकड्यांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. शहरातील पर्यावरणाचा ऱ्हास रोखायचा असेल तर या टेकड्यांचे संरक्षण करण्याची गरज आहे. त्यासाठी पुणेकरांनी पुढे येऊन प्रयत्न करायला हवेत, असे आवाहन वन विभागाचे सहायक प्रसिद्धी व माहिती अधिकारी प्रभाकर कुकडोलकर यांनी केले.

'पुण्याचे पक्षीवैभव' या कुकडोलकर यांच्या पुस्तकाचे प्रकाशन पक्षितज्ज्ञ प्रकाश गोळे यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी डेहराडून येथील भारतीय वन्यजीव संस्थेचे माजी संचालक विश्वास सावरकर होते. 'नॅचरल रिसोर्सेस कॉन्झर्वेटर्स ऑर्गनायझेशन' (एनआरसीओ) या संस्थेने हे पुस्तक प्रकाशित केले आहे.

गोळे म्हणाले, ''पर्यावरणाचा सतत ढासळत असलेला समतोल पाहता पक्षीनिरीक्षकांनी शहरातील पर्यावरणाची काळजी घेण्यास सक्रिय व्हायला हवे. पक्ष्यांची अनेक वसतिस्थाने गेल्या काही वर्षांत नष्ट झालेली आहेत. ही बाब पर्यावरणाच्या दृष्टीने मारक आहे.''

*** उर्दू साहित्य अकादमीस २० लाख रुपये**

राज्य सरकारने महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमीला २० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. उर्दू भाषेची वाङ्‌मयीन प्रगती व्हावी, उर्दू आणि मराठी लेखकांमध्ये वैचारिक देवाणघेवाण व्हावी, या उद्देशाने १९७५ मध्ये या अकादमीची स्थापना केली गेली. उर्दू भाषेचे वर्ग सुरू करणे, उर्दू साहित्य त्रैमासिकाचे प्रकाशन करणे, उर्दू साहित्यासाठी अनुदान देणे, उर्दू पुस्तकांना पारितोषिके देणे वगैरे योजना प्रभावीपणे राबविण्याचा अकादमीचा मनसुबा आहे.

*** 'सोलापूर सेक्स स्कँडल'चे प्रकाशन**

''काल बदलत आहे. त्याप्रमाणे वेश्याव्यवसायात येणाऱ्या महिलांचे प्रमाण वाढत आहे. अशा स्थितीत महिलांचे नेमके प्रश्न समजून घेण्याची आणि त्यांना स्वीकारण्याची तयारी समाजाने दाखवायला हवी. इतकेच नव्हे तर ज्या स्त्रिया या व्यवसायातून बाहेर पडण्याचा प्रयत्न करीत आहेत त्यांना आधार देण्यासाठी पुढे यावे,'' असे आवाहन 'वंचित विकास'च्या संचालिका मीना कुर्लेकर यांनी केले.

'गझल सहयोग'च्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या समारंभात भूषण कटककर (बेफिकीर) लिखित 'सोलापूर सेक्स स्कँडल' आणि 'बुधवार पेठ : एक वास्तव' या पुस्तकांचे प्रकाशन झाले. ''स्त्रियांवर अत्याचार होणे किंवा त्या वेश्या व्यवसायात येणे हा एक ज्वलंत विषय आहे. याबाबत समाजाने जागे होण्याची आवश्यकता आहे. महिलांना आपण देवी, आई, बहीण अशा वेगवेगळ्या रूपात पाहतो. पण, त्याही जिवंत माणूस आहेत हे विसरतो. त्यांच्या खऱ्या समस्या जाणून घ्या,'' असे कुर्लेकर यांनी सांगितले. सुनीता जोगळेकर म्हणाल्या, ''अशा महिलांना आधार मिळवण्यासाठी समाजाचे सहकार्य अपेक्षित आहे. 'सोलापूर सेक्स स्कँडल' व 'बुधवार पेठ...' ही पुस्तके वास्तवाकडे जाणारी व नवा विचार सांगणारी आहेत.''

*** पंचांग स्वरूपातील ऑनलाइन कॅलेंडर**

मराठी माणसांचे नवीन वर्ष गुढीपाडव्यापासून सुरू होत असले, तरी नवीन कॅलेंडर तेव्हा सुरू होत नाही, म्हणूनच पंचांग स्वरूपात कॅलेंडर उपलब्ध करून देण्यासाठी गेल्या तीन वर्षांपासून 'ऑनलाइन' कॅलेंडर ही उपलब्ध झाले आहे.

कॅलेंडर स्वरूपाचे पंचांग असे या 'शुभारंभ'चे स्वरूप आहे. पंचांग तिथी शब्दरूपात दर्शविण्यात आली असून, इंग्रजी महिन्यांची तारीख आकड्यांमध्ये देण्यात आली आहे. मराठी महिना शुद्ध प्रतिपदा ते अमावस्या असा असतो. त्यामुळे मराठी महिन्याच्या कॅलेंडरमध्ये दोन इंग्रजी महिने वेगवेगळ्या रंगात दाखविण्यात आले आहेत. पंचांगातील सूर्योदय, सूर्यास्ताच्या वेळा, तिथी आणि नक्षत्र समाप्तीची वेळ तसेच कोणत्या राशीत ग्रह किती काळ असेल, याची माहितीही यातून देण्यात

आली आहे. 'बुकगंगा डॉट कॉम' या वेबसाईटवरून ग्राहकांना हे कॅलेंडर ऑनलाईन खरेदी करता यईल. (किंमत २५ रुपये)

### * मोहन वाघ - प्रथम स्मृतिदिन

ज्येष्ठ रंगकर्मी मोहन वाघ म्हणजे उमेदीचे व तरुणाईचे एक रूप होते. त्यांच्या आयुष्यात त्यांनी विणलेले मैत्रीचे घट्ट जाळे म्हणजे एक आदर्श होता. या मनस्वी नाट्यकर्मीमध्ये 'मराठी जागतिकीकरण' करण्याची एक आगळीवेगळी जिद्द होती, असे मत त्यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त परचुरे प्रकाशनतर्फे प्रकाशित करण्यात आलेल्या 'आठवणीचे ढग रंगीबेरंगी' या पुस्तकाच्या प्रकाशन प्रसंगी व्यक्त करण्यात आले.

ज्येष्ठ अभिनेत्री सुलोचनादीदी, शशिकला, ज्येष्ठ नाटककार विजया मेहता, ज्येष्ठ साहित्यिक शिरीष पै, ज्येष्ठ पत्रकार कुमार केतकर, साहित्यिक विश्वास पाटील, पद्मश्री वाघ इ. उपस्थित होते.

विश्वास पाटील म्हणाले, मोहन वाघ म्हणजे उत्साहाचा अखंड स्रोतच! त्यांची इच्छाशक्ती जबरदस्त होती. इतकेच नव्हे तर एखादी इच्छा प्रत्यक्षात उतरविण्याची त्यांची जिद्द वाखाणण्यासारखी होती.

अभिनेत्री शशिकला म्हणाल्या की, मोहन वाघ हे प्रत्येक सुख-दु:खात माझ्या पाठी नेहमीच खंबीरपणे उभे राहिले. आयुष्यात ज्या व्यक्तींना मी आपले म्हटले त्यात मोहन वाघ यांचे स्थान सर्वोच्च होते, असे सुलोचनादीदी यांनी सांगितले. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आभार मानले. या प्रसंगी वाघ यांच्या कन्या अपर्णा चव्हाण व शर्मिला ठाकरे यांनी स्वागत केले.

### * दीनानाथांचे सूर

'शूरा मी वंदिले', 'चंद्रिका ही जणू' आणि 'परवशता पाश दैवे' अशी सरस नाट्यपदे अजरामर करणाऱ्या संगीतसूर्य मास्टर दीनानाथ मंगेशकर यांच्या स्मृती जतन करणारे चिंचवडमधील गायिका वंदना घांगुर्डे यांचे 'ब्रीद तुझे जगी दीनानाथ'




**पानगळीच्या आठवणी**

**शोभा चित्रे**

जीवघेण्या विलक्षण अनुभवाचा वेध घेणारी,
हृदय हेलावून सोडणारी एक प्रांजळ आत्मकथा

**२००रु. पोस्टेज २५रु.**

हे पुस्तक सहा एप्रिलला मंगेशकर कुटुंबीयांच्या उपस्थितीत पुण्यातील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात प्रकाशित झाले. वयाच्या नवव्या वर्षापासून हजारो बंदिशी तोंडपाठ असणारे आणि संगीतनाटकात एका पदाला १४-१४ वन्समोअर घेत नाट्यरसिकांना लुब्ध करणारे मास्टर दीनानाथ पुन्हा होणे नाही. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठांतर्गत 'मास्टर दीनानाथ मंगेशकर यांचे मराठी संगीत रंगभूमीवरील योगदान - एक चिकित्सक अभ्यास' हा प्रबंध वंदना घांगुर्डे यांनी नुकताच पूर्ण केला आहे.

पुस्तकाला डॉ. द. भि. कुलकर्णी यांची प्रस्तावना आहे. स्वरसम्राज्ञी लतादीदी आणि पं. हृदयनाथ मंगेशकर यांनी पत्ररूपाने शुभेच्छा दिल्या आहेत. पुस्तकात दीनानाथांचे घराणे, चरित्र, लौकिक आणि कलात्मक व्यक्तिमत्त्व, नटगवई, दैवी आवाज, देवदत्त प्रतिभा, गाढा व्यासंग, वीर वृत्ती, बलवंतचे वेगळेपण, कल्पक संगीतकार, बलवंत पिक्चर्स, पंथ मंगेशकरी या अनुषंगाने लेखन केले आहे.

*** मोटरमनच्या अनुभवांचे 'जंक्शन'**

भारत बुक हाऊसतर्फे विनायक रत्नपारखी यांचे 'जंक्शन'हे पुस्तक प्रकाशित करण्यात आले आहे. सावनी केळकर यांनी त्याचे शब्दांकन केले आहे.

रेल्वेतून प्रवास करणाऱ्यांना अनेकदा रेल्वे चालते कशी याचे आकर्षण असते. कधी ट्रेन लेट झाली की प्रवाशांची चिडचिड होते. या सगळ्या मागची व्यवस्था कशी काम करते, हे या पुस्तकातून वाचकांपर्यंत पोचवण्याचा प्रयत्न केला असल्याचे रत्नपारखी यांनी नमूद केले. पुणे-मुंबई दरम्यान डेक्कन क्वीन, शताब्दी एक्स्प्रेस, प्रगती एक्सप्रेस आदी ट्रेनच्या ड्रायव्हिंगचे काम त्यांनी केले. 'गेल्या ४० वर्षात विविध अनुभव आले. कधी अपघात झाले तर कधी बंद, प्रवाशांचे मोर्चे अशा विविध घटनांचे या नोकरीमुळे साक्षीदार होता आले. केवळ वैयक्तिक अनुभवांवर अवलंबून न राहता निवृत्तीनंतर सर्व खात्यांत काम करणाऱ्यांशी त्यांच्या अनुभवांबद्दल, कामाबद्दल संवाद साधला. यातून हे पुस्तक उभे राहिले आहे,' असे ते म्हणाले.

*** पुणे मराठी ग्रंथालयाची अभ्यासिका**

आजच्या बदलत्या टेक्नॉलॉजीच्या काळात पुणे मराठी ग्रंथालयाच्या अभ्यासिकेत लवकरच ऑनलाइन प्रवेश घेता येणार आहे. प्रतीक्षा यादी ई-मेलने कळविण्यात येणार असून, एसएमएसद्वारे प्रवेशाची माहिती मिळणार आहे. अभ्यासिकेच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्ताने ग्रंथालयाने नवे उपक्रम हाती घेतले आहेत.

पुणे मराठी ग्रंथालयाच्या अभ्यासिकेतून अभ्यास करून आजवर ४५ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी निरनिराळ्या क्षेत्रांत आपल्या कामगिरीचा ठसा उमटविला आहे. जुलै १९६१ मध्ये पानशेतचा पूर आला, तेव्हा ग्रंथालयात मदत केंद्र चालविले जात होते. पूर ओसरल्यानंतर जनजीवन विस्कळित झाल्याने मुलांना अभ्यासासाठी जागाच

राहिली नव्हती. स्वाध्याय कॉलेजचे त्या वेळचे प्रिन्सिपॉल का. म. महाजन यांच्या पुढाकाराने पुणे मराठी ग्रंथालयात अभ्यासिका सुरू करण्यात आली. तेव्हा अभ्यासिकेत पाच विद्यार्थी येत होते आणि प्रवेश फी होती महिन्याला तीन रुपये!

आजच्या घडीला अभ्यासिकेत १०५० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो, तर साधारण ५०० विद्यार्थी प्रतीक्षा यादीवर आहेत. एका वेळी ३७५ विद्यार्थ्यांची बसण्याची सोय होते. त्याचप्रमाणे अभ्यासासाठी लागणारी क्रमिक पुस्तके गरजेप्रमाणे दिली जातात.

*** पुस्तकातून उलगडला 'कॅप्टन कूल'**

मी कोणते कपडे घालतो... काय वापरतो... त्याचे स्टाईल स्टेटमेंट, त्याचा सगळ्यांना जिंकून घेणारा अफलातून खेळ... हा सगळ्यांच्या आकर्षणाचा विषय ठरला आहे. तो दुसरा तिसरा कोणी नसून वर्ल्ड कप विजेत्या टीम इंडियाचा कर्णधार महेंद्रसिंह ढोणी! तो नेमका कसा आहे, घरी असताना काय करतो, त्याचे कुटुंबीय, जवळचे मित्र अशा अनेक गोष्टींबद्दल माहिती देणाऱ्या 'खेळरत्न महेंद्रसिंग ढोणी' या पुस्तकाचे नुकतेच प्रकाशन झाले.

प्रफुल्लता प्रकाशनातर्फे काढण्यात आलेल्या या पुस्तकाचे लेखन आदिनाथ हरवंदे यांनी ढोणीच्या रांची या गावाला जाऊन, तेथे त्याच्या कुटुंबियांबरोबर राहून केले आहे.

ढोणीकडे आजची पिढी रोल मॉडेल म्हणून पहाते. त्याच्यापासून प्रेरणा घेऊन आपापल्या क्षेत्रात उत्तम यश मिळवण्याचे ध्येय जनरेशन नेक्स्टला ठेवता येईल ढोणीचा चांगुलपणा, साधेपणा, त्याची क्रिकेटवरची अपार निष्ठा, त्यासाठी त्याने घेतलेले कष्ट, समाजाविषयीची आस्था, औदार्य आदींचे चित्रण पुस्तकात करण्यात आले आहे.

*** दुसरे मराठवाडा लेखिका संमेलन**

''लेखिका संसाराच्या वर्तुळाबाहेर जाऊन प्रेमाच्या त्रिकोणाबाहेरचे काही लिहीत नाहीत, अशी तक्रार समीक्षक करतात. घर आणि प्रेम हेच जर स्त्रीचे विश्व असेल तर ती तेच लिहिणार. मात्र आजही समीक्षक लेखिकांकडून स्त्रीवादी लेखनाचा आग्रह धरतात. वेगळ्या धाटणीचे लिहिणाऱ्या लेखिकांचा उल्लेख समीक्षेत होत नाही,'' अशी खंत प्रसिद्ध लेखिका व दुसऱ्या मराठवाडा लेखिका साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष रेखा बैजल यांनी परभणी येथे व्यक्त केली.

चित्रपट निर्मात्या कांचन अधिकारी यांच्या हस्ते उद्घाटन झाले. माजी संमेलनाध्यक्ष अनुराधा वैद्य, स्वागताध्यक्ष आमदार मीरा रेंगे, कौतिकराव ठालेपाटील, दादा गोरे, कार्यवाह अतकरे, जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष कुसुम देशमुख, नगराध्यक्ष जयश्री खोबे

या वेळी उपस्थित होत्या.

श्रीमती बैजल म्हणाल्या, ''ज्या लेखिका स्त्रीवादी लिहितात त्यांचाच उल्लेख समीक्षेत केला जातो. स्त्रीवाद म्हटले की कमल देसाई ते गौरी देशपांडे आणि मेघना पेठे अशी एका ओळीत सात-आठ नावे येतात. यात काहींनी स्त्रीवादाच्या एका पैलूवरच लिखाण केले आहे. मुक्त जीवन, समंजस पती, आयुष्यात लग्नानंतर येणारा दुसरा पुरुष, त्याच्यासोबतचा अटळ असा शारीरिक संबंध आणि कधी कधी त्यासंबंधाचे अत्यंत उघड शब्दांमध्ये वर्णन, असे या लेखनाचे स्वरूप आहे. खरे तर नैसर्गिक गरजेला अवास्तव महत्त्व दिले जात आहे. स्त्रीवाद हा अधिक समर्थपणे यायला हवा. स्त्रीचा विकास, तिचे स्त्रीत्व आणि तिच्या नैसर्गिक गुणांचे परिपोषण ज्यात झालेले असेल तसेच तिचे प्रेम, त्याग ममत्व यातली शक्ती व्यक्त झाली असेल असा स्त्रीवाद साहित्यातून येण्याची गरज आहे.''

श्रीमती अधिकारी म्हणाल्या, ''लेखनासाठी शिक्षणाची नाही; तर अधिक अनुभवसंपन्न असण्याची गरज आहे. दिवसभराच्या कामात मग्न असताना जे सुचेल ते कागदावर उतरवून आपल्या अनुभवांना शब्दरूप दिले तर त्यातूनच चांगले लेखन निर्माण होईल.''

स्त्रीचे सोशिक आणि गांजलेले व्यक्तिमत्त्व साहित्यात चितारणे आता पुरे झाले, असे ठामपणे सांगून श्रीमती श्रद्धा बेलसरे-खारकर म्हणाल्या की, स्त्रीची साहित्यातली प्रतिमा अशी रडवेली असू नये. आसवे गाळणारे लेखन खूप झाले. जे गाणे ऐकल्यानंतर पुढच्या पिढ्यांना आत्मभान येईल, असे गाणे आजच्या लेखिकांनी लिहिण्याची गरज आहे. आपल्याला काय हवे हे आधी स्त्रीला समजायला पाहिजे. ही लढाई केवळ स्त्री-पुरुषांची नाही तर माणूस म्हणून जगायला सुरुवात करण्याची आहे.

या वेळी कुसुम देशमुख, जयश्री खोबे आदींची भाषणे झाली. श्रीमती रेंगे यांनी पाहुण्यांचे स्वागत करून परभणीच्या वाङ्मयीन परंपरेला उजाळा दिला. 'संवादिनी' या स्मरणिकेचे प्रकाशन झाले. सूत्रसंचालन अमिता वैद्य, राजश्री मुतालिक यांनी केले.

उद्‌घाटनापूर्वी ग्रंथदिंडी निघाली. विविध वेशभूषेसह आकर्षक देखावे त्यात होते... छत्रपती शिवाजी महाराज यांच्या व बी. रघुनाथ यांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यात आले.

*** खेळता खेळता इंग्रजीचा सराव**

खेळता खेळताच लहान मुलांचा इंग्रजी शब्दसंग्रह वाढावा, यासाठी आमोद कुलकर्णी यांनी तयार केलेले शब्दकोड्यांचे पुस्तक 'जीवन विकास प्रकाशन'ने प्रकाशित केले. चार ते आठ अक्षरी शब्दांपासून तयार करण्यात आलेली १५० शब्दकोडी या पुस्तकात आहेत. म्हणूनच या पुस्तकाचे नावही 'F-८' (फोर टू एट) असे ठेवले आहे. या शब्दकोड्यांमुळे १५०० इंग्रजी शब्दांचा सराव होईल.

या पुस्तकामुळे नेहमीच्या वापरातील इंग्रजी शब्द मुलांच्या लक्षात राहतील.

पुस्तक घेणाऱ्यांना सिप ॲबॅकसच्या पहिल्या वर्गातील प्रवेशामध्ये दहा टक्के सवलत असून प्रत्येक पानावर गोव्यातील बीच रिसोर्टचेही सवलत कूपन दिले आहे. अधिक माहितीसाठी संपर्क -९८२३२३६१४६.

*** विनिता महाजनी यांच्या दोन पुस्तकांचे प्रकाशन**

''जर्मनीतील ऋतूंची माहिती या पुस्तकामध्ये गोष्टीरूपाने सर्वसामान्यांना समजेल अशा भाषेमध्ये मांडण्यात आली आहे. लेखिकेने बोलण्यापेक्षा लिहिण्यावर भर दिला असून, जे काही दिसेल ते उतरविले असल्यामुळे पुस्तक प्रभावी झाले आहे.'' असे मत मोहन आगाशे यांनी विनिता महाजनी यांनी लिहिलेल्या 'फ्लेवर्स ऑफ नेचर' आणि 'जर्मनीतील करवंदनगरी' या पुस्तकांचे प्रकाशन करताना व्यक्त केले. या वेळी श्रीकांत इंगळहळीकर, लिमये विश्वप्रकाशनचे हरिभाऊ उपस्थित होते.

पुस्तकाविषयी बोलताना महाजनी म्हणाल्या, ''हे पुस्तक लिहिण्याची प्रेरणा निसर्गापासून मिळाली. निसर्गाबद्दल आदर असल्याने त्यावर लिखाण करणे मला आवडते.''

*** कुसुमाग्रजांचे शब्दचांदणे**

कुसुमाग्रज यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त त्यांच्या आठवणींना उजाळा देण्यासाठी शनिवारवाडा कला महोत्सवातर्फे 'तो प्रवास सुंदर होता' हा कार्यक्रम आयोजित केला गेला. डॉ. गिरीश ओक यांनी नेमक्या शैलीत हा प्रवास मांडला ठरला.

'हे सुरांनो चंद्र व्हा', 'सरणार कधी रण,' 'वेडात मराठे वीर दौडल सात' आणि 'प्रेम, वरदान, जीर्ण पाचोळा', 'अनाम वीरा' या निवडक गाण्यांनी नववर्षाची सायंकाळ गोड झाली. कवयित्री डॉ. अरुणा ढेरे यांनी निवेदन केले. डॉ. ओक यांच्यासह डॉ. अशुतोष जावडेकर यांनी कवितांचे अभिवाचन केले. 'कणा, स्मृती, कोलंबसचे गर्वगीत आणि पुतळा' यासारख्या लोकप्रिय कवितांना यानिमित्ताने उजाळा मिळाला. प्रमोद रानडे यांनी संगीत संयोजन केले. प्राची मेहेंदळे, संजीव




## द मिसिंग रोझ

**सरदार ओझकान अनु. श्रीकांत परांजपे**

आईने दिलेले पत्र डायनाने ती गेल्यानंतरच वाचावे असे वचन मागितले, काय होतं त्या पत्रात? डायनाला हादरायला काय झालं?

**१५०रु. पोस्टेज २५रु.**

ओक, रानडे यांनी या कविता स्वरबद्ध केल्या. विजय काळे यांनी प्रास्ताविक केले.

*** 'फ्रेंड्स टू सपोर्ट' संकेतस्थळाला प्रतिसाद**

नजीकच्या भागातील रक्तदात्यांची माहिती एका क्लिकवर उपलब्ध व्हावी, यासाठी सुरू केलेल्या 'फ्रेंड्स टू सपोर्ट' या संकेतस्थळाला मोठा प्रतिसाद मिळत आहे, अशी माहिती धीरज जैन यांनी दिली.

पहिल्या नऊ दिवसांत नऊ हजार जणांनी संकेतस्थळाला भेट दिली. पाचशे जणांनी संकेतस्थळावर नावनोंदणी केली. दरम्यान www.friendstosupport.org या संकेतस्थळावर देशातील एक हजार ठिकाणांहून रक्त मिळत असून, रक्तदात्यांचे नाव, पत्ता, रक्तगट, दूरध्वनी क्रमांक उपलब्ध आहेत. एखाद्याला रक्त हवे असल्यास त्याच्या भागातील रक्तदात्यांची संपूर्ण माहिती मिळते.

*** 'इंडियाज् पार्लमेंटरी डेमोक्रॅसी ऑन ट्रायल'चे प्रकाशन**

''लोकशाहीमध्ये पंतप्रधान आणि मुख्यमंत्री हे प्रमुख लोकांमधून निवडून गेलेले असावेत ही अपेक्षा असते. आपले पंतप्रधान गेली अनेक वर्षे राज्यसभेवर निवडून येत आहेत; तर मुख्यमंत्री हेदेखील तोच कित्ता गिरवीत भविष्यात विधान परिषदेचे आमदार होणार आहेत. ही लोकशाही आहे का, हे नव्याने विचारण्याची वेळ आली आहे,'' असे मत माजी केंद्रीय गृहसचिव डॉ. माधव गोडबोले यांनी व्यक्त केले.

'साधना प्रकाशन'तर्फे डॉ. गोडबोलेलिखित 'इंडियाज पार्लमेंटरी डेमोक्रॅसी ऑन ट्रायल' या पुस्तकाचे प्रकाशन 'वनराई'चे अध्यक्ष मोहन धारिया यांच्या हस्ते झाले. यानिमित्ताने 'भारतीय लोकशाही धोक्याच्या वळणावर : स्वरूप व उपाय' या विषयावर गोडबोले यांचे व्याख्यान झाले.

गोडबोले म्हणाले, ''केंद्रातील अर्थसंकल्पी अधिवेशन हे गेल्या साठ वर्षांतील छोटेखानी ठरले. वेतन आणि भत्त्यांमध्ये वाढ किती असावी ही विचार करण्याची गोष्ट आहे. सरकारपेक्षाही लोकांचे प्रश्न खासदाराला कळतात हे ध्यानात घेऊन खासदार निधी सुरू करण्यात आला. हा निधी पूर्वी केवळ पन्नास लाख रुपये होता. त्यामध्ये वाढ होऊन तो पाच कोटी रुपयांवर गेला आहे. मुंबई महापालिकेच्या नगरसेवकाचा निधी २५ लाख रुपयांवर एक कोटी रुपयांवर गेला आहे. एखाद्याला खासदाराविरुद्ध निवडणूक लढवायची असेल, तर खासदाराने मतदारसंघात पाच वर्षांत २५ कोटी रुपये खर्च केलेले असल्यामुळे तो टिकू शकत नाही. त्यामुळे कायदा करून खासदारांचा निधी बंद करावा.''

राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारने 'राज्यसभेचा सभासद होण्यासाठी उमेदवार हा त्या राज्याचा नागरिक असण्याची आवश्यकता नाही' असा कायदा केला. त्याचा फायदा घेत पंतप्रधान आसाममधून राज्यसभेवर निवडून आले. त्यामुळे राज्यसभा ही

लोकसभेसारखीच झाली असे सांगून गोडबोले म्हणाले, ''जाहिरात आणि बातमी यातील फरक 'पेड न्यूज'मुळे कळत नाही. 'प्रेस कौन्सिल ऑफ इंडिया'ची अवस्था 'दात नसलेल्या वाघा'सारखी असून सरकारदेखील कोणावर कारवाई करू शकत नाही. असा बडगा उगारला तर सरकार मतस्वातंत्र्याच्या विरोधी अशी हाकाटी पिटली जाईल.''

धारिया म्हणाले, ''खासदार झालो म्हणजे आपण राजे झालो अशीच लोकप्रतिनिधींची भावना असते. असे नेते लोकशाही मूल्यांचे रक्षण आणि संवर्धन करणार की नाही हा खरा प्रश्न आहे.''

डॉ. नरेंद्र दाभोलकर यांनी प्रास्ताविक केले. मनीषा महाजन यांनी आभार मानले.

*** वकील-पक्षकारांसाठी डिरेक्टरीचे प्रकाशन**

वकील आणि पक्षकारांना उपयुक्त ठरणाऱ्या 'डिरेक्टरी' आणि 'इन परस्युट ऑफ जस्टिस' या मासिकाचे प्रकाशन मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश दिलीप कर्णिक आणि मदन जोशी यांच्या हस्ते झाले.

पुणे बार असोसिएशनच्या वतीने आयोजित कार्यक्रमात सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती हेमंत गोखले, उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती मोहित शहा, पुण्याचे प्रभारी जिल्हा मुख्य न्यायाधीश एस. एन. सरदेसाई, असोसिएशनचे अध्यक्ष मिलिंद पवार, बार कौन्सिलचे सदस्य हर्षद निंबाळकर आदी उपस्थित होते. या 'डिरेक्टरी'मध्ये वकिलांचे घर आणि कार्यालयाचे पत्ते, संपर्कासाठी दूरध्वनी आणि मोबाईल क्रमांक याची माहिती आहे. चार हजारांहून अधिक वकिलांची माहिती यात आहे.

'इन परस्युट ऑफ जस्टिस' या मासिकात विधी क्षेत्राशी संबंधित विषयावरील चर्चा, निवृत्त न्यायाधीशांचे लेख याचा समावेश आहे. संपादिका लीला गोखले या वेळी उपस्थित होत्या.

*** ऑडिओ पुस्तकाचे प्रकाशन**

'रात्र गहिरीच्या तिसऱ्या प्रहरी' या अविनाश धर्माधिकारी यांच्या ऑडिओ पुस्तकाचे प्रकाशन भीष्मराज बाम यांच्या हस्ते नुकतेच झाले. चाणक्य मंडल परिवार प्रकाशनने ते प्रसिद्ध केले आहे. त्यात धर्माधिकारी यांच्या गाजलेल्या ५९ कवितांचा समावेश आहे. महेश लिमये यांनी या पुस्तकाची निर्मिती केली आहे. पूर्णा धर्माधिकारी यांनी सूत्रसंचालन केले.

*** थोर निरुपणकार नानासाहेब धर्माधिकारी यांचे स्मारक**

समाजाची उंची वाढविण्यासाठी सद्विचारांच्या प्रभावाची गरज असते. नानासाहेबांच्या स्मारकातून अशा विचारांची प्रेरणा समाजातील शेवटच्या घटकाला मिळेल. संपूर्ण मानवी समाजाला दृष्टी देणारे, सद्विचारांचा प्रचार कशाचीही अपेक्षा न बाळगता

करणारे नानासाहेब महामानव होते, असे उद्‌गार केंद्रीय कृषीमंत्री शरद पवार यांनी काढले.

वढाव खुर्द येथे निरुपणकार डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांचे राष्ट्रीय स्मारक उभारले जाणार आहे. या कामाचे भूमिपूजन पवार यांच्या हस्ते झाले. स्वधर्म, स्वदेव व स्वदेश या त्रिसूत्रीचे पालन करणाऱ्या नानासाहेबांच्या स्मृत्यर्थ उभी राहणारी वास्तू हे सद्‌विचारांचे स्मारक व्हावे अशी अपेक्षा पवार यांनी व्यक्त केली.

नानासाहेबांचे स्मारक ही केवळ भौतिक वास्तू नसेल तर त्यांच्या विचारांची ज्योत सतत तेवत ठेवणारा नंदादीप आणि समाजप्रबोधनाचे प्रेरणास्रोत बनले पाहिजे, अशी अपेक्षा अजित पवार यांनी व्यक्त केली.

हा भव्यदिव्य सोहळा 'याचि देही याचि डोळा' पाहून मनात साठवून ठेवण्यासाठी देशभरातील साडेचार लाख श्रीसदस्यांनी हजेरी लावली होती. नानासाहेबांवरील प्रेमाचे व शिस्तीचे अनोखे दर्शन घडले.

*** दलित-ग्रामीण साहित्यातील शब्दभांडार**

ग्रामीण आणि दलित साहित्यातील न समजणाऱ्या शब्दांचे अर्थ समजावून सांगणाऱ्या शब्दकोशाची निर्मिती करण्यात येणार आहे. या शब्दकोशातील 'अ ते घ' पर्यंतच्या शब्दांचा पहिला खंड मे महिन्यात प्रसिद्ध होणार आहे. ग्रामीण, दलित साहित्यातील अनेक शब्दांचा अर्थ समजत नाही. त्यामुळे प्रमाण समजली जाणारी मराठी भाषा आणि असे साहित्य यांना एकत्रित आणण्यासाठी राज्य मराठी विकास संस्थेतर्फे 'दलित ग्रामीण साहित्य शब्दकोशा' चा प्रकल्प २००३ पासून सुरू आहे. या प्रकल्पाचे प्रमुख गंगाधर पानतावणे आहेत. प्रकल्पासाठी २७ जणांची एक 'टीम' तयार करण्यात आली आहे. शब्दकोशासाठी १९४० ते २००५ पर्यंतच्या कालखंडातील सर्व लेखकांच्या सुमारे आठ हजार कथा, कादंबरी, नाटक, आत्मकथन, कविता अशा ग्रामीण साहित्यातील ललित साहित्यकृतींचे वाचन करून प्रमाण भाषेत नसलेल्या शब्दांचा शोध घेऊन हा कोश तयार करण्यात येत आहे.

गेल्या आठ वर्षांतील कामानंतर आता शब्दकोशातील 'अ ते घ' पर्यंतचा पहिला खंड पूर्णत्वाच्या टप्प्यात आहे. हा खंड दोनशे पानांचा असून, त्यात सुमारे २५०० शब्दांचा समावेश असेल. शब्द त्यानंतर वाक्य, साहित्य प्रकाराचे शीर्षक, लेखक, पृष्ठ क्रमांक आणि अखेरीस संबंधित शब्दाला कमीत कमी तीन संदर्भ अशी रचना आहे.

संबंधित शब्दकोशातील काही उदाहरणार्थ असलेले शब्द असे - अंकर - गुरांच्या विश्रांतीची जागा, अंबवण्या - पेरणीवेळी गायली जाणारी गाणी, अंधकल्यावाणी करणे - नाराजी व्यक्त करणे, इजाट - प्रेत उकरून काढणारा प्राणी अशा अभिजात मराठी भाषेला ज्ञात नसणाऱ्या शब्दांचा समावेश आहे.

### * मराठीचा विश्वसंचार

ऐक्यभारती आणि पुणे विद्यापीठाच्या 'भारतीय भाषांचे जगातील स्थान व सार्थकता' या विषयावर आयोजित परिषदेमध्ये देशपरदेशातील प्रतिनिधींनी विविध भाषांवर पेपर सादर केले.

मराठी भाषेपुढील आव्हाने या विषयावर श्याम भुर्के यांनी सादर केलेल्या पेपरमध्ये म्हटले आहे, ''जगातील १२५ देशांमध्ये मराठी माणसे राहतात. मॉरिशसमध्ये प्रत्येक महाविद्यालयात मराठी हा विषय शिकवला जातो. कराची महानगरपालिकेत मराठीचा वापर होतो. सिंगापूर येथे २५००० मराठी भाषक आहेत. फिजी बेटावर मराठीचा वापर होतो. मॉस्को, सिडनी, मॉरिशस, दुबई अशा ४४ शहरात, जगभर मराठी नभोवाणी केंद्रे कार्यरत आहेत. नारायण जगन्नाथ विद्यालय ही मराठी शाळा कराचीमध्ये आहे. त्या शाळेचे विद्यार्थी गुणवत्ता यादीत झळकतात. दरवर्षी थाटाने मराठी साहित्य संमेलन भारतात साजरे केले जाते तसचे मराठी विश्व संमेलनही आयोजित केले जाते. मराठी नाट्य संमेलनही भारतात आणि भारताबाहेर आयोजित केले जाते. जगभर प्रमुख शहरात महाराष्ट्र मंडळे कार्यरत आहेत. ते नियमितपणे मराठी ई-वृत्तपत्रे वाचतात. दिवाळी, गणेशोत्सव असे मराठी सण साजरे करतात. हरियाना राज्यात ६.५ लाख मराठी भाषिक आहेत. गोव्यातील सर्व सरकारी कागदपत्रे मराठीत लिहिली जातात. मध्यप्रदेशात मराठी अकादमीची स्थापना झाली आहे. संगणकावर कंट्रोल पॅनेलवर लोकेशन 'इंडिया' नमूद केल्यावर भारतीय भाषांमधून व्यवहार करता येतो. त्यात मराठीचाही अंतर्भाव आहे. त्यामुळे मराठी जगभर पोहोचणे सुलभ झाले आहे. यु ट्यूब, फेसबुक, संकेतस्थळे यावर अधिकाधिक मराठी मजकूर दिल्याने मराठी सर्वदूर पोहोचत आहे. जगातील ६५०० भाषा ६५० कोटी लोक बोलतात. यात मराठीचा क्रमांक दहावा. मराठी चित्रपटांचे नामांकन 'ऑस्कर'साठी होत असते. त्यामुळे मराठीचे भवितव्य उज्ज्वल आहे.''

### * 'रणरागिणींचा देश' प्रकाशन

जन्माला येण्यापूर्वीच मुलींना संपविले जाते, हे अत्यंत दुर्दैवी आहे. पृथ्वीला





दुसरी आवृत्ती

**पोस्टमास्तर** आणि इतर कथा

**रवीन्द्रनाथ ठाकूर    अनु. मृणालिनी गडकरी**

सर्वच प्रसंगांतून कणखरपणे उभं राहून आत्मविकास साधणाऱ्या स्त्रीच्या भावनांचा सुंदर गोफ विणणाऱ्या रवीन्द्रनाथ ठाकूरांच्या आशयघन कथा...

**१४०रु.   पोस्टेज २५रु.**

सशक्त करण्यासाठी पर्यावरणाला वाचविण्याची गरज आहे, त्याप्रमाणेच समाजाचे सशक्तीकरण व मानवाच्या भविष्यासाठी मुलींचे संरक्षण महत्त्वाचे आहे, असे विचार राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांनी व्यक्त केले. समाजात आज निर्माण झालेले विविध दोष घालविण्यासाठी स्वातंत्र्याच्या काळात निर्माण केलेले वातावरण आता का तयार होत नाही, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला.

अहिल्याराणी महिला विकास व शैक्षणिक संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'रणरागिणींचा देश' या कार्यक्रमात सोळाव्या शतकापासून आजपर्यंतचा महिलांचा वैभवशाली इतिहास असलेल्या लघुपटाचे व पुस्तकाचे प्रकाशन झाले. कृषी व पणन मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, माजी न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी, कॅनरा बँकेचे व्यवस्थापकीय संचालक एस. रामन, चित्रपट निर्माते आशुतोष गोवारीकर, 'राइझअँडशाईन'च्या संचालिका भाग्यश्री पाटील, 'रणरागिणींचा देश' च्या निर्मात्या व संस्थेच्या अध्यक्षा नीलिमा तपस्वी उपस्थित होत्या.

राष्ट्रपती म्हणाल्या की, महिलांची स्थिती सुधारण्यासाठी अनेक उपाय करण्यात आले आहेत. पंचायत राज व्यवस्थेत एकतृतीयांश आरक्षणही देण्यात आले आहे. परंतु महिलांची सर्वांगीण प्रगती होण्यासाठी त्यांचे सर्वार्थाने सशक्तीकरण गरजेचे आहे. महिला कुटुंब, समाज व देशाच्या विकासात बरोबरीच्या भागीदार होतील अशा वातावरणाची निर्मिती करणे, हा त्यामागचा एकच हेतू आहे.

माजी न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी यांनी भाषणामध्ये सामाजिक स्थिती विशद करताना एक शेर ऐकविला, 'एक खता हम उम्रभर करते रहे... धूल चेहरेपर थी और हम आईना साफ करते रहे', असा तो शेर होता. राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांनी भाषणात या शेरचा उल्लेख करुन म्हटले, ''आता आपल्या चुकांना सुधारले पाहिजे, आईना साफ करनेसे पहिले दिल को साफ करो.'' राष्ट्रपतींच्या या वक्तव्याला उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली.

### * ई-लर्निंग ही काळाची गरज

उच्च शिक्षणात चांगल्या शिक्षकांची उणीव जाणवत असून, ही उणीव ई-लर्निंगमुळे भरून निघेल. शिक्षण क्षेत्रातील समस्या लक्षात घेता ई-लर्निंग ही काळाची गरज बनली आहे, असे प्रतिपादन पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रघुनाथ शेवगावकर यांनी केले. मराठा चेंबर ऑफ कॉमर्स आणि उत्कर्ष प्रकाशन यांच्या वतीने डॉ. दीपक शिकारपूर लिखित 'उद्याचे संगणक' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

डॉ. शेवगावकर म्हणाले की, महाविद्यालयामधून चांगल्या विद्यार्थ्यांची संख्या वाढत आहे. पण चांगले विद्यार्थी कमी आहेत. चांगले शिक्षकही मिळत नाहीत. पीएच.डी. साठी मार्गदर्शकांची संख्याही कमी पडत आहे. या साऱ्या समस्यांवर ई-लर्निंग हा यावर प्रभावी उपाय आहे. यामुळे पैशाची, श्रमांची आणि वेळेची बचत

होईलच, पण शिक्षण हे सर्वदूर पसरण्यास मदत होईल. उच्च शिक्षणात 'ई-लर्निंग' ही पद्धत वापरात आणणे गरजेचे आहे. आयआयटीचे काही प्राध्यापक अभियांत्रिकी शाखेचा अभ्यासक्रम ई-लर्निंग पद्धतीने करण्याचा प्रयत्न करत आहेत. हा प्रयोग जर यशस्वी झाला तर उच्चशिक्षणातील अनेक समस्यांचे निराकरण होईल. ई-लर्निंगचा वापर मोठ्या प्रमाणात करणारा भारत हा जगातील पहिला देश असेल. चांगले मनुष्यबळ तयार करायचे असेल तर शिक्षणातील अशा प्रकारचे बदल स्वीकारले पाहिजेत आहे.

शिकारपूर म्हणाले की, एखाद्या नवीन तंत्रज्ञानाचा वापर करताना स्थानिक भाषा, त्यातील माहितीची गोपनीयता, त्या तंत्रज्ञानाची किंमत या समस्यांना तोंड द्यावे लागते. म्हणूनच त्यासाठी असे तंत्रज्ञान निर्माण करताना या समस्यांचा विचार करणे आवश्यक आहे.

*** राजा परांजपे चित्रपट महोत्सव**

'राजाभाऊंच्या चित्रपटाचा महोत्सव म्हणजे नवीन कलाकारांसाठी कार्यशाळा आहे,' असे विचार ज्येष्ठ दिग्दर्शक राजदत्त यांनी 'राजा परांजपे महोत्सवा'च्या उद्घाटन प्रसंगी व्यक्त केले.

उद्घाटन सोहळ्यात कौशल इनामदार (संगीतकार), सतीश राजवाडे (दिग्दर्शक), मुक्ता बर्वे (अभिनेत्री), श्रेयस तळपदे (अभिनेता) यांना 'तरुणाई सन्मान' पुरस्कार प्रदान करण्यात आला.

प्रतिष्ठानच्या अध्यक्षा अर्चना राणे, सचिव वीरेंद्र चित्राव, निमंत्रण स्मिता तळवलकर, राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयाचे संचालक प्रशांत पाठराबे उपस्थित होते.

राजदत्त म्हणाले, ''कलाकारांचे आयुष्य किती, हे महत्त्वाचे नाही. त्यांची प्रत्येक कलाकृती त्यांना हुरूप देत असते. आपल्या कलाकृतीतून समाजाला आनंद देण्याचे, अंतर्मुख करण्याचे काम केले, तरच स्वत:ला कलाकार म्हणवून घ्यावे, अशी त्यांची भावना होती. राजा परांजपे यांचे चित्रपट म्हणजे नवीन विचार असायचे. प्रत्येक चित्रपटाचे नवे आव्हान असायचे. प्रत्येक चित्रपटाची मांडणी वेगवेगळी असायची. चित्रपटसृष्टीतील त्यांचे कार्य समाजापर्यंत नेण्याची जबाबदारी आपलीही आहे. मराठी चित्रपटाचा संसार गरिबीचाच राहणार आहे; पण मराठी चित्रपटाला नैसर्गिक तटबंदी नाही. परांजपे यांनी निर्माण केलेले चित्रपट मैलाचा दगड आहेत. राजाभाऊ कलावंत म्हणून आयुष्यभर जगले. प्रेक्षकांच्या हृदयाला भिडेल अशा कलाकृती निर्माण करीत राहणे हा जीवनातील आदर्श त्यांनी मानला.''

स्मिता तळवलकर म्हणाल्या, ''कलाकारांनी पाय जमिनीवर ठेवून वाटचाल केल्यास यश नक्की मिळते. रसिकांमुळे आपण आहोत हे कधी विसरता कामा नये.''

समारंभानंतर 'चित्रतपस्वी राजा परांजपे' हा लघुपट दाखविण्यात आला. ❐

# विशेषवार्ता

*** नथिंग टू लूज - प्रकाशन**

'नथिंग टू लूज' ह्या ली चाइल्ड लिखित पुस्तकाचा अनुवाद मेहता पब्लिशिंग हाऊसने प्रकाशित केला आहे. ह्या अनुवादित पुस्तकाचे प्रकाशन ज्येष्ठ साहित्यिक वसंत नरहर फेणे यांच्या हस्ते २ एप्रिल रोजी आविष्कार सांस्कृतिक केंद्र माहीम येथे करण्यात आले.



उदय कुलकर्णी, वसंत फेणे, आबिद सुरती

या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे हिंदी साहित्यिक आबिद सुरती यांची उपस्थिती.

मनोज आचार्य यांनी फेणे व आबिद सुरती यांचा परिचय करून दिला.

अनुवादक उदय कुलकर्णी म्हणाले, ''माझ्या काही कथा यापूर्वी प्रसिद्ध झाल्या होत्या. नथिंग टू लूज ही थरारकथा असली तरी त्यापलीकडे जात धार्मिक कट्टरतावादावर भाष्य करते. हा वाद टोकाला जाऊन किती निरर्थक हत्या घडवू शकतो ते दाखवते. युद्धाचे, मानवाने शोधलेल्या बॉम्बचे मानवावरच किती भयानक परिणाम होतात ते

दाखवते. सर्वांत महत्त्वाचे, १८-१९ वर्षाच्या कोवळ्या तरुणांना माणसे मारण्याचे प्रशिक्षण देऊन युद्धभूमीवर पाठवले जाते. ते युद्धही केवळ सत्ताधारी व्यक्तीला आपल्या स्वार्थासाठी हवे आहे म्हणून पुकारलेले असते. देशाचे रक्षण वगैरे बाबींशी त्याचा संबंध नाही. सैनिकाने मग प्राण पणाला का लावायचे?''

आबिद सुरती म्हणाले, ''माझ्या लेखनाची सुरुवात कॉमिक्सच्या अनुवादापासून झाली. अनुवादकाने शब्दश: भाषांतर करू नये, तर अर्थ ओळखून नेमका अनुवाद करावा. 'अ ड्रॉप इन ओशन' याचा अनुवाद हिंदीत समुंदरमें एक बूंद असा केला तर तो चुकीचा होईल. मी त्याचा अनुवाद केला 'उंटके मुंहमें जीरा.' ''

फेणे म्हणाले, ''अनुवादाबरोबरच अनुकरणही व्हावे, म्हणजे जो साहित्यप्रकार मराठी नाही तो मराठीत आणावा. कुलकर्णी यांना अर्थविषयात चांगली गती आहे. त्यामुळे या विषयावर एखादी कादंबरी त्यांनी लिहावी.'' नाटककार जयंत पवारही उपस्थित होते.

*** आनंदाचे पासबुक - प्रकाशन**

'आनंदाचं पासबुक' हे पुस्तक वैचारिक दिशा देऊन व्यक्ती व घटना यांचे बारकावे दाखवून प्रेरणा देणारे आहे, असे मत अभिनेते राहुल सोलापूरकर यांनी व्यक्त केले.

मेहता पब्लिशिंग हाऊस व अक्षरधारा बुक गॅलरी यांच्या वतीने श्याम भुर्केलिखित 'आनंदाचं पासबुक' या पुस्तकाचे प्रकाशन सोलापूरकर यांच्या हस्ते झाले. या वेळी ज्येष्ठ संगीतकार आनंद मोडक, प्रकाशक सुनील मेहता उपस्थित होते.

सोलापूरकर म्हणाले, ''भुर्के यांच्याकडे उत्तम भाषणशैली आहे. त्यांच्यातील




'आनंदाचं पासबुक' या पुस्तकाचे प्रकाशन करताना (डावीकडून) आनंद मोडक, राहुल सोलापूरकर, श्याम भुर्के, सुनील मेहता

हजरजबाबीपणा, प्रसंगावधान याची प्रचिती पानोपानी येते. अनेक थोरामोठ्यांच्या सहवासात त्यांनी एवढे ज्ञान मिळविले आहे, की यामुळे ते त्यांच्या रांगेत आले आहेत. स्वत: बँकेचे अधिकारी असूनही लिखाणात कोठेही मोठेपणा मिरवलेला नाही.''

मोडक म्हणाले, ''भुर्के आमचे बँकेत प्रशिक्षक होते. त्यांचा तास हा सर्वांत उत्साही व खेळीमेळीचा होत असे. त्यामुळे जेवणानंतरचा तास असूनही आवर्जून सर्वच विद्यार्थी उपस्थित राहत असत. त्यांचा चैतन्यमयी स्वभाव, विनोदी दृष्टीकोन व कोणतीही गोष्ट अधिक रसरशीत करून मांडण्याची उत्तम शैली या पुस्तकातही आढळून येते. यातील प्रसंग खूप काही शिकवून जातात, प्रेरणा देतात. त्यांच्या प्रसन्न शैलीमुळे त्याचे वाचन आनंददायी होते.''

या पुस्तकात बँकेचे कामकाज, खातेदारांच्या आठवणी, वरिष्ठ अधिकाऱ्यांचे आदर्श अशा अनेक गोष्टींचा उलगडा केला आहे. सुभाष इनामदार यांनी सूत्रसंचालन केले. लक्ष्मण राठिवडेकर यांनी आभार मानले.


**आनंदाचं पासबुक**

**श्याम भुर्के**




**३००रु.**
**पोस्टेज ३०रु.**

दुर्दम्य इच्छाशक्ती असेल तर माणूस अनेक क्षेत्रात यश प्राप्त करू शकतो.
श्याम भुर्के यांनी 'बँक ऑफ महाराष्ट्र'मध्ये यशाचे शिखर गाठले.
साहित्य व कला क्षेत्रात भरारी मारली. वि.स. खांडेकर, आचार्य अत्रे, पु.ल. देशपांडे, रणजित देसाई, जगदीश खेबूडकर, राम गबाले, भीमसेन जोशी, शरद तळवलकर, सुरेश भट, वामनराव चोरघडे, प्रा. शिवाजीराव भोसले अशा अनेक नामवंतांसंबंधीच्या आठवणी आनंददायी आहेत. डॉ. शिवाजीराव पटवर्धन, डॉ. स्वर्णलता भिशीकर यांच्या समाजकार्यात ते सहभागी झाले. खुमासदार अत्रे, पु.ल. एक आनंदयात्रा, नंदादीप–वि.स. खांडेकर, साहित्यिक सावरकर, गोनीदां-एक झंझावात, व्यंकटेश माडगुळकरांची गोष्ट, मिरासदारी, शरद तळवलकर–गुदगुल्या असे कार्यक्रम रसिकांपर्यंत पोहोचविले. ज्याला आयुष्यात मोठं व्हावंसं वाटतं, यशस्वी व्हावंसं वाटतं, आनंदी रहावंसं वाटतं; त्याला हे पुस्तक नक्कीच प्रेरणा देईल.




*विनोदकार द.मा.मिरासदार यांच्या १८ पुस्तकांचे पुनर्प्रकाशन गेल्या महिन्यात झाले. त्या निमित्ताने त्यांच्या कथाविश्वाचे आणि जीवनविषयक दृष्टिकोनाचे वेगळेपण सादर करणारे साहित्य देत आहोत.* - ***संपादक***

द. मा. मिरासदारांचे कथालेखन मराठी कथेच्या नवकथा, विनोदी कथा आणि ग्रामीण कथा अशा विविध धारांशी संबंधित आहे. या सर्व प्रवाहांमध्ये मिरासदारांनी आपले वैशिष्ट्यपूर्ण स्थान निर्माण केले आहे.

**जीवनाचा साहित्यकृतीशी अनुबंध -** कथाकार आणि कथाकथनकार म्हणून मराठी रसिकमनावर द. मा. मिरासदारांचा पगडा आहे.

मिरासदार आपल्या बालपणापासूनच लेखक होण्याची आकांक्षा बाळगून होते.

पंढरपूरसारख्या गावात त्यांचे शालेय शिक्षण झाले. वडिलांचा वकिलीचा व्यवसाय, त्यानिमित्ताने पंचक्रोशीतील खेड्यापाड्यांतून येणारे अशील, त्यांच्या नाना समस्या आणि त्यांचा काथ्याकूट ह्या वातावरणात मिरासदार वाढत होते. वारीचा काळ वगळता एरव्ही सुस्त असलेल्या पंढरपूरच्या वातावरणात रात्ररात्र चालणारी गप्पाष्टके त्यांनी कानामनात साठविली. त्या गप्पाष्टकांत कोठलेही विषय वर्ज्य नसत. 'सुरस ग्रंथमाला' ही प्रकाशन संस्था आणि व्होरा वकिलांचे पुस्तकांचे दुकान यांचा मिरासदारांनी पुरेपूर फायदा घेतला आणि गप्पागोष्टींबरोबरच वाचनाचाही छंद जोपासला. हरिभाऊ, नाथमाधव, ना. ह. आपटे, फडके-खांडेकर तसेच कोल्हटकर, गडकरी, आचार्य अत्रे, चिं. वि. जोशी, पु. ल. देशपांडे अशा साहित्यिकांच्या साहित्य वाचनातून मिरासदारांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण झाली.

लहानपणी अनुभवलेले खेड्यांतील मुक्त वातावरण, खेडेगावातील माणसे मिरासदारांच्या कथांमधून नव्याने सजीव होऊ लागली. मिरासदारांच्या जीवनाचा साहित्याशी असलेला अनुबंध त्यांच्या कथारूपांतून दृगोचर होतो.

१९५१ मध्ये मिरासदारांची 'रानमाणूस' ही पहिली कथा सत्यकथेत प्रसिद्ध झाली. यानंतर १९५७ मध्ये 'माझ्या बापाची पेंड' हा पहिला कथासंग्रह प्रकाशित झाला. यानंतर झपाट्याने मिरासदारांचे कथालेखन सुरू झाले.

कथालेखनाबरोबरच रूपांतरित, भाषांतरित कादंबरीलेखन, नाट्यलेखन, ललित

लेखन, चित्रपट कथालेखन अशा वाङ्मय प्रकारांतून मिरासदारांनी लेखन केले. पण त्यांची प्रतिभा खऱ्या अर्थाने बहरली ती कथालेखनातच!

'माझ्या बापाची पेंड'पासून 'गोष्टीच गोष्टी' या १९९३ मधल्या कथासंग्रहापर्यंत मिरासदारांनी चोवीस कथासंग्रहातून दोनशे सतरा कथांची भर घातली व मराठी कथा वाङ्मयात स्वत:चे असे वैशिष्ट्यपूर्ण स्थान निर्माण केले.

**मिरासदारी कथेचे आशयविश्व -** मिरासदारांची कथा ही नवकथेच्या कालखंडातील कथा आहे. जीवनाची अनेकविध क्षेत्रे धुंडाळणाऱ्या नवकथेच्या संस्कारातून मिरासदारांच्या कथेला वेगळेपण लाभले आहे. त्यामुळे त्यांची कथासृष्टी ग्रामपरिसर, नागरपरिसर, दुरस्थ काल्पनिक परिसर अशा विविध परिसरांतून विहार करते. जीवनाचे विविधांगी दर्शन घडविते.

लहान मुलांपासून वृद्धांपर्यतच्या, सज्जनांपासून चोरदरोडेखोरांपर्यंतच्या विविध मानवी जाणीवांचा प्रत्यय मिरासदारांच्या कथासृष्टीतून येतो.

**आशयाचे विविध प्रांत-** बालमानसशास्त्राचा अभ्यास करूनही अवखळ बालमन समजणे अवघड. पण मिरासदारांनी आपल्या कथासृष्टीत बालमनाचे नाचरे कवडसे टिपून अवखळ, चैतन्यदायी बालविश्व उलगडून दाखविले आहे. बालमनाची निरागसता किंचितही ढळू न देता मुलांच्या नजरेतून प्रौढांचे अनुभवविश्व, त्यांच्या विश्वातील विसंगती यांचे आविष्करण समर्थपणे केले आहे.

साधारणपणे मृत्युप्रसंगी शोकाचा, दु:खाचा एक मुखवटा धारण करून माणसांचा समुदाय जमलेला असतो, दु:ख असो नसो, हेच चित्रण साहित्यातूनही आविष्कृत होत आले आहे. मिरासदारांनी आपल्या कथा प्रांतातून मृत्यूप्रसंगातील हा मुखवटा बाजूला करून त्याचे खरे रूप समोर ठेवले आहे. त्यामुळे जीवनातील विपरित वास्तवावरही प्रकाश टाकला जातो. मृत्यूच्याच सान्निध्यात 'मृत्यू' या घटितावर घडणारा विनोद, मिरासदारांच्या विनोदशैलीचा अनोखा चमत्कारच म्हणावा लागेल. हा चमत्कार मिरासदारांनी 'विरंगुळा' सारख्या कथांत करून दाखविला आहे. मृत्यूचे गांभीर्य कायम ठेवून विनोद फुलवण्याचा प्रयत्न मराठी कथाप्रांतात मिरासदारांनीच मोठ्या प्रमाणावर केलेला दिसतो. मृत्यू आणि विनोद अशी विसंगत सुसंगती मिरासदारांच्या कथांत अनुभवास येते. मृत्यूच्या सान्निध्यात विनोद घडत असताना पुन्हा मृत्यूसारख्या विषयाची टिंगलटवाळी कोठे होत नाही.

पोलिस खाते, विविध शासकीय खाती, शिक्षणक्षेत्र, न्यायक्षेत्र याशिवाय लहानमोठ्या व्यवसायक्षेत्रांमधील द्रव्यलोभ, निष्क्रियता, कामचुकारपणा, बेजबाबदारपणा अशा अपप्रवृत्तींचे मिरासदारांनी मोठ्या प्रमाणावर चित्रण केले आहे.

ढासळत्या मूल्यांचे असे प्रदर्शन करून मिरासदार त्यातून अप्रत्यक्षपणे मूल्यसूचनच करतात. राजकीय अपप्रवृत्तींचे सूचन करताना पशूसृष्टीचा वेधक वापर करून

मिरासदार आपल्या कथांना वेगळेपण प्राप्त करून देतात. मिरासदारांच्या अशा मूल्यगर्भ दृष्टीमुळे त्यांच्या कथांना सामाजिकतेचे परिमाण लाभते.

पौराणिक वातावरणाशी, ऐतिहासिक वातावरणाशी जुळते काल्पनिक वातावरण असणाऱ्या त्यांच्या कथा वर्तमानाचे प्रतिमित रूप चितारतात. मराठी कथासृष्टीत मिरासदारांच्या कथांचे हे आगळे वैशिष्ट्य आहे.

मिरासदारांच्या कथांमधून दारिद्र्याचे दर्शन अभावानेच घडते. खरे तर त्यांच्या कथांमध्ये स्वीकारलेला जीवनपट हाच मुळात दारिद्र्याने विणलेला आहे. तरीही त्यांच्या कथात दारिद्र्याचे चित्रण अभावानेच येते. जेथे कोठे येते तेथे मात्र परिणामकारक आहे. विषम समाजरचनेत मेहनत आणि मेहनताना याचा संबंध कसा तुटलेला असतो याचे भेदक दर्शन मिरासदार घडवितात. शोषक आणि शोषित अशा भूमिकेतून वावरणारे दोन्ही सामाजिक गट तसेच दारिद्र्याला खतपाणी घालणारी विषम समाजरचना साकार करून मिरासदार दारिद्र्य ध्वनित करतात.

द. मा. मिरासदारांच्या कथेतील स्त्रीपुरुष संबंधाचे चित्रण ढोबळ व पारंपरिक आहे. शारीर पातळीवर वावरणारे आहे. अर्थात त्यांनी निवडलेला जीवनपट आणि त्या जीवनातील स्त्रीपुरुष संबंधातील वास्तव यामुळेही या चित्रणाला मर्यादा पडल्या आहेत. तरीही त्यांच्या कथांत मुद्दाम असे स्त्रीचित्रण कोठेही दृष्टीस पडत नाही. येते ते अनुषंगानेच! रिकामटेकड्या पुरुषवर्गाच्या नजरेतून त्यांच्या कथेतील स्त्री प्रकट होत असते. त्यामुळे स्त्रीचे एकांगी रूप दिसते. ती स्वत: कथांमध्ये कोठेही आपले मनोगत व्यक्त करीत नाही. ‘कोणे एके काळी’मधील मोहिनी, ‘एका राजकन्येचे हरण’मधील श्रीलेखा यासारख्या स्त्रिया अपवाद आहेत. पण हेही प्रयत्न तसे अपुरेच वाटतात. ‘प्रदर्शन’सारख्या कथेतून नव्या औद्योगिक जीवनशैलीतून प्रतीत होणारी स्त्रीदृष्टी (हवाई सुंदरी) आणि परंपरागत ग्रामीण स्त्रीदृष्टी यातील अंतर सूचित होते.

विविध प्रकारची आंदोलने, नवे विचार, त्यामागील तत्त्वे यांच्यातील वृत्तीगांभीर्य आणि नैतिक जाणीव यांचा समाजजीवनात राजकीय जीवनात लोप होऊ लागला. त्याला संधिसाधू राजकीय पवित्र्यांचे स्वरूप आले. या परिस्थितीचे हास्यास्पद विडंबन करून या मार्गांना लाभलेल्या भ्रष्ट स्वरूपावर मिरासदार नेमके बोट ठेवतात. या दृष्टीने त्यांच्या कथांना सामाजिक खोली प्राप्त होते.

ग्रामीण अध्यात्मनिष्ठेचा, श्रद्धाळूपणाचा भाव व्यक्त होत असताना त्यातील श्रद्धाभावाची उत्कटता जपूनही अंधश्रद्धेचे नकळतपणे निराकरण करणाऱ्या ‘वाटणी’, ‘देवाचिये द्वारी’ सारख्या कथा मिरासदारांचे वेगळेपण दाखवितात.

मिरासदारांचा कथाप्रपंच मानवी स्वभावाविषयी वाटणाऱ्या कुतूहलातून निर्माण झाला आहे. त्यांच्या कथांच्या केंद्रस्थानी माणूसच आहे. त्यामुळे आशयाच्या प्रकटीकरणात वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिरेखांचे दर्शन घडते.

मिरासदारांच्या कथांतील पात्रसृष्टी नमुनेदार, ठोकळेबाज नाही तर वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्यांच्या कथातील पात्रसृष्टीत सामान्य माणसेच आहेत. बाबू पहिलवान, नाना चेंगट, रामा खरात, गणा मास्तर, शिवा जमदाडे अशा ग्रामपरिसरातील मानसपुत्रांनी मिरासदारांची कथासृष्टी गजबजलेली आहे. एकाच समाजविश्वातील, एकाच वातावरणातील ती पात्रे असूनही आपल्या सूक्ष्म स्वभाववैशिष्ट्यांनी ती परस्परांपेक्षा वेगळी ठरतात. स्वतंत्र वाटतात.

प्रो. कावळे, नाना घोडके, सोम शर्मा, मोहिनी, तात्या, विठोबा, बादशहा, सोनार, बाबू महार, भिकू सोनार, नाना साळुंके, म्हातारी धुरपदा अशा एक ना अनेक वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिरेखामधून मिरासदार जिवंत, अकृत्रिम समाज निर्माण करतात.

समूहदर्शनातून ते एकाच वेळी अनेक व्यक्तिरेखा समृद्धपणे उभ्या करतात आणि त्याबरोबरच त्या विशिष्ट समूहालाही एक व्यक्तिमत्त्व प्राप्त करून देतात. हा मिरासदारांच्या व्यक्तिचित्रणाचा एक आगळा पैलू आहे. मिरासदारांच्या अनेक कथांमध्ये समूहाचे प्रकटीकरण होते. त्या समूहात, समूहाच्या त्या गलबल्यात वाचक समरसतेने मिसळून जातो. विविध व्यक्तिस्वभाव न्याहाळण्यात तो दंग होऊन जातो. दरवेळी तो समूह वेगवेगळ्या वैशिष्ट्यांसह अवतरतो. मराठी कथासृष्टीत समूहाचे असे अभिनव दर्शन मोठ्या सामर्थ्याने मिरासदारांनीच घडविले आहे. त्यातून मानवी मनाची विविध स्पंदने, जीवनानुभवाचे अनेक पदर, मूलभूत जीवन जाणिवा यांचा प्रत्यय देत देत मिरासदार एक जिवंत समाजविश्व साकार करतात.

वातावरण, परिसर, ढंगदार भाषा, पात्रांच्या लकबी, निवेदन यांचा उचित वापर करून मिरासदार व्यक्तिचित्रण प्रभावी करतात.

मिरासदारांची कलात्मक, अलिप्त, विश्लेषक, वस्तुनिष्ठ दृष्टी त्यांच्या पात्रांना कथेत मुक्तपणे प्रकट होण्यास वाव देते. त्यामुळे लेखकाच्या व्यक्तिगत विचारांच्या प्रभावापासून पात्रसृष्टी स्वतंत्र व स्वंयपूर्ण राहते.

मिरासदाराच्या कथांचे विश्व हे खट्याळ, मिस्कील, अशिक्षित, बेरकी हुशार पण बहुधा गरिबीने गांजलेल्या अडाणी माणसांनी गजबजलेले आहे. आपल्या गरिबीची व अडाणीपणाची जाणीवही त्यांना नाही. आपल्या जीवनात ही सारी माणसे समरसून राहात आहेत. जीवनात रंगून गेलेली आहेत.

मिरासदारांच्या पात्रांची जीवनदृष्टी हीच मिरासदारांची विनोद दृष्टी आहे.

मनुष्य स्वभावाच्या आकर्षणातून निर्माण झालेली ही मिरासदारांची पात्रसृष्टी जीवना विषयक एक प्रसन्न व आनंददायी दृष्टी देते. ह्यातच ह्या व्यक्तिरेखांचे व व्यक्तिरेखाटनाचे सामर्थ्य लक्षात येते.

**मिरासदारी कथेचे आविष्कारविश्व -** मिरासदारांच्या कथेतील आशय सूत्राचे वेगळेपण त्यांच्या कथांचे अभिव्यक्ती सौंदर्य प्रकट करते. कथांची रचनासूत्रे

आणि भाषा यातून त्यांच्या आविष्कारपद्धतीचे सामर्थ्य जाणवते.

विरोधलयाच्या सौंदर्यपूर्ण वापरामुळे मिरासदारी कथा कलात्मक वाटते.

वास्तव आणि भास यांच्या स्थानांतरातून आणि न्यायातून मिरासदारांच्या अनेक कथा रेखांकित झाल्या आहेत. 'प्रत्यक्ष काय आहे' हे दाखवून 'काय असावे' याचे सूचन या रचनासूत्रातून होते. या रचनासूत्रामुळे कथांना सूचकतेचे परिमाण लाभते.

संपूर्ण कथात्म आशयाला खोली प्राप्त करून देणारे, कथा उजळणारे शेवट हे मिरासदारांच्या कथांचे फार मोठे सामर्थ्य आहे.

परंपरागत सूत्रात नव्या आशयाची कथा सांगणे हे मिरासदारांच्या कथेचे एक कलात्मक वैशिष्ट्य आहे. पशूसृष्टीचे मानवीकरण व दूरस्थ काळाचा वैशिष्ट्यपूर्ण, कलात्मक वापर करून मिरासदारांनी मराठी कथेला सौंदर्यपूर्ण घाट प्राप्त करून दिला आहे. जुन्या कथासाच्यातून नव्या आशयाचा तिरकस वेध घेण्यात मिरासदारांची कथा परिणामकारक ठरते. कथावस्तूचा धारदारपणा हा मिरासदारांच्या संयमाचा व औचित्यदृष्टीचा परिपाक आहे.

'भाषा' हे मिरासदारी विनोदाचे एक सामर्थ्यशाली व प्रभावी साधन आहे. मिरासदारांची भाषा नटवलेली, सजवलेली नसून सहजपणे अवतरणारी जिवंत व प्रभावी भाषा आहे.

विनोदी आशय गंभीर आशय, ग्रामपरिसर, नागरपरिसर वा दूरस्थ काल्पनिक परिसर यथास्थितपणे साकार करण्यात मिरासदारांची भाषा प्रभावी ठरते. सहज, स्वाभाविक व आशयानुगामी भाषेचे प्रवाही प्रकटीकरण हे मिरासदारांचे प्रभावी वैशिष्ट्य ठरते. भाषेला इच्छेनुरूप वाकवण्याचे त्यांचे सामर्थ्य त्यांच्या कथेतील वातावरणाच्या विविधतेतून लक्षात येते. मिरासदारांची प्रत्येक कथा आपली खास भाषा घेऊन जन्माला आली आहे.

संस्कृतप्रचुर अशा जुन्या वळणाच्या मराठी भाषेचे वेधरूप मिरासदारांच्या कथांचे एक लक्षणीय वैशिष्ट्य ठरावे. पण त्याबरोबरच आधुनिक संस्कारात हरवत जाणारे जुन्या वळणाच्या मराठीचे अस्सल रूप मिरासदारांच्या कथांतून टिकून राहते. 'कोणे एके काळी', 'भेट' अशा कथांतून शब्दांकित होते.

इंग्रजी भाषेचा खास ग्रामीण ढंग हे मिरासदारी कथेचे आणखी एक वैशिष्ट्य आहे.

लोकजीवनाचा, लोकव्यवहाराचा संदर्भ घेऊन अवतरलेली ग्रामीण भाषेतील शब्दकळा बोलीभाषक शैलीचा जिवंत प्रत्यय देते. ग्रामजीवनातील विनोद तरलपणे टिपून भाषेला विनोदाचे वाहन बनविण्यात मिरासदारांचे कौशल्य प्रकट होते. ग्रामीण भाषेतला गोडवा, बोलीतील भावोत्कटता मोठ्या कलात्मकतेने अभिव्यक्त होते. यादृष्टीने मिरासदारांच्या कथेतील भाषेचे वेगळेपण जाणवावे असेच आहे.

मिरासदारांनी आपल्या तमाम वाचकांना ग्रामीण बोलीसन्मुख करून ग्रामीण साहित्याच्या भाषिक टप्प्याची ऐतिहासिक गरज भागवली आहे.

कथेच्या रूपाप्रमाणे मिरासदारांच्या निवेदन शैलीचा, कथनशैलीचा बाज कथेगणिक वेगवेगळा असतो. त्यामुळे तो कधी मिस्कील (हरवल्याचा शोध) होतो कधी गंभीर (स्पर्श) होतो, कधी उपरोधपूर्ण (माझी पहिली चोरी) तर कधी नकळत चिंतनशीलही होतो. (कोणे एके काळी)कधी व्यंगात्मक (भारतीय चांद्रयानाचे भ्रमण) तर कधी विलक्षण साधा सरळ (गवत पाऊस) होतो.

मिरासदारांचा विनोद व्यक्तिदर्शनातून तसेच मानवी स्वभावाविषयी वाटणाऱ्या कुतूहलातून प्रकट होतो. त्यामुळे रंजकतेबरोबरच त्यातून जीवनदर्शन घडते. विनोदी आणि गंभीर अशा संमिश्र अनुभूतीतून मिरासदारांची कथा अवतरते. मिरासदारांच्या विनोदात्मक लेखणीला जेव्हा मानवी सुखदु:खाबद्दलची सहानुभूती हळुवार आवाहन करते, तेव्हा तिचा डौल वेगळाच दिसतो. त्यातून जन्मणाऱ्या हास्याला प्रसन्न, रुचिर रूप येते. कलात्मकतेसाठी मग मिरासदारांना वेगळे प्रयास करावे लागत नाहीत.

मिरासदारांचा विनोद जीवनावर लादलेला नसतो तर अनेकविध अंगांनी जीवन धुंडाळत असताना त्यात अंतर्भूत असलेला विनोद आपोआप उमलून येतो. म्हणूनच त्यांच्या विनोदाच्या मुळाशी अनेकदा कारुण्यही पाझरताना दिसते. विनोदातील कारुण्य व कारुण्यातील विनोद मिरासदारांच्या कथात केवळ अभिन्नपणे वावरत असतात. कथावस्तूशी एकात्म असणारा असा मिरासदारांचा विनोद कथेपासून बाजूला काढता येत नाही.

निवेदनशैली हा मिरासदारांच्या कथेचा एक मूलाधार आहे. निरागस भाबडे निवेदक व बालनिवेदक यावर मिरासदारांच्या विनोदाची मोठी मदार आहे. वेगवेगळ्या पातळ्यांवरील विभिन्न आकलनांच्या न्यायातून मिरासदारांच्या विनोदाची घडण झाली आहे. निवेदन शैलीत कोठलीही कृत्रिमता न येऊ देता चिंतनीय अनुभव त्यांच्या कथांतून निवेदित होतो. त्यांच्या निवेदनाला विविध पैलू आहेत. म्हणूनच बालमनाचे निरागस रूप प्रकट करताना मिरासदारांचा विनोद तरल व प्रसन्न रूप धारण करतो तर मृत्यूसारख्या गूढ व गंभीर घटनेभोवती वारंवार रेंगाळताना तो संयमित व चिंतनात्मक होतो. विविध व्यावसायिक अपप्रवृत्तींवर तो सूचकपणे व मार्मिकपणे प्रहार करतो. शाळा-शिक्षक-विद्यार्थी यातील परस्परसंबंध टिपताना त्यांचा विनोद विशेष खोडकर व टोकदार होतो. आशयाच्या अशा विविध परी धुंडाळणाऱ्या मिरासदारांच्या विनोदाला व्यापकतेचे परिमाण लाभले आहे. अशा विविध रूपांतून प्रकटणाऱ्या मिरासदारांच्या विनोदाने मराठीतील वाङ्मय समृद्ध केले आहेच पण आविष्काराच्या नव्या दिशाही ध्वनित केल्या आहेत.

विनोदात्मकता ही मिरासदारांच्या कथेची प्रकृती आहे. कोल्हटकर, चिं. वि.

जोशी यांच्या तुलनेत विनोदाचा सहज कथात्म आविष्कार हे मिरासदारांच्या कथेचे वेगळेपण आहे. त्यांनी विनोदी कथेला अधिक बांधेसूद, आकर्षक रूप दिले. चिं. वि. जोशी यांच्यानंतर सातत्याने व वैपुल्याने कलात्मक विनोदी कथा लिहून मिरासदारांनी मराठी विनोदी कथांचे दालन समृद्ध केले. विनोदी कथांचा वेगळा प्रकार मानण्याइतकी पृथगात्मकता ग्रामीण कथांमध्ये जाणवू लागली ती मिरासदारांच्या कथेमुळेच.

जीवनदर्शनाच्या हेतूतून आणि मूल्यनिष्ठेतून निर्माण होणाऱ्या मिरासदारांच्या विनोदात मराठी विनोदाचा विकास करण्याचे सामर्थ्य आहे.

'कोटी' या विनोदरूपाचा कथारूप आविष्कार हे विनोदाचे विकसित रूप मिरासदारांच्या कथांतून दिसते. संदर्भाचे स्थानांतर व दोन विभिन्न गोष्टींचे संक्षेपीकरण या कोटीच्या वैशिष्ट्यांचा अवलंब करून मिरासदारांच्या कळस, हरवल्याचा शोध, व्यंकूची शिकवणी, माकडांची म्युनिसिपालिटी या कथा अवतरतात.

शाब्दिक चमत्कृती, कोट्या, विडंबन अशा तात्कालिक स्वरूपाच्या विनोदातून मराठी कथेची सुटका करून निखळ अनुभूतिजन्य, परिहासात्मक अशा विनोदाचा आविष्कार मिरासदारांनी केला.

मिरासदारांचा विनोद जीवनाकडे हसतखेळत बघण्याची दृष्टी देतो. शोककारक प्रसंगातील शोकाचा मुखवटा बाजूला करून खऱ्या चेहऱ्याचे दर्शन घडवितो. कधी हास्याच्या मागे दडलेले कारुण्यही सूचित करतो.

विनोदाला कथारूप देऊन मराठी विनोदी कथेचे दालन संपन्न करण्याचे कार्य मिरासदारांनी केले आहे.

**नवकथाकार मिरासदार -** आशयाचे विविध प्रांत व आविष्काराच्या नाना परी साकार करणारी मिरासदारांची कथा ही नवकथेशी नाते सांगणारी आहे.

नवकथेने मराठी वाङ्मयात जोमदार नवा प्रवाह आणून सोडला आणि कथेच्या पारंपरिक कल्पनांना जोराचा हादरा दिला यातच परंपरेने कथेला जो आकार प्राप्त झाला होता त्याच्या साचेबंदपणालाही फाटा मिळू लागला पण असे होता होता मराठी कथेचे 'कथापण'च इतर प्रयोगात नष्ट होते की काय असे वाटू लागले. अशावेळी मराठी रसिक मनाला दिलासा देण्याचे कार्य मिरासदारांच्या कथानकप्रधान कथेने केले. मिरासदारांची कथा कथानकप्रधान असली तरी तंत्राबद्दलची जी विशिष्ट कल्पना पूर्वीच्या लेखनातून आली होती ती मिरासदारांच्या कथेत दिसत नाही. त्यांची कथा आशयानुरूप वेगवेगळी रूपे धारण करते.

नव्याजुन्या संगमावरची मिरासदारी कथा मराठी नवकथेवरचे आक्षेप परतवून लावण्यात समर्थ ठरली. वास्तवाधिष्ठित जीवनानुभव व नवसाहित्याने निर्माण केलेल्या नव्या कलाविषयक जाणिवा यांच्या संस्कारातून मिरासदारांची कथा प्रकटली आहे.

मिरासदारांच्या कथेने नवकथेप्रमाणेच नकळतपणे अनेक संकेतांना फाटा दिला

आहे. त्यांनी केवळ कथाविषयापुरतीच नाही तर लेखकाच्या भूमिकेबाबतची सांकेतिकता टाळलेली आहे. म्हणूनच परंपरागत साहित्यातील दुसऱ्यांना हसणाऱ्या विदूषकालाही स्वत:चे मन आहे, भावना आहेत हे जाणून घेऊन 'कोणे एके काळी'चे घाटदार कथाशिल्प आकाराला आले. सत्ताधीश व ऐश्वर्यशाली राजाला मात्र सामान्य माणसासारखं निरामय, खाजगी कौटुंबिक जीवन नाही अशी वेगळी जाणीव 'भेट' कथेतून ध्वनित होते. बालगोष्टींनी सुंदर व संवादी दिसणाऱ्या संसारात विसंवाद असू शकतो असे 'एका राजकन्येचे हरण' मध्ये लक्षात येते. अशा नवनवीन जाणिवांमुळे मिरासदारांची कथासृष्टी नवकथेच्या कुळातली असल्याचे लक्षात येते.

गंगाधर गाडगीळ व व्यंकटेश माडगूळकर या नवकथाकारांपेक्षा विनोदी नवकथेचा आविष्कार हे मिरासदारांचे वेगळेपण आहे.

मिरासदारांच्या कथांत रोमँटिक, ध्येयवादी किंवा नीतिवादी अशा कुठल्याच विचारांचे अवगुंठन नाही. कुठल्याही सामाजिक संकेतांचे व पूर्वग्रहांचे लोढणे त्यांच्या चित्रणात नसते. हीच नवकथेची वास्तवदृष्टी आहे. त्यामुळे मिरासदार नवकथेच्या प्रवाहाचा भाग होतात.

**ग्रामीण कथा -** नवकथेच्या संस्कारातून जन्मलेली मिरासदारांची कथा प्रथमपासून ग्रामजीवनात रमलेली आहे.

ग्रामपरिसरातील व्यक्तींची स्वभाविकता कोठेही न डागळता वास्तवातून अकृत्रिम विनोद फुलवण्याचे सामर्थ्य मिरासदारांच्या कथेत आहे. माणसाच्या वैगुण्यावर, दोषावर बोट ठेवून लिहिलेल्या विनोदी कथांनी ग्रामीण कथेत वेगळेपण नोंदवले. हा ग्रामीण कथेच्या विकासातील महत्त्वाचा टप्पा आहे.

बहुजन समाजाच्या नेतृत्वाचे अवमूल्यन न करता मिरासदार अप्रत्यक्षरीत्या तथाकथित वरच्या वर्गाच्या नेतृत्वाचा संधिसाधूपणा, स्वार्थीपणा, ढोंग यावर प्रकाश टाकतात. प्रस्थापित जातीव्यवस्था, आर्थिक विषमतेवर आधारित समाजरचना यावर हसतखेळत हल्ला करून नकळतपणे सामाजिक मूल्यांची मांडणी करतात.

मिरासदारांची विनोददृष्टी ग्रामीणतेचा परिपोष करणारी आहे, गंभीर आहे. तिथे टिंगल टवाळीचा सूर नाही, तसेच नाविन्याचा हव्यास नाही. ग्रामजीवनाचे असे वेगळे आविष्करण करून मिरासदारांच्या कथेने तल्लखतेने, विविधतेने व व्यापकतेने विनोद पेश केला.

ग्रामीण परिसरातील माणसे भाबडी, भोळी, अज्ञानी असतात. तिथला निसर्ग सतत रमणीय व आल्हादकारक असतो. अशा स्वप्नाळू संकेतांना फाटा देऊन मिरासदारांची वास्तवाधिष्ठित ग्रामीण कथा अवतरते.

मिरासदारांच्या कथा ग्रामपरिसरातील असूनही त्या निव्वळ शंख माणसांच्या कथा वाटतात. ग्रामीणतेचे गमक ध्यानात येण्यापेक्षाही त्यांच्या कथांतील माणूसच

पुढे येतो. व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील, आनंद यादव यांच्या कथांत ग्रामीण वातावरणाचा मनावर होणारा परिणाम विशेष असतो. पण मिरासदार मुळातच माणूस विसरत नाहीत. मिरासदारांची कथा विनोदी असूनही कथा वाचल्यावर ठसा उमटतो तो कथासाहित्याचा, माणसांचा, त्यांच्या अडाणीपणाचा, विविध आचारविचारांचा असे 'नदीकाठचा प्रकार', 'जोडी', 'जिवंत आणि मेलेले' यासारख्या कथांतून लक्षात येते.

**विनोदी कथा -** विनोद ही बुद्धीच्या कल्पक शक्तींची निर्मिती असते. ही कलात्मक शक्ती मुळातच स्वैर स्वभावी असते. एकातून दुसरा, दुसऱ्यातून तिसरा असे एका पाठोपाठ अनेक विनोद सुचून जाण्याची बरीच शक्यता असते. विनोदी कथांच्या तुलनेत विनोदी लेखात लेखकाच्या कल्पक शक्तीला अधिकच वाव असतो. तसे कथेत नसते. व्यक्ती, प्रसंग, घटना, कथानक असे कथेतील घटक वस्तुनिष्ठेच्या मर्यादा निर्माण करतात आणि या मर्यादाच विनोद निर्माण करतात. मिरासदारांनी मराठी ग्रामीण कथेला विनोदाचे भरीव असे परिमाण दिले. चिं. वि. जोशी यांच्या नंतर सातत्याने व वैपुल्याने विनोदी कथा लिहून मराठी विनोदी कथाविश्वाचे दालन मिरासदारांनी मोठ्या प्रमाणावर समृद्ध केले.

मिरासदारांची विनोदी कथा वरवर बघता अगदीच हलकीफुलकी वाटत असली तरी त्यांच्या कथातून जीवनविषयक चिंतनशील दृष्टी प्रकट होते. मिरासदार कथांमधून प्रत्यक्षपणे असा हास्कारक देखावा उभा करतात की तो देखावा ज्या गोष्टींशी विनोदात्म विरोध साधतो, तो देखावा आपल्यासमोर येतो. त्यामुळे वाचकाच्या मनात चिंतन सुरू होते. एक प्रकारे छायाचित्राच्या निगेटिव्हप्रमाणे मिरासदारांची कथा प्रकट होते. ती वाचल्यावर वाचकाच्या मनात पॉझिटिव्ह चित्र उभे राहते. या अर्थाने मिरासदाराची कथा चिंतनशील होते. चिंतनशील अनुभूतींचा सहज आविष्कार हे मिरासदारी कथेचे सामर्थ्य आहे. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, चिं. वि. जोशी यांच्या तुलनेत विनोदाचा सहज कथात्म आविष्कार हे मिरासदारी विनोद कथेचे वेगळेपण आहे.

**स्वयंसिद्ध कथा -** सातत्याने विनोदी लेखन करणाऱ्या मिरासदारांनी गंभीर कथांचे दालनही समृद्ध केले आहे. त्यांच्या या गंभीर कथा इतक्या दर्जेदार आहेत की वाचकाला हा एक श्रेष्ठ कथाकार आहे याची जाणीव होईलच. 'भावकी', 'स्पर्श', 'विरंगुळा' अशा कथांतून हे सहजपणे लक्षात येईल. त्यांच्या गंभीर कथांमध्ये भावविवशतेचा एकही शब्द नाही. अर्थपूर्ण संयम, नाजूक भावनांची जपणूक आणि भाषेचे अल्पाक्षरत्व त्यामुळे त्यांच्या गंभीर, अबोल कथा बोलक्या होतात. त्यांना श्रेष्ठ व स्वतंत्र कथाकार म्हणून स्थान देऊ शकतील इतक्या त्या तोलामोलाच्या आहेत. त्यांच्या एकूण कथांच्या तुलनेत गंभीर कथा मोजक्याच असल्या तरी त्या

प्रभावी आहेत.

रंजनमूल्य हे साहित्याचे महत्त्वाचे गमक आहे आणि मिरासदारांच्या कथांना ते निश्चितच प्राप्त झाले आहे. असे असले तरीही बेगडी रंजकतेत मिरासदारांची कथा रमत नाही. जीवनाचे खोटे, फसवे रूप ती रंगवत नाही म्हणूनच आजही ती तितक्याच ताजेपणाने वाचली जाते. द. मा. मिरासदारांच्या कथेला वाचकवर्ग मोठ्या प्रमाणावर आहे. विशेष म्हणजे हा वाचक एका विशिष्ट गटातील नाही. सर्व सामान्यांपासून उच्चशिक्षितांपर्यंत सर्व प्रकारच्या वाचक वर्गात मिरासदारांची कथा सारख्याच उत्साहाने वाचली जाते. ही गोष्ट मिरासदारांच्या कथेचे सामर्थ्य, कसदारपण सिद्ध करणारी आहे. तात्कालिक संदर्भ नसलेला त्यांचा विनोद काळाच्या कसोटीवर आजही टिकून आहे.

'विरंगुळा', 'नव्याण्णवबादची एक सफर', 'नदीकाठचा प्रकार', 'धडपडणारी मुले', 'स्पर्श', 'भावकी', 'सोन्या बामण', 'कोणे एके काळी', 'गवत', 'फोटो', 'व्यंकूची शिकवणी', 'तैलबुद्धि देवदत्त', 'हरवल्याचा शोध', 'भुताचा जन्म', 'ताजवा', 'तगई', 'भेट', 'एका राजकन्येचे हरण', 'जोडी', 'पशूंची निषेधसभा', 'माकडांची म्युनिसिपालिटी' यासारखी अनेक घाटदार कथाशिल्पे मिरासदारांच्या लेखणीतून साकार झाली आहेत.

नवकथा, विनोदी कथा आणि ग्रामीण कथा अशा विविध धारांमध्ये मिरासदारांनी मौलिक भर घातली आणि आपले वैशिष्ट्यपूर्ण स्थान निर्माण केले. पूर्वपरंपरेचे सत्त्व शोधून आपल्या कथेचा स्वयंसिद्ध असा घाट मिरासदारांनी घडविला. मराठी वाचकाला खळखळून हसवत त्याची जीवन जाणीव संपन्न व समृद्ध केली.

**प्रा. लता देशमुख**

(जगमित्र स्मरणिका, परळी साहित्य संमेलन)

❐

## सभासदांना सूचना

सध्या पोस्टातून अंक न मिळाल्याच्या किंवा उशिरा मिळत असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. आमचे पोस्टिंग दर महिन्याच्या ११ तारखेला नियमित होत असते. वाचकांनी कृपया गैरसमज करून घेऊ नये. तरीही अंक न मिळाल्यास फोन किंवा पत्र आल्याबरोबर आम्ही लगेच दुसरा अंक पाठवतो. ही वस्तुस्थिती समजून घेऊन वाचकांनी सहकार्य करावे ही विनंती. गैरसमज नसावा.

**संपादक**

# माझे विनोदी लेखन



मित्रहो, मी लेखन करायला प्रारंभ केला त्याला आता जवळजवळ पन्नास वर्षे होत आली. मी साहित्यिकांची जुनी पिढी पाहिली, आमच्या बरोबरीची पिढी पाहिली आणि आता लेखकवींची नवीन पिढीही पाहत आहे. मी बाकी काही न होता लेखकच का झालो या प्रश्नाचे उत्तर देणे आजही अवघड आहे.

आज मला आठवते ते एवढेच की, लहानपणी मला वाचनाचे विलक्षण वेड होते. हाती येईल ते पुस्तक घेऊन मी वाचत बसत असे. आमच्या घरात एकही ललित वाङ्मयाचे पुस्तक नव्हते. (फक्त केसरी नियमितपणे पोस्टाने यायचा). पण सुदैवाने आमच्या गल्लीतच धार्मिक पुस्तकांची एक-दोन दुकाने होती. तेथे जाऊन मी त्या पुस्तकांचा फडशा पाडीत असे. रामविजय, हरिविजय, पांडवप्रताप, नवनाथकथासार असली ही पुस्तके असत. त्याशिवाय हातीमताई, गुलबकावली, वेताळपंचविशी, सिंहासनबत्तिशी, शुकबहात्तरी असली अद्भुत आणि मनोरंजक घटनांनी भरलेली पण चटकदार पुस्तकेही तेथे होती. शेजारच्या घरात असलेल्या 'सुरस ग्रंथमाला' या प्रकाशन संस्थेची जुनीजुनी पुस्तके - मुख्यत: कादंबऱ्या मला याच काळात वाचायला मिळाल्या. गुजराथी, बंगाली आणि इंग्रजी भाषेतून भाषांतरित केलेल्या अनेक कादंबऱ्या त्यात होत्या. त्या सर्व पुस्तकांची भाषा अगदी सोपी, प्रासादिक आणि रसाळ असायची. इंग्रजी किंवा उर्दू, फारशी शब्दांचा या भाषेला स्पर्शही नव्हता. अगदी शुद्ध, बाळबोध जुन्या वळणाचे ते मराठी होते.

या पुस्तकांच्या वाचनाचा शैलीच्या दृष्टीने माझ्यावर शाळकरी वयात फार परिणाम झाला. कुठलेही लेखन हे गोष्टीच्या स्वरूपातच असावे आणि ते साध्या सोप्या, निरलंकृत भाषेत पण रसाळपणे करावे हा पहिला संस्कार माझ्यावर अगदी प्रारंभीच्या काळातच झाला. तो आजही कायम आहे. आपले लेखन अगदी सहजपणे वाचकांच्या मनापर्यंत जाऊन पोचावे आणि ते रंजक असावे, त्याने वाचकांना चांगल्या प्रकारचा आनंद द्यावा, अशी माझी लेखक म्हणून आजही भूमिका आहे.

लेखनात 'प्रसाद' हा गुण मी फार महत्त्वाचा मानतो. आपल्याला जे काही सांगावयाचे आहे ते संपूर्णपणे रसिकांनाच नव्हे तर सामान्य वाचकालाही समजले पाहिजे, असे मला पहिल्यापासून वाटत आले आहे आणि त्या मुद्द्यावर मी आजही ठाम आहे. शेवटी लेखक हा 'स्वान्त: सुखाय' म्हणजे स्वत:च्या आनंदासाठी

लिहितो ही गोष्ट खरी आहे. पण हा आनंद तो लिहित असतानाच फक्त असू शकतो. एकदा ते लेखन प्रसिद्ध झाले आणि वाचकांपर्यंत जाऊन पोचले की मग तो आनंद त्याचा एकट्याचा राहात नाही. तो सर्व वाचकांपर्यंत जाऊन पोचतो. तेही त्या आनंदाचे वाटेकरी होतात. नव्हे, झाले पाहिजेत. 'रंजकता' हे कुठल्याही कलेचे प्राथमिक मूल्य आहे असे मी मानतो. मानवी मनातील कोमल, नाजूक वृत्तींना ललित कथेने अगदी हळुवार स्पर्श केला पाहिजे.

वाचनीय असूनही जे लेखन वाचकाचे मन समृद्ध करते, क्वचित त्यातील अनुभवांनी वाचकाला अस्वस्थ करते असे रंजन मला अभिप्रेत आहे. लेखन हे केवळ सामान्य रंजकतेच्या पातळीवरच राहिले तर ते सामान्य प्रकारचे लेखन ठरेल. काही श्रेष्ठ साहित्यात तर ही रंजकता इतक्या उत्तम तऱ्हेची असते की, रंजकता हेच साहित्याचे अंगभूत मूल्य, असे कधीकधी मला वाटते.

पण केवळ पुस्तके वाचून लेखक होता येत नाही. निदान चांगला लेखक होत नाही. कारण पुस्तकांतून प्रतीत होणारे अनुभव हे शेवटी त्या त्या लेखकांचे असतात. अनुभवाकडे पाहण्याची त्यांची दृष्टी ही विविध प्रकारची असते. जीवनातले अनुभव उसने घेता येत नाहीत. लेखकाचे मन समृद्ध होण्यासाठी या पुस्तकांचा उपयोग निश्चितच होतो, पण शेवटी त्याने स्वत:ही विविधरंगी जीवन अगदी समरसतेने भोगले पाहिजे. अनेक प्रकारचे बरेवाईट, खारटतुरट अनुभव स्वत: घेतले पाहिजेत. 'ब्राह्मणु हिंडता बरा' असे समर्थांनी म्हटले आहे. त्या चालीवर 'लेखकु हिंडता बरा' असे मी म्हणेन. तरच या विशाल, विविधरंगी जीवनाचे थोडेतरी दर्शन त्याला घडते. स्वत: अनुभव घेत राहिले तरच या आयुष्याकडे बघण्याची त्याची एक विशिष्ट दृष्टी तयार होते. या दृष्टीमुळेच त्याच्या लेखनाला एक विशिष्ट आकार येतो. म्हणून लेखक हा समाजाभिमुख पाहिजे. तो माणसात मिसळणारा पाहिजे. 'माणसाळलेला माणूस' असे मी त्याचे वर्णन करीन. माणसापासून, समाजापासून फटकून वागणारा लेखक हा श्रेष्ठ लेखक होईल यावर माझा तरी विश्वास नाही. मी जर मराठीतला एक बऱ्यापैकी लेखक झालो असेन तर त्याचे प्रमुख कारण 'माणूस' या प्राण्याबद्दल मला विलक्षण कुतूहल वाटत आले आहे. मी माणसात रमतो, त्यांच्यात मिसळतो. माणसे पाहणे हाच छंद अगदी लहानपणापासून मला लागला आहे. माणसाची साधीसाधी सुखदु:खे, त्याचे हर्षखेद, त्याच्या आकांक्षा, धडपड, आशानिराशा, हेवेदावे, मत्सर, मूर्खपणा... त्याच्या विशिष्ट जीवनाने त्याच्या मन:प्रवृत्तीला दिलेला आकार, हे सर्व मी कळत नकळत, पण मन:पूर्वक पहात आलो. हे जीवन म्हणजे प्रामुख्याने आपण आणि आपल्या भोवतालचा समाज हे जर सत्य असेल तर माणसामाणसांतील परस्परसंबंधांतून या मानवी जीवनाचे मर्म थोडेफार तरी आपल्याला समजू लागते. म्हणून मनुष्यप्राण्याबद्दल त्याचे कुतूहल कायम असले पाहिजे. तो या

जीवनाशी समरस झाला पाहिजे. मात्र लेखनात या अनुभवांचे चित्रण करताना त्याची चित्तवृत्ती तटस्थपणाची किंवा अलिप्ततेची पाहिजे हे खरे. तरच त्याचे लेखन हे साहित्यगुणांनी सरस ठरेल.

त्या वयात मला खूप भटकण्याचे वेड होते. या भटकण्यातून मला नाना प्रकारची माणसे पाहायला मिळाली. त्यांच्याशी गप्पागोष्टी करता आल्या, किंवा त्यांच्या गप्पा ऐकता आल्या. कधीकधी मोठ्या माणसांच्या गप्पागोष्टी चाललेल्या असल्या तरी मी त्यांच्या टोळक्यात हळूच जाऊन बसत असे आणि त्यांचे चावट बोलणे मन लावून ऐकत असे. कधीकधी ही मंडळी मला त्यांच्यातून हाकलूनही देत असत. पण माझा हा छंद कमी झाला नाही. 'गातात भक्त मम जेथे, वसतो मी तेथे नारदा..' असे भगवंतांनी म्हटले आहे. मीही जिथं जिथं गप्पागोष्टी चाललेल्या असतील तिथं असायचाच! वाचन आणि हे प्रत्यक्ष अनुभव या दुहेरी शिदोरीमुळेच मी बऱ्यापैकी लेखक झालो असे मला वाटते.

शाळकरी वयात दोन लेखकांचे माझ्यावर विशेष संस्कार होते. एक आचार्य अत्रे आणि दुसरे चिं. वि. जोशी. दोघांच्याही लेखनात शाब्दिक कोट्या आढळतात, पण ते त्यांच्या विनोदाचे वैशिष्ट्य नाही. मानवी स्वभावातील विसंगतीच्या अनेक गमतीदार मिश्रणातून निर्माण होणारा स्वभावनिष्ठ विनोद हे आचार्य अत्रे यांच्या विनोदाचे ठळक वैशिष्ट्य आहे. त्यांच्या कथा, नाटके, चित्रपट यातून अनेक तऱ्हेची तऱ्हेवाईक माणसे आपल्याला भेटतात. त्यांची बरीचशी नाटके ही प्रहसनाच्या स्वरूपातीलच आहेत आणि फार्स किंवा प्रहसन यात अशा तऱ्हेवाईक, विक्षिप्त मंडळींचेच अधिराज्य असते. 'साष्टांग नमस्कार' मधील नमस्कार घालण्याचे वेड असलेले रावबहादूर, ज्योतिषाचे वेड असलेला त्यांचा मुलगा सिद्धेश्वर, 'भ्रमाचा भोपळा' मधील औषधाचा नाद असलेला म्हातारा भुलेश्वर, पाणिग्रहण मधला Gisghodke म्हणणारा श्रीमंत व्यापारी घोडके, कुठल्याही अडचणीत ओके म्हणणारे ओक भटजी, थापा मारणारा राधेश्याम महाराज... अशी असंख्य पात्रे आपल्याला सतत भेटतात आणि त्यांची आपल्याला गंमत वाटत राहते.

चिं. वि. जोशी यांच्या विनोदातही स्वभावनिष्ठ विनोदाचे अनेक हास्यकारक नमुने आहेत. पण चिंतामणराव त्याचबरोबर मूळ अनुभवातली विसंगती आणि हास्यकारकता शोधतात आणि विनोदाची निर्मिती करतात. त्यांचा चिमणराव हा स्वत:मधील विसंगती प्रकट करतो आणि स्वत:लाच हास्याचा विषय बनवतो. त्यांचा विनोद जीवनातील वास्तवतेपासून दूर जात नाही. स्वत:लाच हास्याचा विषय बनवणे हा अत्यंत श्रेष्ठ सुसंस्कृत विनोदाचा नमुना म्हटला पाहिजे. कधीकधी त्यांनी निवडलेल्या प्रसंगांतच हास्यकारकता लपलेली असते. म्हणून स्वभावनिष्ठ विनोद आणि प्रसंगातून सहजपणे निर्माण होणारा प्रसंगनिष्ठ विनोद यांचेच मला जास्त

आकर्षण वाटले आणि माझ्या लेखनात तोच विनोद प्रामुख्याने आला आहे. शब्दनिष्ठ विनोद किंवा कोटी मला आवडते. पण त्या विनोदाकडे माझा फारसा ओढा नाही. माझ्या लेखनात असा विनोद क्वचितच येतो.

अलीकडे आणखी एक प्रश्न मला फार अस्वस्थ करतो. असे म्हणतात की, विनोदी लेखन कितीही उत्तम असले तरी अभिजात साहित्यात किंवा श्रेष्ठ साहित्यात त्यांची गणना होत नाही. निदान काही रसिकांना तरी तसे वाटते. असा अभिप्राय व्यक्त करणाऱ्या मंडळींना विनोदाचे वावडे असते असे नाही. त्यांनाही विनोद आवडतो. विनोदी साहित्याचे तेही चाहते असतात. पण तरीही त्यांना वाटते की, विनोदी साहित्याला काही अंगभूतच मर्यादा आहेत. गंभीर लेखनातून जे जीवनानुभव व्यक्त होतात ते अधिक सच्चे आणि परिपूर्ण असतात. गंभीर लेखन हे अनुभवांच्या मुळाशी जाऊन काही शोध घेते आणि जीवनाचे अस्सल स्वरूप आपल्याला दाखवते. म्हणून हे लेखन ज्या उंचीवर जाते ती उंची विनोदी लेखनाला कधीच गाठता येत नाही. त्यामुळे अभिजात साहित्यात विनोदी साहित्य कधीच समाविष्ट करता येणार नाही.

विनोद किंवा हास्यनिर्मिती ही एखाद्या विसंगतीतून निर्माण होते. ही विसंगतीची जाणीव अगदी नैसर्गिक असते. एखाद्या लहान मुलालासुद्धा ही जाणीव असते. अगदी रांगणाऱ्या मुलाला एखाद्या सतरंजीवर किंवा गालिच्यावर ठेवले आणि त्या सतरंजीला एखादे छिद्र किंवा गालिच्यावर एखादा शाईचा डाग असला तर त्या मुलाचे लक्ष तिकडे प्रथम जाते आणि रांगतरांगत येऊन ते मूल बोटांनी ते काय आहे हे खरवडून पाहते. त्याला बोलता येत नाही. पण आपल्या कृतीतून ही गोष्ट येथे विसंगत आहे असे ते दाखवते. म्हणजे ही जाणीव अगदी नैसर्गिक आहे. या विसंगतीतून हास्य निर्माण होत नाही. गणिताच्या पायऱ्या मांडताना एखादी पायरी चुकली किंवा विसरली तर पुढची पायरी विसंगत वाटते. पण तरीही तेथे हास्य निर्माण होत नाही. कारण केवळ वैचारिक पातळीवरील ही विसंगती आहे. पण मनुष्यस्वभावातून ही विसंगती आपल्याला जाणवते तेव्हा तेथे हसू येते.

अगदी एकसारखे दिसणारे दोघे जुळे भाऊ होते. त्यातील एकजण पाण्यात बुडून मेला. नंतर पुढे दुसऱ्या भावाला एक गृहस्थ भेटले. त्यांनी त्या भावाला विचारले, 'अरे, बुडून मेला तो कोण? तू का तुझा भाऊ ?' या प्रश्नातली विसंगती आपल्याला जाणवते आणि आपल्याला हसू कोसळते. मनुष्यस्वभावाची एक गंमत आपल्याला येथे समजते. अज्ञान, मूर्खपणा, बावळटपणा त्यातून व्यक्त होतो. म्हणून हे हास्य निर्माण होते.

एका थापाड्या माणसाला आपल्याजवळच्या वस्तूंचा संग्रह कसा दुर्मिळ आहे हे सांगण्याची फार हौस होती. एकदा त्याने एक लहान आकाराची कवटी लोकांना

दाखविली आणि मोठ्या आढ्यतेने म्हटले,

''ही कवटी कुणाची आहे माहीत आहे? प्राचीन इतिहासातील प्रसिद्ध पुरुष चेंगीझखान याची आहे.''

एकाने आश्चर्य व्यक्त करीत प्रश्न केला, ''असं? पण ही तर लहान मुलाची कवटी दिसते!''

ताबडतोब त्या थापाड्याने उत्तर दिले, ''करेक्ट! चेंगीझखानच्या लहानपणाचीच ही कवटी आहे!''

येथेही विसंगतीतून हास्य निर्माण होते. कारण त्या थापाड्या माणसाचा वेळ मारून नेण्याचा स्वभाव त्यातून व्यक्त होतो. म्हणून आपल्याला हसू कोसळते.

मानवी स्वभावातील विसंगतीतून असे अनेक हास्यकारक प्रसंग निर्माण होताना दिसतात. त्याचा प्रत्यय आपल्याला नेहमीच येत असतो. आपण नेहमी असे अनुभव घेत असतो. चांगल्या श्रेष्ठ साहित्यात असे अनेक वेगवेगळ्या प्रकारचे अनुभव व्यक्त होत असतात. प्रत्येक अनुभवाला त्याचा स्वत:चा असा एक घाट असतो. हे त्याचे वेगळेपण अभिजात साहित्यात नेमकेपणाने टिपले जाते. विनोदी साहित्यातही अनुभवांचा असा वेगळेपणा योग्य रीतीने व्यक्त होत असेल तर ते विनोदी साहित्यही अभिजात साहित्यात जमा होऊ शकेल, असे जाणत्यांना वाटते.

ज्येष्ठ लेखक आणि समीक्षक प्रा. गंगाधर गाडगीळ यांनी यासंबंधी लिहिताना एके ठिकाणी म्हटले आहे, ''विनोदी साहित्यात जर प्रत्येक अनुभवाची ही अपूर्वाई, हे वेगळेपण टिपले जात नसेल किंवा विनोदाच्या निर्मितीमुळे ते टिपण्याचा मार्गात काही अडचणी येत असतील तर मग ते विनोदी साहित्य अभिजात साहित्य असू शकत नाही असे म्हणावे लागेल. आपण जेव्हा एखादा सामान्य विनोदी फार्स बघतो तेव्हा आपल्याला असे जाणवते की यातली माणसे, त्यांचे स्वभावविशेष, त्यांच्या प्रतिक्रिया यात एक प्रकारचा सारखेपणा, ढोबळपणा आहे. पण मोलियरच्या विनोदी नाटकांत इतक्या विविध प्रकारच्या विनोदी व्यक्तिरेखा आहेत आणि मानवी स्वभावातले इतके बारकावे त्याने टिपले आहेत की, विनोदी साहित्यात प्रत्येक व्यक्तीचा आणि प्रसंगाचा वेगळेपणा पुष्कळशा प्रमाणात चित्रित करता येतो, हे मान्य करावे लागेल.''

याचे स्पष्टीकरण देताना ते पुढे म्हणतात, ''मराठीतल्या विनोदी साहित्याकडे पाहिले तर सुदामा, बंडूनाना, पांडुतात्या ही पात्रे ढोबळ वाटतात. त्यांच्या प्रतिक्रिया ठराविक वाटतात. पण चिमणराव, गुंड्याभाऊ, चिमणरावाची बायको काऊ, तिची मैत्रिण गुलाब दिघे इ. मंडळी मानवी स्वभावातल्या विविधतेचे दर्शन घडवतात. त्यांच्या स्वभावातले त्या प्रकारचे बारकावे चिं. वि. जोशी यांनी जसे दाखवले आहेत, तसे अनेक गंभीर लेखकांनाही दाखवता आलेले नाहीत. तेव्हा अभिजात साहित्यातील

प्रमुख विशेष - मनुष्यस्वभावातली विविधता - हा तरी विनोद साहित्यात असू शकतो, हे मान्य करावयास हवे.''

मात्र, अत्यंत स्फोटक, प्रचंड हास्य निर्माण करणाऱ्या विनोदी लेखनात अभिजात साहित्याचे गुणविशेष फारच कमी असतात हे त्यांचे मत चिंत्य आहे. विनोदी लेखकांनी ते गंभीरपणे लक्षात घेतले पाहिजे, यात काही शंका नाही.

मित्रहो, विनोदी लेखन हे अभिजात साहित्यात समाविष्ट होईल अगर न होईल. मी त्याची चर्चा आता करीत नाही. पण 'विनोद' ही फार मोठी शक्ती आहे हे तरी सर्वांना मान्य करावेच लागेल ना? तेवढे आश्वासन मला पुरेसे आहे. या मानवी जीवनात दु:खच दु:ख आहे. 'सुख पाहता जवाएवढे दु:ख पर्वताएवढे' असे तुकारामांनी म्हटलेच आहे. 'सर्वं क्षणिकं, सर्वं दु:खं' असे गौतम बुद्धांनीही सांगितले आहे. किंबहुना जीवनाचे मूळ रूपच दु:खमय आहे असेच तत्त्वज्ञांना वाटते. मनुष्य हा सुखासाठीच जन्माला येत नाही, अशी त्यांची भूमिका आहे. हे दु:ख नाहीसे करण्याची शक्ती कुणामध्येही नाही. ते निमूटपणे भोगणे एवढेच आपल्या हातात असते. पण हे दु:ख नाहीसे करता आले नाही तरी ते विसरायला लावण्याची शक्ती विनोदात आणि हास्यात आहे. विनोद आणि त्याने निर्माण होणारे हास्य तुमचे दु:ख विसरायला लावते, ते सहन करण्याची शक्ती तुम्हाला देते, इतकेच नव्हे तर, हे जीवन आनंदाने कसे जगावे याचा मंत्रही हास्यच देते. या मानवी जीवनात लागेल तेवढ्या उणिवा आहेत. अडाणीपणा आहे, मूर्खपणा आहे. स्वार्थी, मूर्ख, लंपट, गर्विष्ठ अशी माणसे भेटली तर काय त्यांच्यापुढे आपले डोके फोडून घ्यायचे! हसून त्यांच्याकडे दुर्लक्ष करायचे हाच शहाणपणाचा मार्ग. विनोद अशा रीतीने माणसाला अधिक समंजस, क्षमाशील व्हायला शिकवतो. हास्य हे माणसांच्या सुसंस्कृतपणाचे लक्षण आहे. म्हणून विनोद आणि विनोदी साहित्य यांचे महत्त्व सुसंस्कृत समाजात नेहमीच राहील असे मला वाटते.

**द. मा. मिरासदार**

(परळी साहित्य संमेलन - अध्यक्षीय भाषणातील एक उतारा)

❐

**'मेहता पब्लिशिंग हाऊस'**च्या नवीन पुस्तकांची माहिती, नवनवीन योजना आणि ताज्या घडामोडी कळविण्यासाठी आपला E-mail ID आमच्याकडे हवाच!

**Email : info@mehtapublishinghouse.com**

आपले **E-mail ID** 'मेहता पब्लिशिंग हाऊस'च्या वरील **E-mail ID** वर कळवा.

# द. मा. मिरासदार यांची खुमासदार शैलीतील पुस्तके

## आता नव्या रूपात















| | | | |
|---|---|---|---|
| १. चकाट्या | ₹ १५० | १०. माकडमेवा | ₹ १२५ |
| २. गंमत गोष्टी | ₹ १४० | ११. गुदगुल्या | ₹ १२० |
| ३. हसणावळ | ₹ १४० | १२. सरमिसळ | ₹ १२० |
| ४. भोकरवाडीच्या गोष्टी | ₹ १४० | १३. नावेतील तीन प्रवासी | ₹ १२० |
| ५. बेंडबाजा | ₹ १४० | १४. खडे आणि ओरखडे | ₹ ११० |
| ६. विरंगुळा | ₹ १३० | १५. मी लाडाची मैना तुमची | ₹ ७० |
| ७. गप्पांगण | ₹ १३० | १६. सुट्टी आणि इतर एकांकिका | ₹ ७० |
| ८. माझ्या बापाची पेंड | ₹ १३० | १७. जावईबापूंच्या गोष्टी | ₹ ६० |
| ९. चुटक्याच्या गोष्टी | ₹ १२५ | १८. गाणारा मुलुख | ₹ ४० |

**संपूर्ण संचाची किंमत ₹ २०६०/-**

**पोस्टेज / कुरीअर खर्च १००/-**

**रक्कम मनिऑर्डरने किंवा डिमांड ड्राफ्टने पाठवून आमच्याकडे नोंदणी करा अथवा नजिकच्या विक्रेत्याकडे नोंदवा.**

## मेहता पब्लिशिंग हाऊस

१९४१, सदाशिव पेठ, बाजीराव रोड, पुणे ३०.

फोन : २४४७६९२४, २४४६०३१३

मेहता बुक सेलर्स, कोल्हापूर. फोन २५४२९०१

E-mail : info@mehtapublishinghouse.com | Website: www.mehtapublishinghouse.com

# पुस्तक परिचय

प्रसंगनिष्ठ, स्वभावनिष्ठ आणि भाषिक विनोदाचे
सुखद मिश्रण असणाऱ्या कथा

## भोकरवाडीच्या गोष्टी




द. मा. मिरासदार

द. मा. मिरासदार यांच्या विनोदी कथांचे वीसावर संग्रह प्रकाशित झालेले आहेत. त्यामध्ये भोकरवाडीच्या पार्श्वभूमीवर लिहिलेल्या कथांना एक वेगळे स्थान आहे. दमांनी विनोदी कादंबरी लिहिलेली नाही, परंतु भोकरवाडी केंद्रस्थानी ठेवून वीसेक कथांची मालिका लिहून एका अर्थाने कादंबरीची कसर भरून काढली आहे.

एका खेडेगावाचे विविध ऋतुरंगातले नैसर्गिक चक्र त्यांच्या या कथांमधून प्रकट होत जाते, तसेच तेथील साध्याभोळ्या, बनेल, खट्याळ गावकऱ्यांचे स्वभावविशेषही आपल्या मनाचा ठाव घेतात. एखादी आगळीवेगळी घटना घडली की ती त्या व्यक्तीपुरती किंवा कुटुंबापुरती मर्यादित राहात नाही; ती भोकरवाडीतल्या सर्व नागरिकांना सामावून घेते आणि संपूर्ण भोकरवाडी त्या घटनेने ढवळून निघते. त्या घटनेचे पडसाद अल्पावधीत सर्व थरांत उमटतात. भोकरवाडीच्या रूपाने ग्रामजीवनाचा एक विशाल पट खुला होतो. त्यातली सुखदु:खे, हेवेदावे, स्पर्धाचुरस, छोटे मोठे हर्षखेद यांचे दर्शन घडते. दमांचे वैशिष्ट्य हे की या सर्व गोष्टींकडे ते विनोदाच्या चष्म्यातून बघतात आणि माणसामाणसांच्या संबंधातील नाट्य प्रकट करतात. दारिद्र्याचे, विषमतेचे शोकात्म दर्शन घडविण्याचा दमांना सोस नाही. जे काही प्राक्तन आहे ते स्वीकारून त्याचा आनंद घेणे यात त्यांना रस आहे.

भोकरवाडी हे एक 'ठार खेडेगाव' (पृष्ठ १६) पण गावात अनेक जुनी घरे, पडके वाडे, उकिरडे आहेत, मोडकळीला आलेले गावकूस, त्याची कुठेकुठे शिल्लक असलेली तटबंदी. ओढ्याकाठी डगर. मांत्रिक-देवऋष्यांच्या मते जुन्या वाड्यात गुप्त धनाचे साठे नक्कीच असणार. कुणाकुणाला पडक्या वाड्यात फस्स फस्स आवाजही ऐकू येतो असा भास झालेला. खजिन्याच्या रांजणाची राखण करणारा भुजंग, पाच फड्यांचा नाग... अशा दंतकथांची रेलचेल...

गावात एकूण दारिद्र्य. लहान लहान शेते. दोनतीन वर्षे पावसाने ओढ दिलेली. त्यामुळे दुष्काळी स्थिती. दुपारी मारुतीच्या देवळात जाऊन आराम करायला नाना चेंगटसारखी माणसे हमखास येत. देवळात भटकी कुत्रीही हक्काने येत. झोपलेल्या नाना चेंगटाचे कपाळ चाटत. नाना झोपेतच एखाद्या कुत्र्याला मिठी मारायचा. क्यँव क्यँव आवाज आला की दचकून उठायचा. खवळून कुत्र्याला दणका घालायचा. बाहेरगावाहून येणारे भिकारी किंवा इतर कुणी याच देवळात मुक्काम करीत. लोक सकाळी उठून गावाबाहेरच्या रानात पाण्याची तपेली घेऊन जात. देहधर्म उरकून विहिरीत हातपाय धूत. परतताना दुसऱ्याच्या रानातली भाजी, मिरच्या कोथिंबीर, कांदे, बटाटे, वांगी, भोपळा वगैरे धोतराच्या घोळात टाकून घरी येत. कधी दोनचार ऊस उपटून घेत. काकड्या, गाजर... कधी रानातल्या मालकाने आरडाओरडा केलाच तर तेवढ्यापुरते दुसरे रान बघायचे.

भोकरवाडीच्या चावडीत गप्पांचा फड भरे. त्यामुळे चांगली वर्दळ असे.

शिमग्याला तमाशाचा फड उभा राही.

घरोघरी गाईगुरे. दूधदुभते. प्रत्येक गवळ्याकडे एकेक जानी म्हैस. तिचे दूध विकायचे नाही. त्यात पाणी घालायचे नाही. ते दूध बाबू पैलवानासारख्या कुणाला तरी देऊन सत्पात्री दानाचे पुण्य मिळवायचे ही प्रथा.

भोकरवाडीत पडकी घरे आणि ओसाड विहिरी भरपूर, वडापिंपळाची झाडेही बरीच. अमावस्येची काळीकुट्ट रात्र. पण भुताखेतांचा त्रास नव्हता. मात्र गावात कधी कुणी मांत्रिक, देवऋषी येई आणि गावातल्या लोकांना, बायाबापड्यांना भुतांची आठवण येई. मग मांत्रिक -देवऋषींच्या अंगात येई. दहीभात, नारळ, तेलच्या असा भरगच्च नैवेद्य एका झाडाखाली ठेवण्यात येई. तो रात्री गायब होई. एवढ्याने भुताची बाधा दूर होई. कधी कोंबड्याचा बळी लागे.

भोकरवाडीत ऐन मध्यवस्तीत पांडू गुराडी याचे हॉटेल होते. तिथं गिऱ्हाइकांची गर्दी असे. दहा बारा टेबले, बाकडी फुल असत. कपाटात ताजा माल. परातीत गरमागरम भजी. तिकडे चहाचे धगधगते चुलाण.

गणपती उत्सवाच्या वेळी रात्री डान्सिग पार्टीचा धांगडधिंगा चाले. मांडवात बंदोबस्त असे. दक्षतेसाठी पोलीस तैनातीला असत.

शाळेतले बावळे मास्तर हे तपकिरीचे शौकिन. हातातल्या डबीला टिचक्या मारत चिमूट-चिमूट तपकीर नाकात कोंबत ते खणखणीत आवाजात शिकवत. मुले तरीही पास होत.

भोकरवाडीत बारा बलुत्यांचा वावर.

शिवा जमदाडे, बाबू पैलवान, नाना चेंगट, संभा साळी, गणा मास्तर, रामा खरात, बाबू शेकाटे, सुतार, हॉटेल मालक पांडू गुराडी, घडशी, बारक्या सखाराम, गंगीचा रिकामटेकडा नवरा बापू अशी तेथील मातबर मंडळी, सरळ रेषेतले चाकोरीबद्ध आयुष्य जगणारी.

पण कधी तरी काही वेगळे घडते आणि भोकरवाडीला जाग येते. सगळी भोकरवाडी आपापले कामधंदे सोडून एकत्र येते. आपल्या अनुभवांची देवाणघेवाण करते. संकटाचा सामना करते.

शिवा जमदाडे विहिरीतून पाणी काढून तांब्याने गुळण्या करायला घेतो, तर पाणी घासलेटसारखे वाटते. तो ते थुंकून देतो. विहिरीतून आणखी पाणी काढतो. त्यालाही रॉकेलचा वास येतो. तो घरी जाऊन बायकोला सांगतो. बायकोच्या दट्ट्यामुळे तो पुन्हा त्या विहिरीजवळ जाऊन हंडाभर रॉकेल घरी घेऊन येतो. आता सगळी विहीरच रॉकेलने भरलेली! शिवाची बायको शेजारणींना रॉकेल विकत देते... गावभर चर्चा सुरू होते. 'बॉंबे हाय'प्रमाणे 'भोकरवाडी हाय' असे तेलाच्या विहिरीचे नामकरण होते. ते करताना भोकरवाडीतल्या ग्रामस्थांच्या जनरल नॉलेजची कसोटी

लागते. पण दुसऱ्याच दिवशी पोलीस त्या विहिरीचा कब्जा घेतात. घासटलेचा काळाबाजार करणाऱ्या व्यापाऱ्यांवर पोलीस छापे घालतात, तेव्हा व्यापारी आपल्याकडचे रॉकेल त्या विहिरीत ओतून देतात, असे पोलीस शिवाला सांगतात. 'भोकरवाडी हाय' तेलविहिरीचे स्वप्न तेथेच विरून जाते.

भोकरवाडीत यंदा शिमग्याला फड भरवायचा नाही असा निर्णय ग्रामपंचायत घेते तेव्हा बापू पैलवान त्या निर्णयाला विरोध करण्यासाठी उपोषण करण्याचे जाहीर करतो. सबंध भोकरवाडी गाव त्यामुळे हादरतो. भरल्या पोटीही एरव्ही बाबू गावात दंगा करीत फिरत असे, कुणाशीही मस्ती करीत असे. उपाशी पोटी बाबू म्हणजे फारच हिंस्र प्राणी! समोरच्या माणसाचं तो काय करीत हे सांगणे कठीण! ''उपोषण प्राणांतिक का लिमिटेड'' या गणामास्तराच्या प्रश्नाचे तो उत्तर देतो, ''पयल्यांदा दोन-चार दिवसांचं प्रानांतिक... काई उपयोग झाला तर बरं नाईतर लिमिटेड.'' त्याला प्रश्न नीट समजला नाही असे म्हणण्याचे धाडस कुणी केले नाही. उद्यापासून उपोषण म्हणून आज बाबूने भरपूर खाण्याची काळजी घेतली. गणामास्तरने पिशवीतून कणसे काढली. 'उद्या आणलीस तर तुझी माझी तकरार होईल' म्हणत बाबू ती खातो. मग रामा खरात दोन पिकलेली शेंदाडे त्याला देतो. भागू गवळण आपल्या जानी म्हशीच्या दुधाची चरवी त्याला प्यायला भाग पाडते. शिवा जमदाडे जत्रेतला प्रसाद म्हणून पिशवीभर भेंडबत्तासे, चुरमुरे खाऊ घालतो. नाना चेंगट मुसुंबी पुढे करतो. 'फड भरवायचं सर्वांनी कबूल केलंय. तेव्हा मुसुंबी खाऊन उपोषण सोड' असे तो म्हणतो. बाबू पैलवानाच्या उपोषणाची अखेर होते. ''अगं, आता माहेरचे आनलेले पेढे आन. जेवायचं हुइस्तवर काय तरी तोंडात टाकायला हुईल.'' तो बायकोला म्हणतो, ''आता उपोशन न्हाई बरं.''

काहीतरी निमित्त होते आणि गावकरी त्याच्या अनुषंगाने आपापल्या स्वभावानुसार प्रतिक्रिया व्यक्त करतात. एकमेकांच्या युक्तिवादातील कच्च्या दुव्यांवर कमीजास्त बोट ठेवतात. त्यातून नाट्य निर्माण होते. त्यातून होणारे स्वभावदर्शन नाट्यपूर्ण असते. त्यातून हास्य फुलते. ते मिरासदारांना रंगवून सांगण्यात गंमत वाटते. त्यातून त्यांची कथा जन्म घेते.

गावातल्या चौकात चित्रपटाचे शूटिंग होणार असते. त्यातला मारामारीचा सीन शूट करायचा असतो. दिग्दर्शक तो सीन नटांना समजावून देत असतो. नायक-खलनायक त्याची प्रॅक्टिस करतात. बाबू पैलवान या मारामारीची बातमी ऐकून त्या चौकात येतो आणि मारामारी करणाऱ्यांना बदडून काढतो. दिग्दर्शकालाही ठोसा देतो. हे शूटिंग आहे, ही मारामारी खोटी आहे, हे त्याच्या डोक्यातच शिरत नाही. त्यामुळे होणारा घोटाळा कथेत रंग भरत जातो.

गुप्तधनाच्या शक्यतेने मांत्रिक लोकांना उल्लू बनवतो, देवऋषी संभाच्या बायकोचे

भूत पडक्या घराजवळ दिसतेय असे सांगून तुकाराम टेंगळेकडून पैसे उकळतो, परसातला खजिना मिळवण्यासाठी शिवा तेथील भिंत पाडतो आणि खजिन्या ऐवजी अस्थिकलश निघतो, अशा कल्पनांभोवती मिरासदारांच्या कथा फुलतात आणि वाचकांचे रंजन करतात. वाचकांना हसवतात.

भोकरवाडीच्या पार्श्वभूमीवरच्या कथा हसणावळ वगैरे इतर संग्रहातही आढळतात.

काहीतरी घटना घडते आणि ती गावभर खळबळ इडवून देते. गावकरी त्या घटनेला जो प्रतिसाद देतात तो गावकऱ्यांच्या अडाणीपणावर किंवा हुशारीवर प्रकाश टाकतो. त्यातील प्रसंगनिष्ठ, स्वभावनिष्ठ आणि भाषिक विनोदाचे सुखद असे मिश्रण कथांमध्ये आढळते. त्यामुळे त्यातला ताजेपणाही जाणवतो.

**किंमत : १४०रु. सभासदांना : सवलतीत पोस्टेज : २५रु.**


**मेहता पब्लिशिंग हाऊस**

**राजकीय पुस्तकांची यादी**

| **पुस्तकाचे नाव** | **लेखक** | **किंमत** |
|---|---|---|
| इंडिया इन स्लो मोशन | | |
| : मार्क टुली/गिलियन राईट | अनु. अजित ठाकूर | २२० |
| लेट्स किल गांधी : तुषार अ. गांधी | अनु. अजित ठाकूर | ६९५ |
| गव्हर्नन्स : अरुण शौरी | अनु. भारती पांडे | २२० |
| द पार्लमेन्टरी सिस्टिम : अरुण शौरी | अनु. अशोक पाथरकर | २२० |
| वाळवीग्रस्त वृक्षाला पोलादी कुंपण | | |
| वाचवेल का? : अरुण शौरी | अनु. कॅप्टन राजा लिमये | ४५० |
| ए कॉल टू ऑनर : उगवत्या भारताच्या जयजयकारासाठी साद | | |
| : जसवंतसिंग | अनु. अशोक पाध्ये | ४०० |
| जिना : हिंदुस्थान-फाळणी-स्वातंत्र्य | | |
| : जसवंत सिंग | अनु. अशोक पाध्ये | ५०० |
| फ्रीडम ॲट मिडनाईट : डॉमनिक लॅपिए | अनु. माधव मोर्डेकर | ३०० |
| पुणे ते पंतप्रधानांचे कार्यालय | | |
| : बी. जी. देशमुख | अनु. अशोक पाध्ये | ४०० |
| न जलसा, न जल्लोष : जे. बी. डिसूझा | अनु. एस्. ए. वीरकर | १५० |
| पहिली फेरी | राम प्रधान | १५० |
| (१९६५ भारत-पाक युद्ध) | | |

**पोस्टेज खर्च वेगळा**

## मेहता पब्लिशिंग हाऊस
## कथासंग्रह

| **पुस्तकाचे नाव** | **लेखक** | **किंमत** |
|---|---|---|
| रिवणावायली मुंगी<br>(आनंदीबाई शिर्के म.सा.प. पुरस्कार) | राजन गवस | १३० |
| आपण माणसात जमा नाही | राजन गवस | १७० |
| ईगीन | महादेव मोरे | १५० |
| मत्तीर | महादेव मोरे | २०० |
| चिताक | महादेव मोरे | १५० |
| निसटलेले | आशा बगे | १२० |
| ऋतूवेगळे | आशा बगे | ७० |
| पाऊलवाटेवरले गाव | आशा बगे | ११० |
| प्रतिद्वंद्वी | आशा बगे | १२० |
| सेलिब्रेशन | स्वाती चांदोरकर | १३० |
| काळाकभिन्न | स्वाती चांदोरकर | १३० |
| विमुक्त | दादासाहेब मोरे | १३० |
| सहजतेच्या त्रासाची सुरुवात | विजय तांबे | १२० |
| ज्याचा त्याचा... | विजय तांबे | १२० |
| आंधळा न्याय | नितीन बापट | १५० |
| प्रकाशाची झाडे<br>(महाराष्ट्र राज्य पुरस्कार - ग.ल. ठोकळ पुरस्कार - २००८-२००९) | वसु भगत | २०० |
| आकाशवेध<br>(कै. सौ. उषा प्रकाश मोहाडीकर समितीतर्फे 'समाजभूषण पुरस्कार') | गिरिजा कीर | १३० |
| केवळ मैत्रीसाठी | उमेश कदम | १३० |








**पोस्टेज खर्च वेगळा**

# पुस्तक परिचय

**कारखान्याच्या गावातील दहशतीचे वातावरण जॅक रीचरला आव्हान देते तेव्हा -**

# नथिंग टू लूज




**ली चाइल्ड** **अनु. उदय कुलकर्णी**

ली चाइल्ड या अग्रगण्य थरारकथाकाराची 'वन शॉट'ही थरारकथा गतवर्षी मराठी वाचकांना वाचायला मिळाली. मिलिटरी पोलीस इनव्हेस्टर जॅक रीचर याच्या व्यक्तिरेखेभोवती ली चाइल्डने गुंफलेल्या थरारकथांचे वेगळेपण लक्षात आणून देणारी 'वन शॉट'च्या कथावस्तूतील आगळीवेगळी नवलाई वाचकांना भुरळ घालून गेली.

जॅक रीचर हा पट्टीचा नेमबाज. लष्करी सेवेतून मुक्त झाल्यावर कुठलेही सामान-कपडे वगैरे बरोबर न घेता अंगावरच्या कपड्यांनिशी सदैव भटकंती करणारा हा भटक्या निवृत्त मिलिटरी पोलीस जेम्स बॉन्डसारखा मिजास मिरवत नाही. पंचतारांकित हॉटेलात उंची मद्ये आणि चटकचांदण्यांचा सहवास यात रस घेत नाही. तो साध्या हॉटेलात उतरतो. त्या त्या गावातल्या साध्या शॉपिंग मॉलमधले स्वस्तातले कपडे वापरतो. काळी कॉफी साखर न टाकलेली घेतो. शक्यतोवर बसने प्रवास करतो. दहावीस मैल पायी चालायलाही त्याची ना नसते. त्याला या भटकंतीत कोणीतरी अडचणीत असलेली नवऱ्याने वा प्रियकराने धोका दिलेली तरुणी भेटते. ती आपल्याला मदत करण्याची विनंती करते. एखादा संकटात सापडलेला माणूस भेटतो. कुणावर तरी अन्याय होत असतो. त्यांच्या बाजूने जॅक रीचर लढायला तयार असतो.

'नथिंग टू लूज' या थरारकथेत जॅक रीचरला डिस्पेअर या गावातील गुंड आणि पोलीस हुसकावून लावायचा जो प्रयत्न करतात, त्यामुळे जॅकला तेथे काहीतरी विपरीत चालू असावे असा संशय येतो आणि तो पोलिसांना चकवा देऊन पुन: पुन्हा त्या गावात घुसत राहतो, असे दाखवले आहे. एखाद्या विशिष्ट व्यक्तीने मदतीला न बोलावताही जॅक त्या पोलिसांच्या हडेलहप्पीमुळे त्या गावाकडे आकृष्ट होतो आणि तेथे चाललेल्या संशयास्पद घटनांचा छडा लावतो.

ली चाइल्डच्या पंधरावर थरारकथांनी मोठा वाचकवर्ग काबीज केला आहे. कथाविनेदनाची त्याची शैली अघळपघळ असते. त्यामुळे कधी कधी पानेच्या पाने तशीच न वाचता पुढे गेले तरी चालते. 'नथिंग टू लूज' मध्ये असा मोह थोडाफार होतो. कारण जॅच रीचरला डिस्पेअर या गावातून तेथील पोलीस हद्दपार करीत असतात आणि तो पुन:पुन्हा त्या गावात प्रवेश करीत असतो. जॅकने कुठलाही गुन्हा केलेला नसल्याने पोलीस त्याला अटक करू शकत नाहीत. हा क्रम शंभरावर पाने व्यापत असल्याने कंटाळवाणा ठरतो. दर दिवसाआड असा प्रकार होत असतो. थोडे संपादकीय संस्कार करून मुख्य कथावस्तूला थेट भिडणे आकर्षक ठरले असते. डिस्पेअर गावातील एकूणच दहशतीचे वातावरण, नवख्यांची होणारी छाननी, तेथील एकमेव धातू रिसायकलिंगचा कारखाना, त्याबाबतची कडक सुरक्षा व्यवस्था यामुळे जॅक रीचरला ते एक आव्हानच वाटते.

जॅक रीचरच्या आयुष्याचे एक सूत्र असते : सतत पुढच्या दिशेने मार्गक्रमण करीत राहणे. सतत भ्रमंती करीत राहण्याचे व्रतच जणू त्याने स्वीकारलेले असते.

यावेळी त्याने अमेरिकेच्या ईशान्येकडील टोकाला असलेल्या कार्लाइस या गावापासून सॅन दिएगो या नैर्ऋत्येकडच्या टोकाला असलेल्या ठिकाणी, पश्चिमेकडून दक्षिणेकडे तिरप्या रेषेत जायचे ठरवून प्रवास सुरू केला. शक्यतर बसने प्रवास करायचा, बस नसेल तेथे येणाऱ्या जाणाऱ्या गाड्यांमध्ये लिफ्ट मिळवायची. लिफ्ट न मिळाली तर चक्क पदयात्रा करायची. दहावीस मैल चालणे त्याला अवघड वाटत नसे. असा प्रवास करीत तो कन्सासमध्ये आला.

कन्सासच्या पुढचा टप्पा कोलोराडो. तेथून त्याला एक वयस्क गृहस्थाने आपल्या मर्क्युरी ग्रॅन्ड मारक्विझ कारमधून होप या गावापर्यंत लिफ्ट दिली. होपला उतरल्यावर त्याने नकाशा बघितला. पश्चिमेकडे सतरा मैलावर डिस्पेअर नावाचे गाव होते. होपच्या शेजारीच डिस्पेअर हे नाव असलेले गाव असावे या गोष्टीचे त्याला आश्चर्य वाटले. होप म्हणजे आशा. डिस्पेअर म्हणजे निराशा.

आपले आयुष्य हा देखील असाच आशेकडून निराशेकडचा प्रवास आहे असा विचार त्याच्या मनात क्षणभर येऊन गेला. डिस्पेअरला भेट देण्याचा मोह त्याला पडला. या दोन गावांना जोडणारा रस्ता दुपदरी होता. तो तास दोन तास चालत राहिला. आठ मैलांवर एक टेकडीवजा उंचवटा लागल्यावर तो एका उंच खडकावर उभा राहिला. त्याच्या मागे पूर्वेला दहा मैलाचा वर्तुळाकार परिसर होता. त्याच्या मध्यभागी होप गाव होते. पश्चिमेला दूरवर सपाट प्रदेश होता. त्यातच आठनऊ मैलांवर डिस्पेअर गाव होते. ते होपपेक्षा मोठे वाटत होते. त्याच्या एका टोकाला औद्योगिक वसाहत असावी. त्या भागात धुराड्यांमधून धूर बाहेर पडताना दिसत होता...

डिस्पेअरला एकमेव रेस्टॉरंट दिसल्यावर जॅक रीचर कॉफी घेण्यासाठी आत शिरला. वेट्रेसने त्याच्याकडे साफ दुर्लक्ष केले. काही वेळाने चार आडदांड माणसांनी त्याला म्हटले, ''तुला येथे काही मिळणार नाही. तू हे गाव सोडून जा. तू तेथून बाहेर पड. डावीकडे जा. चार ब्लॉकनंतर मेन स्ट्रीट आहे. तेथून डावीकडे वा उजवीकडे कुठेही जा. मग आम्हाला घेणंदेणं नाही.''

जॅक रीचर म्हणाला, ''मी आत्ताच इथं आलोय. कॉफी घेतल्याशिवाय मी जाणार नाही.''

''आम्ही चौघे आहोत. तू एकटाच आहेस.''

त्या चौघांपैकी एकजण दात ओठ खात त्याच्यावर चाल करून आला. जॅकने त्याच्या जबड्यावर प्रचंड ताकदीने खालून वर मुठीचा दणका दिला. त्या समोरच्या माणसाचे नाक तुटले. जबडा बंद झाला. फुटपाथवरच्या ढिगावर पडण्यापूर्वीच

त्याची शुद्ध हरपली.

''आता तुम्ही तिघे राहिलात. मुकाट्याने निघून जा.'' जॅक रीचरने त्या तिघांना बजावले.

तेवढ्यात पोलीस येतात. ''तुला अटक करण्यात येत आहे.'' तो हुज्जत घालतो. ते दाद देत नाहीत.

डिस्पेअर या गावातले हे 'स्वागत' जॅकला विचित्र वाटते. आपणास या गावात येण्यास मज्जाव करण्याचा प्रयत्न कोणीतरी करीत आहे. तो कशासाठी? येथे काहीतरी पाणी मुरते आहे. त्याचा छडा लावलाच पाहिजे असा तो निर्धार करतो.

...न्यायाधीश त्याला भटकेपणाच्या बाबतीतल्या नियमाचे उल्लंघन केल्याबद्दल गाव सोडून जाण्याचा आदेश देतात.

पोलीस त्याला होपच्या सीमेवर सोडतात. तेथून प्रत्यक्ष गाव पाच मैलांवर असते.

त्याला होप येथील महिला पोलीस प्रमुख विचारते, ''तुला लिफ्ट हवीय का? बस माझ्या कारमध्ये. मी व्हागहान. येथील पोलीसप्रमुख.''

तो नाही म्हणतो.

ती म्हणते, ''स्वत:वर मेहेरबानी कर, झेनो. कारमध्ये बस. डिस्पेअर पोलीस खाते जेव्हा कोणाला बाहेर काढते तेव्हा लोक कसे वैतागतात ते आम्हाला ठाऊक आहे. लोक पार वेडेपिसे होतात. रीचर, मी तुला मदत करतेय. अटक नाही.''

रीचर तिच्या गाडीत बसतो. विचारतो, ''डिस्पेअरने मला बाहेर का काढले?''

''डिस्पेअरच्या पश्चिमेला खाली एक प्रचंड मेटल रिसायकलिंग प्लॅन्ट आहे. धातूचा पुनर्वापर करायचा कारखाना... येथील अर्थव्यवस्था या कारखान्यावर अवलंबून आहे. येथील प्रत्येक गोष्टीवर कारखान्याची मालकी आहे. येथील निम्मे लोक कारखान्यासाठी पूर्ण वेळ तर उरलेले निम्मे लोक अर्धवेळ काम करतात. बाहेरच्या लोकांनी येथे येऊन आपल्या पोटावर पाय देऊ नये असे त्यांना वाटते. या गावात कारखान्याच्या मालकाची सत्ता आहे. येथील बँक, शाळा, चर्च, न्यायालय... सर्व काही... काही काम न करणारा तुझ्यासारखा भटक्या माणूस येथे नको असे मालकाला वाटत असावे.''

रीचरला डिस्पेअर गावाबद्दल अधिकच जिज्ञासा वाटते. कारखान्याचे गाव म्हणून त्याचे निरीक्षण करावेसे वाटते.

तो नंतर डिस्पेअरला चोरून भेटी देत राहतो. कारखान्यातही शिरतो. मालक थरमन त्याला भेटतो. कारखान्यातील सुरक्षाव्यवस्था कडक असते. ट्रकमधून भंगार माल कारखान्यात येतो आणि लगडीच्या रूपात बाहेर जातो. ह्या ट्रकवरच्या नंबर प्लेटस वेगवेगळ्या राज्यांच्या होत्या तसेच कॅनडा वगैरे देशांच्याही होत्या. कारखान्यात

वेल्डिंगच्या ठिणग्यांचा धूर सर्वत्र होता. भट्टी धगधगत होती. हातोड्यांचा आवाज, धातू कापण्याचा आवाज, कानठळ्या बसवत होता. जुन्या कारच्या पत्र्यांची चौदा फूट एक उंच भिंत होती. ती भिंत मैलभर तरी लांब असावी.

ल्युसी अँडरसन नावाची तरुणी त्याला सांगते, रोज संध्याकाळी ७ वाजता येथून एक विमान उडते आणि रात्री दोनला ते परत येते. कारखान्यातून विमानाने कसला माल जातो असा रीचरला प्रश्न पडतो. ल्युसीचा नवरा तीन दिवसांपासून गायब असतो. रीचरला डिस्पेअरच्या वाटेवर एक प्रेत दिसते. ते त्याचे असेल का अशी शंका येते.

रीचर पुन:पुन्हा कारखान्यात चोरून प्रवेश करून माहिती मिळवत राहतो.

त्या कारखान्याच्या हद्दीला लागून यद्धसज्ज मिलिटरी पोलिसांची तात्पुरती प्रगत छावणी दिसते. फॉरवर्ड ऑपरेटिंग बेस - एफओबी. ही आर्मीची छावणी या कारखान्याबाहेर का असावी हे त्याला उमगत नाही.

कारखान्यात एकदा सुरक्षासैनिकांची नजर चुकवून रीचर शिरतो. त्याला फोरमन पकडून मालक जेरी थरमन याच्यापुढे हजर करतो.

थरमन त्याला म्हणतो, ''तू माझ्या गावात दंगा करीत आहेस. माझ्या उद्योगाच्या जागी बेकायदेशीरपणे घुसला आहेस.''

रीचर त्याला उत्तर देतो, ''ही तुमचीच चूक आहे. रेस्टॉरंटमध्ये ते गुंड पाठवले नसतेस तर नाश्ता करून मी पुढे गेलो असतो. इथे थांबायचे कारणच पडले नसते. ही इथे काही जादूची नगरी नाही.''

''तशी माझी इच्छाही नाही. ही एक औद्योगिक नगरी आहे.''

''इथे काय चालले आहे ते लपविण्याची तुमची धडपड दिसतेय.''

''आम्ही काहीही लपवत नाही.'' थरमन म्हणाला, ''हवे तर तुला मी स्वत: कारखाना दाखवतो. तुझा गाइड बनतो.''

जुना माल तोडून वितळवला जात होता आणि तो धातूच्या लगडीच्या रूपात बाहेर पडत होता हे बघण्यात रीचरला फारसे गम्य नव्हते. पुढे पार्टिशन आले. ''ज्या मालाचा अजिबात उपयोग होत नाही तो भंगार माल इथे डम्प केला जातो. आता प्रगत तंत्रज्ञानामुळं डम्प करण्यासाठी फारसं भंगार उरत नाही ही गोष्ट वेगळी.'' थरमन सांगतो.

''तुम्ही केमिस्ट आहात की मेटॅलॅजिस्ट?''

''मी एक बॉर्न अगेन ख्रिश्चन अमेरिकन आहे. एक उद्योगपती आहे. बुक ऑफ रिव्हिलेशनमध्ये म्हटल्याप्रमाणे हे आयुष्य सार्थकी लावण्यासाठी कटिबद्ध आहे. लौकरच काहीतरी लोकविलक्षण घटना घडण्याची शक्यता आहे असा मला देवाचा संदेश जाणवतो आहे. देव मला तसे सांगतो आहे. मी रॅपच्युअरमध्ये आहे. सरळ स्वर्गात जाणार, तू इथेच राहणार.'' त्यावर वाद न घालता रीचर त्याचा निरोप घेतो.

व्हागहानला सांगतो, ''थरमनने मला गुप्त जागा दाखवली नाही. पण भंगाराच्या जागेसाठी इतका कडेकोट बंदोबस्त का हे मला कळत नाही. शिवाय इथे मिलिटरी युनिट, युद्धसज्ज हम्वी गाड्या, त्यावर आठ टनाची अवजड मशिनरी, चार दिशांनी फिरणारी एम-६० मशिनगन, हे सर्व कशासाठी?''

पुन्हा एकदा रीचर थरमनला गाठतो. त्यावेळी थरमन विमानात बसण्याच्या तयारीतच असतो.

थरमनच्या हातात एक बॉक्स असतो.

''या बॉक्समध्ये काय आहे?''

''देवाची मालमत्ता. हे मेटल नाही.''

रीचर तो बॉक्स उघडून बघतो. आत एक बरणी असते. तिच्यात राख असते.

''ही कसली राख आहे? ही कुठे नेत आहेस, थरमन?''

''आज माझ्याबरोबर विमानाने ये म्हणजे तुला कळेल. मी काही लपवून ठेवत नाही. मी एक सोशिक माणूस आहे.''

विमानात दोघांच्या गप्पा होतात.

''माझ्याकडे चेंदामेंदा झालेल्या गाड्या येतात. स्टील ही एक अद्‌भुत गोष्ट आहे. ती पुन:पुन्हा वापरली जाते. जगातले बहुतेक स्टील रिसायकल केलेले असते. त्यामुळे स्टीलवर खूप पैसा मिळतो.''

विमानतळावर पोचल्यावर थरमन आपल्या कामाला निघून जातो.

रात्री विमान परत डिस्पेअरसाठी उड्डाण करते तेव्हा रीचरला थरमन विमानात न घेताच निघतो.

रीचर तेथील एका ड्रायव्हरला विनंती करून हायवेवर सोडायला सांगतो.

एक कार ड्रायव्हर थांबतो, ''मी मद्यपान केलेले आहे. तू जर कार चालवणार असशील तर तुला लिफ्ट देतो. मला डेनव्हरला जायचे आहे. होपजवळ तू मला सोडलेस तरी चालेल.'' तो ड्रायव्हर रीचरला देवासारखा वाटतो.

वाटेतच ती सबर्बन कार बंद पडते. रीचर उतरतो.

एक पाद्री कार थांबवतो. तो रीचरला लिफ्ट देतो. ''तुम्ही बुक ऑफ रिव्हिलेशन वाचलेय का? पुण्यवान लोक स्वर्गात जाणार अणि पापी लोक पृथ्वीवरच राहणार असे त्यात लिहिले आहे. जे पृथ्वीवर राहतील ते प्लेग, पूर, भूकंप संकटे यामुळे त्रस्त होतील. ख्रिस्त मग पुन्हा येईल. अँटिख्रिस्त लोकांविरुद्ध लढा होईल. जेरुसलेमच्या पवित्रभूमीत लाल रंगाचे गाईचे वासरू जन्माला येईल तेव्हा काहीतरी विलक्षण घडामोडी होतील. मध्यपूर्वेत एक मोठे युद्ध व्हायला हवे असे या पंथाचे उत्साही लोक मानतात. इराकमध्ये जे काही चालले आहे ते त्यांना तितकेसे भयानक वाटत नाही... मी आंग्लिकन आहे. माझा यावर विश्वास नाही.'' तो पाद्री रीचरला सांगतो.

रीचरला थरमनचे बोलणे आठवते.

पोलीस प्रमुख व्हागहान हिची गाठ पडल्यावर रीचर तिला थरमनने आपल्याला कसे बुद्दू बनवले ते सांगतो. जारमध्ये जळून मृत पावलेल्या लोकांची राख होती असे तो सांगतो. रणगाडे जळून त्यांची राख होते. इराकमधील युद्धात निकामी झालेले रणगाडे तेथील दहशतवादी गटांच्या हाती पडू नयेत म्हणून तेथील भंगार माल कंटेनरमध्ये घालून येथे आणला जातो. थरमन त्या रणगाड्यांचे स्टील रिसायकल करून विकतो. रणगाड्यांच्या समोरच्या बाजूला आणि बाजूच्या चिलखतांना डिप्लिटेड युरेनियमचा जाड थर दिलेला असतो. हा अणुभट्टीत वापरल्या जाणाऱ्या युरेनियमचा बायप्रॉडक्ट असतो. डिप्लिटेड युरेनियम विषारी असते; रेडिओ ॲक्टिव्ह असते. रणगाड्यावर स्फोट झाला तर किंवा युरेनियमची धूळ झाली तर किरणोत्सर्गाने माणसे आजारी पडू शकतात. थरमन हा युरेनियम स्पेशालिस्ट आहे, मिलिटरी पोलीस त्या युरेनियमसाठी तैनात केलेले आहेत. दहशतवादी यापासून डर्टी बॉंब बनवू शकतात. या कारखान्यात कामगार हातोडे आणि टॉर्चने रणगाड्याचे पार्ट कट करतात. त्यामुळे त्याची धूळ होते. तुकडे होतात. वाफ होते. येथील कामगार आजारी दिसतात. काहीजण त्यामुळे मरण पावतात. केस गळणे, मळमळणे, उलट्या, जुलाब, फोड, व्रण वगैरे परिणाम हे किरणोत्सर्गामुळे संभवतात. कारखान्यातील एका डेप्युटीने युरेनियममुळे माझी ही अवस्था झाली असे रीचरला सांगण्याचा प्रयत्न केला त्याचा अर्थ हा होता. डिस्पेअरमधील प्लँट रिसायकलिंगसाठी आहे. युद्धात वापरलेल्या हम्वी कारवर रणगाड्यांवरून फेकलेल्या तोफगोळ्यांमुळे त्यापासून किरणोत्सर्गाचा धोका असतो. तो लपविण्याचा प्रयत्न करावा लागतो.

अशा गोष्टींचा रीचरला पत्ता लागतो. डर्टी बॉंबमध्ये दूषित मेटल आणि रेडिओ ॲक्टिव्ह भंगार वापरले जाते.

त्याला हेही कळते की डिस्पेअरच्या त्या कारखान्यात वीस टन डिप्लिटेड युरेनियमचा साठा आहे. वीस टन टीएनटी आहे.

थरमनचा एंडटाइम्सच्या संकल्पनेवर दृढ विश्वास आहे. तो कट्टर धर्मवेडा आहे. मध्यपूर्वेत एक मोठे युद्ध होणे या धर्मवेड्यांना गरजेचे वाटते. इस्राएलमध्ये लाल रंगाची गाय जन्माला घालण्याचे त्यांचे प्रयत्न चालू आहेत. तशी गाय जन्माला आली तर जगाचा अंत होईल अशी त्यांची श्रद्धा आहे. असे युद्ध सुरू होण्यासाठी हे माथेफिरू अनुकूल परिस्थिती निर्माण करण्यामागे लागलेले आहेत. थरमनने त्यासाठी वीस टन डिप्लिटेड युरेनियम, वीस टन टीएनटी, इराणी कार्स वगैरेंची जमवाजमव करून ठेवली आहे. डर्टी बॉंबचा एखादा स्फोट झाला तरी सगळीकडे हाहाकार माजेल.

आता अशा परिस्थितीत जॅक रीचरने काय करायला हवे?

तो कारखान्याच्या गुप्त भागात प्रवेश करतो. बरोबरच होपची पोलीस प्रमुख वॉगहान असते. बाहेर पडण्याच्या तयारीत असणारा अठरा चाकी सेमी ट्रक त्याला समोर दिसतो. एक ट्रॅक्टर, एक ट्रेलर, चाळीस फुटी कंटेनर... त्याचबरोबर चार सेलफोन खरेदीचे बिलही त्याला मिळते. रिमोटने बॉंबस्फोटाचा डाव दिसतोय हे त्याच्या लक्षात येते.

थरमनला रीचर विचारतो, ''या कंटेनरमध्ये काय आहे?''

''कपडे, औषधे, चष्मे, व्हिटॅमिन्स, ब्लँकेट्स, कृत्रिम अवयव - अफगाणिस्तानातील शरणागतांना भेट देण्यासाठी.''

''युरेनियम कुठे आहे?''

''तू त्यावर उभा आहेस. ते खाली जमिनीत पुरून ठेवलेले आहे.''

रीचरच्या लक्षात येते की त्या चाळीस फुटी कंटेनर ट्रकमध्ये एक सेलफोन ठेवून त्याच्या रिंगरच्या वायरी एका सर्किटला जोडलेल्या असतील, कदाचित एखादा एक्सटर्नल अँटेना...

रीचर-वॉगहान त्या परिसरातून तीन मैल दूर सुरक्षित अंतरावर जाऊन सेल फोनवरून विशिष्ट नंबर फिरवतात.

सात सेकंद जातात. क्षितिजावर पांढऱ्या प्रकाशाचा प्रचंड लोट येतो. पडणाऱ्या पावसाच्या पाण्याची पांढरी वाफ सर्वत्र पसरते. स्फोटाचा आवाज ऐकू येतो. ट्रकचे तुकडे तुकडे होऊन सर्वत्र विखुरले जातात.

कारखान्यातील या अपघातात प्रचंड हानी होते. मिलिटरी पोलीस पाच मैलांच्या आसपास नाकेबंदी करतात. मेटल रिसायकलिंगचा कारखाना एवढेच जनतेला ठाऊक असते. डिप्लिटेड युरेनियम वगैरे कुणाला ठाऊक नसते.

कारखान्यात अपघात होत असतात... त्यामुळे या अपघाताकडे एक नैमित्तिक बाब म्हणून पाहिले जाते. फार खोलात कोणी जात नाही. लोकांना सहा महिन्यांसाठी मदतीची योजना जाहीर होते.

जॅक रीचर डिस्पेअरचा निरोप घेतो. त्याला लिफ्ट मिळते. सॅन दिएगोला त्याला पोचायचे असते.

'डिस्पेअर'सारख्या एका कारखान्याच्या गावात जॅक रीचरला थारा मिळत नाही, त्याला हुसकावून लावण्याचे प्रयत्न होतात. त्यामागची कारणे अशी उलगडत जातात...

'नथिंग टू लूज' म्हणता म्हणता बरेच काही गमावले जाते.

ली चाइल्डचा मिलिटरी पोलीस नायक जॅक रीचर याला अशा प्रकरणांचा सामना करताना आनंद मिळतो. वाचकांनाही.

**किंमत : ३५०रु. सभासदांना : सवलतीत पोस्टेज : ३०रु.**

# पुस्तक परिचय

## विरोधकांची मुस्कटदाबी करणाऱ्या पुतिनच्या राजवटीचा पर्दाफाश

# ए रशियन डायरी




**ॲना पोलितकोवस्क्या** अनु : शोभना शिकनीस

सोव्हिएट रशियाचे १९९२ मध्ये विघटन झाले आणि अमेरिकेचा प्रतिस्पर्धी म्हणून तसेच जगातील दुसऱ्या क्रमांकाचा तुल्यबळ देश म्हणून असणारे रशियाचे स्थान अस्तंगत झाले.

जॉर्जिया, लॅटव्हिया, लिथुआनिया, एस्टोनिया, चेचन्या, डागेस्तान, कार्गीझस्तान, युक्रेन, बाशकोर्टोस्तान वगैरे राज्ये स्वतंत्र झाली आणि उर्वरित राज्यांचे कॉमनवेल्थ ऑफ इन्डिपेंडन्ट स्टेट्स हे रशियन फेडरेशन निर्माण झाले. सुप्रीम सोव्हिएत ऐवजी 'ड्युमा' या संसदेची पुढे स्थापना झाली.

बोरिस येल्तसिनने या रशियन फेडरेशनचा पहिला अध्यक्ष म्हणून सूत्रे स्वीकारून (१९९१) रशियन कम्युनिस्ट पक्षावर बंदी आणली. कम्युनिस्ट पार्टीच्या एकाधिकारशाहीला सुरुंग लावण्यासाठी लिबरल डेमोक्रॅटस ही पार्टी १९८९ पासून कार्यरत होती. येल्तसिनने तिला पाठिंबा देऊन स्वत:चे स्थान भक्कम करण्याचा प्रयत्न केला. चेचन्याविरुद्ध युद्ध पुकारले.

रशियाची अर्थव्यवस्था येल्तसिनच्या काळात अधिकाधिक ढासळत गेली. योब्लोको या नव्या पक्षाने मुद्रणस्वातंत्र्य, लोकशाही, युरोपियन युनियनमध्ये रशियाचे अंतिम एकात्मिक विलीनीकरण, चेचन्या युद्धाला विरोध यांचा आग्रह धरला. येल्तसिनने आपला उत्तराधिकारी म्हणून निवडलेल्या व्लादिमीर पुतिन याला संसदीय मार्गाने हटविण्याचा इरादा जाहीर केला.

पुतिनने रशियन फेडरेशनचे अध्यक्षपद इ. स. २००० मध्ये स्वीकारले. २००४, २००८ मध्ये निवडणुका जिंकून आपले अध्यक्षपद टिकवले. आता पुढील वर्षी (२०१२) निवडणुका आहेत. त्यातही पुतिन यशस्वी ठरेल अशी शक्यता आहे.

पुतिन याने आपल्याला मिळालेल्या सत्तापदाचा वापर कसा केला, रशियाची डबघाईला आलेली आर्थिक घडी बसविण्यासाठी कोणती पावले उचलली, कायदा आणि सुव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी कोणकोणते मार्ग अवलंबले याबाबत रशियातील जनता आणि आंतरराष्ट्रीय राजकीय निरीक्षक यांची प्रतिक्रिया संमिश्र आहे. साम्यवाद संपवून लोकशाहीची प्रस्थापना करणे, राष्ट्रीय उत्पादन वाढवणे आणि जागतिक पातळीवर आपली पत पुन्हा निर्माण करणे यासाठी समयोचित निर्णय घेणे त्याला क्रमप्राप्त होते. परंतु ते करताना उक्ती आणि कृती यात सुसंगती राखणे त्याला जमले नाही अशी टीका त्याच्यावर होत राहिली. लोकशाही राज्यप्रणालीचा उद्घोष तोंडाने चालू असला तरी विरोधकांची गळचेपी, प्रसारमाध्यमांची मुस्कटदाबी, संसदेच्या हक्कांची पायमल्ली, निवडणुकीतील दडपशाही, चेचन्यातील लढाई व जुलूम जबरदस्ती, पोलिस आणि शासकीय यंत्रणांची निष्क्रियता, खतरनाक माफिया गुंडांना हाताशी धरून लोकमतावर अंकुश ठेवण्यावर दिलेला भर, जनतेच्या

मनावरचे भयभीतीचे सावट - यातून पुतिनच्या एकतंत्री, एकछत्री हुकुमशाही मनोवृत्तीचेच दर्शन घडते असा आरोप केला जातो.

टेलिव्हिजन, वृत्तपत्रे या माध्यमांवर अनेक बंधने आहेत. विरोधी मतप्रदर्शन करणाऱ्यांचा आवाज दडपून टाकण्यासाठी धाकदपटशाचा सर्रास अवलंब केला जातो. भ्रष्टाचार, लाचलुचपत यामुळे देश पोखरला जात आहे. रशियन साधनसंपत्तीचा आणि उत्पादनक्षमतेचा पुतिनने लिलाव मांडला आहे आणि त्याबद्दल काही लिहिणे बोलणे शक्य नाही त्यामुळे सत्यान्वेषी पत्रकारांची आणि विचारवंतांची घुसमट चालू आहे.

पाच वर्षांपूर्वी (इ.स. २००६) पुतिनच्या वाढदिवशी, दिनांक ७ ऑक्टोबर रोजी रशियातील एक तडफदार पत्रकार ॲना पोलतकोवस्काया हिची तिच्या मॉस्कोमधल्या अपॉर्टमेंटच्या लिफ्टमध्ये गोळ्या घालून हत्या करण्यात आली. सुपारी देऊन तिचा निकाल लावण्यात आला. तिच्या मारेकऱ्यांचा अद्यापही सुगावा लागलेला नाही.

रशियात कम्युनिस्ट राजवटीत इनव्हेस्टिगेटिव्ह पत्रकारांची कारावासात वा छळछावणीत रवानगी ही काही अपवादात्मक बाब नव्हती. स्वत:ला लोकशाहीवादी आणि उदारमतवादी म्हणवून घेणाऱ्या व्लादिमीर पुतिननेही आपल्यावर सतत टीका करणाऱ्या आणि नोवाया गॅझेटा या वृत्तपत्रातून पुतिन राजवटीतल्या मानवाधिकार भंगाच्या आणि भ्रष्टाचाराच्या प्रकरणांचा पर्दाफाश करणाऱ्या ॲना पोलितकोवस्काया हिच्यावर मारेकरी घालून ते प्रकरण दडपून टाकून केजीबीचा आपला वारसाच प्रकट केला, असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही.

चेचन्याच्या युद्धावरची ॲनाची वार्तापत्रे यूरोप-अमेरिकेत विश्वासार्ह आणि वस्तुस्थितिनिदर्शक मानली जात. 'ए स्मॉल कॉर्नर ऑफ हेल : डिस्पॅचेस फ्रॉम चेचन्या' (२००३), पुतिन्स रशिया (२००५) ही तिची पुस्तके रशिया आणि पुतिनचा खोटेपणा चव्हाट्यावर मांडणारी होती. त्यामुळे तिचा आवाज कायमचा बंद करण्यासाठी पुतिनने हे टोकाचे पाऊल उचलले असावे असे मानले जाते. यापूर्वीही ॲनाला धमक्या, धाकदपटशा यांचा सामना करावा लागला होता. इ. स. २००२ मध्ये मॉस्को थिएटर ओलीस प्रकरणात मध्यस्थीसाठी विमानाने जात असताना तिच्यावर चहातून विषप्रयोग करण्यात आला होता आणि अत्यवस्थ स्थितीत तिला मध्येच उतरविण्यात आले होते.

त्या विषप्रयोगाच्या प्रयत्नातून ती बचावली आणि चेचन्याच्या लढाईतील रशियाच्या गैरकृत्यांची, क्रौर्याची माहिती ती पाश्चात्य माध्यमांना पुरवत राहिली. इतर रशियन पत्रकारांनी या प्रकरणी मूक राहणेच पसंत केले होते. त्यामुळे आंतरराष्ट्रीय पत्रकार संघटनांनाही तिच्या धाडसाचे आणि धैर्याचे मोठेच अप्रूप वाटत होते. मानवाधिकार संघटना आणि ॲम्नेस्टी इंटरनॅशनल या संस्थांनी तिला पुरस्कार देऊन तिच्या निर्भय पत्रकारितेचा गौरव केला होता.

मारेकऱ्यांनी तिच्यावर गोळ्या झाडून तिची हत्या केली त्यावेळी तिचे वय फक्त ४८ वर्षे होते. तिला वेरा आणि लिया या दोन कन्या होत्या.

अलेक्झांडर पोलितकोवस्काया हा तिचा पती. मॉस्को स्टेट युनिव्हर्सिटीमध्ये पत्रकारितेच्या पदवी अभ्यासक्रमात तो तिचा सहकारी होता. रात्री उशिरा प्रसारित होणाऱ्या टीव्हीवरील वार्तापत्राचा संपादक म्हणून तो कार्यरत होता. १९८० पासून पतिपत्नी दोघे पत्रकार म्हणून आपली कारकीर्द गाजवत होते.

तिच्या हत्येनंतर इ.स. २००३ ते २००५ मधील तिच्या डायऱ्यांमधील नोंदींचे 'ए रशियन डायरी' हे पुस्तक २००७ साली युरोपमध्ये प्रकाशित झाले. त्यावरून पुतिनची दडपशाही, रशियातील मानवाधिकाराची पायमल्ली, भ्रष्टाचार, चेचन्यामधील युद्ध, संसदीय लोकशाहीचे बेगडी स्वरूप, बेसलान शाळेचे ओलिस प्रकरण, निवडणुकीतील गैरप्रकार, शासकीय यंत्रणेची निष्क्रियता यांची अस्सल, सत्य माहिती मिळते. या पुस्तकाने पुतिनच्या राजवटीचे पितळ उघडे केले. रशियन लोकशाहीचा पर्दाफाश केला.

'ए रशियन डायरी' नंतर 'नथिंग बट द ट्रुथ' हे पुस्तक २०१० मध्ये इंग्लंडमध्ये मेलव्हिल हाऊसने प्रसिद्ध केले. त्यात ॲनाच्या निवडक वार्तापत्रांचे संकलन केले गेले आहे. तिच्या शेवटच्या पर्वातील काही वार्तापत्रांवरून तिला ठार मारणे रशियाच्या सत्ताधीशांना का भाग पडले असावे याची कल्पना येते. इ. स. २००४ नंतरच्या कालखंडातील वार्तापत्रेही यात आहेत. तिच्या संगणकावरही काही लेख तिच्या मृत्यूनंतर सापडले. रशियन पत्रकारांच्या समकालीन पिढीचा उल्लेख ती 'जनतेची करमणूक करणारे विदूषक' असा करते. सत्ताधीशांची मर्जी सांभाळण्यात कुचराई करणाऱ्या पत्रकारांना फोन, इंटरनेट यावरून सतत धमक्या दिल्या जात. कारावासाची भीती दाखवण्यात येई. चेचन्यामधील सामूहिक हत्याकांड, बलात्कार, जिवंत महिलांना जमिनीत पुरण्याचे प्रकार, गुप्त इंद्रिये छाटण्याचे प्रकार, बोटे छाटण्याचे प्रकार वगैरेंची वर्णने वाचणेही असह्य होते.

हेच पुस्तक अमेरिकेत 'इज जर्नलिझम वर्थ डायिंग फॉर?' या नावाने नुकतेच प्रसिद्ध झाले आहे.

**'ए रशियन डायरी' हे पुस्तक वाचणे ही काही सोपी गोष्ट नाही. रंजन म्हणून, टाइमपास म्हणून ही डायरी वाचता येणार नाही.**

पुतिनच्या राजवटीत सत्य आणि असत्य, खरे आणि खोटे, देशहित आणि देशद्रोह, घोषणा आणि वास्तव यांच्यातील सीमारेषा इतक्या धूसर झालेल्या दिसतात की आपली विवेकशक्ती बधीर होते. आपल्या जीवनविषयक आदर्श कल्पनांना हादरा बसतो.

'पुतिन पुन्हा कसे निवडून आले?' या प्रकरणाच्या आरंभी, प्रेसिडेंट म्हणून निवडून येण्यासाठी ड्युमाच्या संसदेत प्रचार मोहिमेचा आरंभ करताना पुतिन याचा

चेहरा नेहमीप्रमाणे दुर्मुखलेला नव्हता, थोडा आनंदी पण अस्वस्थ होता असे नोंदवून त्याच्या टीव्ही वरील मुलाखतीची माहिती दिली आहे. जरा हसून पुतिन म्हणाला, 'आज एक आनंदाची बातमी तुम्हाला सांगायची आहे. आमच्या लाडक्या कॉनी या लॅब्रॅडॉर कुत्रीने काल रात्री पिलांना जन्म दिला...' कॉनीने अचूक राजकीय टायमिंग जुळवून युनायटेड रशिया पार्टीला ही भेट दिली. 'घरी जाऊन तिला भेटायची आम्हाला घाई झाली आहे.' असे पुतिनच्या पत्नीने म्हटले. त्याच दिवशी सकाळी दहशतवादी हल्ल्यात बळी पडलेल्या तेरा विद्यार्थ्यांचे दफन चालू होते. त्याबद्दल सहानुभूती - सांत्वन करण्याचा विचारही पुतिनच्या मनात आला नाही, कुत्रीला पिल्ले झाल्याचा आनंदच संसदेत व्यक्त करावासा त्यांना वाटला.

अशा उपरोधपूर्ण नोंदी या डायरीत पानोपानी वाचायला मिळतात. कधी उपरोधात्मक, कधी निरागस.

''फँटमसारख्या युनायटेड रशिया पार्टीलाही बरीच मते मिळाली होती. पुतिनला पाठिंबा देणे हा या पार्टीचा एकमेव कार्यक्रम होता.'' (३)

''युनायटेड रशियन पार्टीने उमेदवारी नाकारलेल्या उमेदवारांना अनोळखी गुंडांकडून मारहाण झाली. त्यांना निवडणुकीतून माघार घेणे भाग पडले. माघार घेण्यास नकार देणाऱ्या उमेदवारांच्या घरात रक्ताळलेले मानवी अवयव असणाऱ्या प्लॅस्टिक बॅग्ज फेकण्यात आल्या.''

''या देशात (रशिया) चाळीस टक्के लोक अधिकृत धोकादायक दारिद्र्यरेषेखाली जगत आहेत. डेमोक्रॅट्सना जनतेच्या या भागाशी संपर्क साधण्यात रस नव्हता. श्रीमंत आणि मध्यमवर्ग यांच्यावरच त्यांनी लक्ष केंद्रित केले. खासगी मालमत्ता वाचवणे आणि नव्या मालमत्ताधारकांचे हितसंबंध रचणे यावर त्यांचा भर होता.''(७)

या देशात राज्यसंस्थांमध्ये गुंड माफियांचा भरणा आहे तोपर्यंत लोकांच्या जीवनात काहीही बदल घडणार नाही. आपल्या सैन्यात कधी न संपणारी दडपशाही चालू आहे. (६)

आज क्रेमलिनमध्ये बुद्धिनिष्ठ विधायक भूमिका घेऊन काम करणारा एकही पक्ष उरलेला नाही. (६)

निवडणुकीत पुतिन समर्थक पक्षांना निर्विवाद बहुमत मिळाले. युनायटेड रशिया पक्षाला २१२ जागा आणि त्याच्याशी सहकार्य करणाऱ्या 'स्वतंत्र' उमेदवारांना ६५ जागा मिळाल्या. एक मोठा पक्ष आणि त्याचे समर्थन करणारे चिल्लर छोटे पक्ष असे कोंडाळे तयार झाले. (९)

निवडणुकीनंतर पुतिनने घोषणा केली की पार्लमेंट हे ठिकाण वादविवादासाठी नव्हे तर कायद्याची व्यवस्थित आखणी करण्यासाठी आहे. (९)

निवडणुकांच्या कायद्याला हवीतशी मुरड घालून मनासारखे निकाल लावण्यात

आले. नोकरशहांनी न्यायव्यवस्थेचा ताबा घेतल्याने एकाही निकालाविरुद्ध कोणी न्यायालयाकडे धाव घेतली नाही. नोकरशहांनी युनायटेड रशिया पक्षाशी हातमिळवणी करून पक्षश्रेष्ठींना निवडून आणले. (९)

दुसरे चेचेन युद्ध युनियन ऑफ राइट फोर्सेसने नव्हे तर पुतिनने सुरू केले. (१३) वॉर लीडर म्हणून पुतिनवर रशियातील मध्यमवर्गाने आणि विचारवंत वर्गाने शिक्कामोर्तब केले. चेचन्याबद्दल लिहिण्यास वृत्तपत्रांना मज्जाव करण्यात आला. मात्र ॲना पोलितकोवस्कायाच्या नोवाया गॅझेटाला काहीही छापण्याची मुभा देण्यात आली. ''तुमचा पेपर स्ट्रासबोर्गला नेऊन पुतिनचे अधिकारी सांगतात की आमच्याकडे वृत्तपत्रांना पूर्ण स्वातंत्र्य आहे याचा पुरावा म्हणजे हा पेपर. नोवाया गॅझेटा मध्ये जे छापले जाते ते तद्दन कपोलकल्पित आहे.'' (१३)

'फायनान्शिअल टाइम्स' मधील लेखात मूठभर हुकुमशहा येथील सगळी स्थावर-जंगम मालमत्ता विकून पश्चिमेकडे स्थायिक होण्याच्या तयारीत आहेत असे विधान छापून आले. (१३)

...अशा वेगवेगळ्या नोंदीतून रशियातील घटनांची आणि पुतिनच्या कारकीर्दीची माहिती मिळत जाते.

पुतिनने एका फोन-इन टीव्ही कार्यक्रमात दिलेली उत्तरे त्याच्या मानसिकतेवर प्रकाश टाकतात. (२५-३२) एका लाखावर प्रश्न त्यासाठी आले होते. त्यातील निवडक प्रश्नांना पुतिनने उत्तर दिली. हे प्रश्न उत्स्फूर्तपणे विचारले जावे आणि उत्तरेही उत्स्फूर्तपणे दिली जावी अशी योजना नव्हती. पुतिनने निवडलेल्या प्रश्नांची उत्तरे पूर्ण तयारीनिशी, आकडेवारीसह दिली.

शासकीय कार्यालयात पुतिनची तैलचित्रे लावण्यात आल्याबद्दल एक प्रश्न होता. त्याचे उत्तर देताना पुतिन म्हणाला, अध्यक्ष हा राज्याचा प्रतीक मानला जातो. त्यामुळे अशी तैलचित्रे लावण्यात काहीच गैर नाही. माफक प्रमाणात सर्वच चांगले असते. याचे विस्मरण घडले तर मात्र चिंतेची बाब ठरते.

'तुमच्या कुत्रीला झालेली पिल्ले कशी आहेत?' याचे उत्तर देण्यात आले, ''ती खूपच खेळकर आहेत. त्यांना दत्तक घेण्याची इच्छा अनेक नागरिकांनी व्यक्त केली आहे. त्याबद्दल माझी मुले व पत्नी काय ते ठरवतील. ती पिल्लं चांगल्या घरात जावीत याबद्दल योग्य ती खातरजमा करावी लागेल.''

रशिया फॉर द रशियन्स असा आग्रह धरणाऱ्या लोकांना पुतिनने मूर्ख व उपद्व्यापी अशी विशेषणे लावली. ''रशिया हा बहुराष्ट्रीय देश आहे. हे खोडसाळ लोक रशियन नागरिकांत दुफळी माजवत आहेत. अशा लोकांविरुद्ध कारवाई करण्याबाबत प्रोक्युरेट जनरलशी मी चर्चा करणार आहे.''

न्यायालयातील भ्रष्टाचाराला आळा घालता येईल का?

कोर्टाची यंत्रणा स्वतंत्र, पारदर्शकता जपणारी, सामाजिक बांधिलकी जपणारी असावी. न्यायाधीशांना स्वनियंत्रणाचा अधिकार आहे. तो त्यांनी वापरावा.

तुम्ही भावनाप्रधान आहात का?

''हो. दुर्दैवाने हो.''

तुम्ही या कार्यक्रमाला होकार का दिलात?

''लोकशाहीला मजबूत बनवणे, बहुपक्षीय राज्यप्रणाली तयार करणे, एक शक्तिशाली उजव्या बाजूचे केंद्र, सामाजिक लोकशाही डाव्या बाजूला, मित्रपक्ष एका बाजूला आणि अल्पसंख्याक गट - हे साध्य करण्यासाठी मी कटिबद्ध आहे.''

मुलाखतीतून पुतिनचे जे सज्जन, सालस व्यक्तिमत्त्व प्रकट होते ते किती खोटे, फसवे आहे हे या डायरीत पानोपानी ॲनाने नोंदवले आहे. अनेक पुतिनविरोधकांचा निर्घृण छळ करण्यात आला, गुंड-माफियांना मोकळे रान मिळाले, भ्रष्टाचार-दडपशाही यांना जोपासले गेले. प्रशासकीय यंत्रणेचा दुरुपयोग करण्यात आला, चमचेगिरीला प्रोत्साहन देण्यात आले, माध्यमांवर अंकुश ठेवण्यात आला.

रशियन इतिहासातला स्टॅलिनचा एककल्ली टप्पा संपल्यावर काही वेगळे घडेल ही अपेक्षा होती ती पुतिनने फोल ठरवली हे या डायरीवरून लक्षात येते.

रशियात पुतिन जे करतो ते अपवादात्मक मानण्याचे कारण नाही. भारतातही त्यापेक्षा वेगळे काही होत आहे असे नाही हे आपल्याला जाणवेल. सत्ताधारी सगळीकडे सारखेच!

ॲना पोलितकोवस्कायासारखे शोध पत्रकार सत्यासाठी प्राणांची बाजी लावतात. त्यांचे बलिदान व्यर्थ जातेच असे नाही. पुतिनच्या राजवटीचा हा पर्दाफाश आपल्याला अस्वस्थ करून जाईल.

**किंमत : ३००रु.   सभासदांना : सवलतीत   पोस्टेज : ३०रु.**


# प्रिय वाचकमित्रहो........

आपल्या सोयीसाठी

**'मेहता पब्लिशिंग हाऊस'**चे ग्रंथदालन

आठवड्याचे सातही दिवस नियमित सुरू राहील.

वेळ -सोम. ते शनि. ९.३० ते ६.३०

रविवारी सकाळी १० ते ४

**सभासदांनी पुस्तकखरेदीस येताना मेंबरकार्ड जरूर आणावे.**

## आगामी

# द गॉड ऑफ ॲनिमल्स




**आर्यन कायले**
अनु. **गीतांजली वैशंपायन**

**२८०रु.** पोस्टेज २५रु.

बारा वर्षांच्या ॲलिस विंस्टनची ही गोष्ट आहे. लग्नासाठी घरातून पळून गेलेली मोठी बहीण, अंथरुणाला खिळलेली मनोरुग्ण आई अन् तापट, घुम्या स्वभावाचे वडील – हे तिचं कुटुंब. जोडीला घोड्यांचा मोडकळीस आलेला तबेला. गुजराण करण्यासाठी विंस्टन कुटुंबीय इतरांच्या घोड्यांची देखभालही करतात. त्या घोड्यांच्या मालकांशी (बहुतेक स्त्रिया!) आणि त्यांच्या आयुष्याशी विलक्षण भावनिक गुंतागुंत होते. लहानगी ॲलिस शाळेत असतानाच एका प्रौढ माणसाच्या प्रेमात पडते. त्यातला आनंद मिळवत असतानाच, कठोर वास्तवाची तिला जाणीव होते. क्रौर्य, खोटेपणा, फसवणूक याबरोबरच चांगुलपणा, हळवेपणा प्रत्येकात असतो, याचीही जाणीव तिला या प्रवासात होते.

**पौगंडावस्थेतल्या स्वप्नाळू मुलीची निसरड्या वाटेवरची अविस्मरणीय कहाणी!**

# पुस्तक परिचय

**व्हिएतनामच्या आधुनिक इतिहासातील एक विदारक आणि हृदयद्रावक अध्याय**

# उद्ध्वस्त




**उमेश कदम**

निसर्गाचा वरदहस्त लाभलेल्या व्हिएतनाममधील खेड्यापाड्यांतून राहणारी माणसेही निसर्गासारखीच निखळ, निरुपद्रवी व साधीभोळी; परंतु विसाव्या शतकाच्या मध्यापासून तेथील जनतेला यादवीचे ग्रहण लागले. साम्यवादी व लोकशाहीवादी असे दोन गट निर्माण झाले. लोकशाहीवादी दक्षिण व्हिएतनामला बळकट करण्यासाठी अमेरिका त्यांना मदत करू लागली. मे १९६१ मध्ये अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष जॉन केनेडी यांनी व्हिएतमिन्ह सरकारच्या मदतीला सैनिकांची एक तुकडी पाठवली आणि त्यानंतर १९६३ मध्ये लिंडन जॉन्सन यांनीही तोच उपक्रम पुढे सुरू ठेवला. यानंतर व्हिएतनाममधून सैन्य माघारी घेऊन सन्मानाने शांतता प्रस्थापित करण्याचा दावा करून रिचर्ड निक्सन १९६८ मध्ये अमेरिकेचे अध्यक्ष झाले; परंतु त्यांच्या कार्यकालामध्ये १६ मार्च १९६९ रोजी चार्ली कंपनीच्या एका तुकडीने पूर्व व्हिएतनामच्या कॉंग-अंगैमधील 'मी-लॉय' हे खेडे उद्ध्वस्त केले.

या विदारक घटनेचे वर्णन म्हणजे उमेश कदम यांची 'उद्ध्वस्त' ही कादंबरी.

उमेश कदम हे आंतरराष्ट्रीय रेड क्रॉस संघटनेचे सल्लागार असल्यामुळे त्यांनी विविध देशांचे दौरे केले. 'आंतरराष्ट्रीय मानवतावादी कायदा, नव्या घडामोडी, नवी आव्हाने' या विषयावरच्या चर्चासत्रात भाग घेण्यासाठी त्यांची निवड झाली आणि याच अनुषंगाने 'युद्धविषयक मानवतावाद - तत्त्वे आणि नियम' या विषयावर आयोजित करण्यात आलेल्या अनेक चर्चासत्रांतून भाग घेताना 'मायकेल बोल्टन' आणि 'केव्हिन सीम' यांनी सखोल संशोधन करून लिहिलेल्या 'फोर अवर्स इन मी लॉय' या पुस्तकातून आणि इंग्लंडमधील यार्कशायर टेलिव्हिजन कंपनीने निर्मिती केलेल्या माहितीपटातून काही संदर्भ घेऊन उमेश कदम यांनी ही 'केस स्टडी' तयार केली आणि यातूनच या कादंबरीचा जन्म झाला.

या कादंबरीचा केंद्रबिंदू 'सुआन' ही सुमारे पाच-सहा वर्षांची मुलगी असून तिच्या घरापासून या कादंबरीचे कथानक सुरू होते आणि तिच्या निधनाने हे कथानक संपते.

या कादंबरीत दोन कथा समांतरपणे सांगितल्या आहेत. एक सुआनची कथा व दुसरी युद्धाची कथा. दोन्ही कथा परस्परांशी निगडित आहेत. येथे 'मी-लॉय' या खेड्याचा 'नी-लॉय' असा उल्लेख केला आहे. तसेच सत्य घटना जशाच्या तशा न वापरता त्यांच्यात थोडेफार बदल केल्याचे लेखकाने सुरुवातीलाच म्हटले आहे.

सुआनचे आई-वडील लिएम आणि दॉग यांच्या घरातील कौटुंबिक वातावरण 'नी-लॉय' या गावातील समाज स्थितीचे प्रतिनिधित्व करते. शांततापूर्ण जीवन जगत असलेल्या या वस्तीवर अचानक हल्ला होतो. सुआनचे नशीब बलवत्तर म्हणून ती या हल्ल्यातून आश्चर्यकारकरीत्या वाचते. परंतु सैनिकांनी केलेले अत्याचार, छळ आणि हत्याकांड एका ढोलीतून झुडपाच्या मागून ती प्रत्यक्ष पाहते. या घटनेचा

तिच्या मनावर परिणाम होतो. ही जखम तिच्या मनावर खोलवर रुजते. तिची शुद्ध हरपते. शुद्धीवर आल्यावर ती स्वत:ला सावरून शेजारच्या 'बिंताय' या खेड्यात जाते. तिथे तिला भेटलेली 'विएप' व तिचा पती 'ताम', बिंताया खेड्याच्या 'उन-बाय-हान-मिन्ह' या पंचायत मंडळाचा प्रमुख 'थिन क्वाप', तिचा सांभाळ करणारे वियेन आणि किम हे दाम्पत्य व आपल्या अनाथाश्रमात भरती करून घेणारी कोंतुम येथील मिसेस व्हॅलेरी देमिएर - या सर्व व्यक्तींनी सुआनला प्रेमाने सांभाळले आहे. यातून कनवाळू वृत्तीची पात्रे रंगवली आहेत.

कॉलिन बर्टन नामक एका थोर समाजसेवकाचे पात्रही येथे आहे. युद्धपीडित लोकांच्या पुनर्वसनाचे काम करणाऱ्या या समाजसेवकाने सुआनलाही दत्तक घेतले आहे आणि पुढे सुआनची 'कॅथरिन बर्टन' होऊन तिनेही हा वसा पुढे सुरू ठेवला आहे. बालपणीच्या त्या युद्धाच्या आठवणींच्या आधारे आणि युद्धभूमीला प्रत्यक्ष भेटी देऊन त्या प्रसंगांचे चित्रण करणारे पुस्तक तिने लिहिले आहे. परंतु मानसिक तणावामुळे ती अखेर आत्महत्या करते हा प्रसंग मनाला चटका लावणारा आहे.

युद्धनीती बाजूला सारून केवळ खुनशी वृत्तीने स्वत:ची रग शमवण्यासाठी, आदेशांचा विपर्यास करून निरपराध लोकांचे बळी घेणारे जॉर्ज हॅले, फर्नांडो निकोल्सन आणि चार्ल्स पार्कर यांचे कोर्ट मार्शल करून त्यांना फाशीची शिक्षा ठोठावण्यात आल्यानंतर किथ अँडरसन या वकिलाने सर्वोच्च न्यायालयात ही प्रक्रियाच घटनाबाह्य ठरवून त्या तिघांची सुटका कशी केली याचे नाट्यमय वर्णन येथे केले आहे.

तरीही माणसाच्या न्यायालयातून मुक्त झालेल्या या तिघांना नियतीच्या न्यायालयात कशी शिक्षा मिळते याचे चित्रणही येथे केले आहे. 'नी-लॉय'च्या युद्धाची खरी माहिती उघड करण्यासाठी 'प्रायव्हेट लिओनी' हा सैनिक आणि 'सायमन हडसन' हा छायाचित्रकार अशी पात्रेही या कादंबरीत ठळकपणे रंगवली आहेत.

युद्धामध्ये मानवतावादी कायद्यांचे नियम न पाळल्याने किती अमानुष व हिंसक परिणाम होऊ शकतो याचे उदाहरण म्हणजे 'नी-लॉय'चे हत्याकांड. हे युद्ध नसून एकतर्फी संहार असल्याचे या कथेवरून दिसते.

या कादंबरीतील काही व्यक्तिमत्त्वे अजूनही हयात आहेत असे म्हटले आहे. या कथानकात वास्तव आणि कल्पित यांचा संयोग साधून आधुनिक इतिहासातील एक विदारक आणि हृदयद्रावक अध्याय चित्तवेधक आणि नाट्यपूर्ण रीतीने मराठी वाचकांसमोर मांडण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे.

**कमलाकर राऊत** (दै. लोकसत्ता २७ मार्च २०११)

**किंमत : १५०रु. सभासदांना : सवलतीत पोस्टेज : २५रु.**

आगामी

# मेकिंग द कट




**डॉ. मोहम्मद खाद्रा**

अनु. **डॉ. देवदत्त केतकर**

**२००रु. पोस्टेज २५रु.**

डॉ. मोहम्मद खाद्रा हे एक नामांकित सर्जन.

सर्जन असण्याचा अर्थ असतो, मानवी यातनांच्या सागरात अविचल उभं राहणं. आपलं ज्ञान, कौशल्य आणि बुद्धिमत्ता पणाला लावून व्याधीशी झुंज देणं.

एक इंटर्न म्हणून त्यांनी जेव्हा पहिला छेद घेतला तेव्हा शिक्षकांनी त्याची खिल्ली उडवली.

एका वृद्धेच्या इच्छेविरुद्ध त्यांनी तिचा जीव वाचवला.

मेंदूच्या कर्करोगामुळे एका कुप्रसिद्ध सर्जनला वेड लागले.

ल्युकीमिया झालेल्या मुलाची आई अगतिक होऊन कोलमडून पडली.

अशा स्मृतिचित्रांमधून, डॉ. मोहम्मद खाद्रा यांनी सर्जन म्हणून आपले आयुष्य उलगडून दाखवले आहे. खडतर प्रशिक्षणापासून ते निद्रानाश करणाऱ्या अविरत कामापर्यंत... आपलं आयुष्य घडवणाऱ्या रुग्णांच्या स्मृती ते जागवतात. ऑपरेशन थिएटरमध्ये घडणाऱ्या धक्कादायक चुकांमुळे उद्ध्वस्त झालेल्या रुग्णांच्या कहाण्याही यात आहेत.

राजकारणामुळे आरोग्यसेवेची झालेली दैना आपल्याला इथे दिसते.

मृत्यू समोर दिसत असताना रुग्णांनी बाळगलेल्या वेड्या आशा दिसतात.

**आयुष्यात घडलेल्या असाधारण घटनांमुळे निर्माण होणारे नाट्य.**

# पुस्तक परिचय

## अभिजात मनोवृत्ती आणि विचारानुभव व्यक्त करणारी धगधगीत आत्मकथा

# विमुक्ती




**प्रा. दिपा महानवर**

नवीन क्रांतिकारक मूल्याच्या तेजाने झपाटून गेलेल्या प्राचार्य दीपा महानवार यांची विमुक्ती ही आत्मकथा ज्वलंत अंत:करणातील आंदोलने टिपत अस्सल गावरान प्रियजनांचा व परिसराचा हृद्य वेध घेते.

मेंढीपालन करणारा तो मेंढपाल. आता यांत्रिकीकरणामुळे विणकर, लोहार इ. बहुसंख्य समाजाचे परंपरागत धंदे बसले आहेत. ही मंडळी आता शेती अथवा अन्य नोकरीधंद्याकडे वळली आहे.

गरीब व निरीक्षर विश्वधेनू मेंढपाल गेनबा आणि माय मंजुळाई यांच्या पोटी पाच मुलगे व दोन मुलींच्या पाठीवर दीपा हे शेंडेफळ सातारा जिल्ह्यातील वाई तालुक्यातील दुर्गम,पण निसर्गरम्य लगडवाडी या लहान खेड्यात जन्मले. म्हणून ग्रामसंस्कृतीचे हुबेहूब चित्रण या आत्मकथनात येते..

आईवडिलांच्या निधनसमयी महानवर यांनी मुंडन केले नाही. स्वत: गंभीर आजारी पडल्यावरसुद्धा देवाचा धावा केला नाही. मेंढपाल व खेडूतांच्या अंधश्रद्धांच्या आहारी न जाता आयुष्यभर बुद्धिप्रामाण्यवाद जोपासला. याच मेंढपाल परंपरेतील साम्यवादी विचारवंत आमदार गणपत देशमुख, शेषराव नखाते आष्टुरकर इ. तेजाळत आहेत. महाराष्ट्र राज्य प्राध्यापक संघटनेचे नेतृत्व करणारे प्रा. दीपा महानवर भटक्यांना विमुक्ती देणाऱ्या कर्मवीर भाऊराव पाटलांना आपले गुरू मानतात. विचारानुभव व्यक्त करणाऱ्या या धगधगीत आत्मकथेत विश्वधेनू मेंढपालपुत्राच्या भौतिक व आत्मिक विकासाच्या खुणा आढळून येतात.

ही आत्मकथा तीन भागांत साकारली आहे. १. पेर, २. बहर, ३. कट्टर.

प्रत्येक भागाच्या प्रारंभी ज्यां पॉल सार्त्र, सॉक्रेटिस, देकार्त या विचारवंतांची वचने उद्‌धृत केली आहेत.

गावात मेंढपालाच्या घरी सगळी मंडळी खायची प्यायची, पण त्यांना 'यडपाट धनगारडं' म्हणून हिणवायची.

दीपाचं सर्व शिक्षण कर्मवीर भाऊराव पाटलांच्या रयत शिक्षण संस्थेत झालं. आजोळी लोणंदला रयत शिक्षण संस्थेच्या हायस्कूलमध्ये माध्यमिक शिक्षण घेत असतानाच हायस्कूलच्या विद्यार्थी वस्तुभांडाराचा सेल्समन म्हणून महिना पंधरा रुपयांवर काम केले. कर्मवीरांच्या वसतिगृहात राहिल्यामुळे त्याच्या मनातल्या अस्पृश्यतेच्या भिंती धडाधड कोसळल्या. जी. बी. मानेसर यांनी त्यांना साम्यवाद व पुरोगामी विचारसरणीचे धडे दिले. त्याच तत्त्वज्ञानास मानेसर यांनी आंबेडकरी तत्त्वज्ञानाचीही जोड दिली आणि महानवर यांना विज्ञाननिष्ठा शिकविली. ते त्यांना आयुष्यभर मार्गदर्शक ठरले. सातारलाही कर्मवीरांच्याच शिवाजी कॉलेजात 'कमवा व शिका' या योजनेमध्ये ते दाखल झाले. तेथेच अनेक अडचणींचा सामना करीत ते बी.ए. झाले. बडोद्याला जाऊन पदव्युत्तर एम.एस्सी (प्रथम श्रेणी) उत्तीर्ण झाले.

दीपा महानवर सातारच्याच कॉलेजात प्राध्यापक झाले. प्राध्यापक झाल्यावर ते लगडवाडीला विसरले नाहीत. श्रमदानाने गावचा रस्ता बांधून दिला. लगडवाडीला एस.टी. सुरू करून दिली. दुर्गमवाडीत वीज आणली. गावची शेतकरी सहकारी सोसायटी डबघाईला आली होती, प्रा. महानवर यांनी चेअरमन होऊन सदर सोसायटीला उर्जितावस्थेला नेले. धनगरवाडीत शाळा काढली. महाराष्ट्र राज्य प्राध्यापक महासंघाचे महासचिव पद चार वर्षे भूषविले. तसेच पुणे विद्यापीठाच्या कार्यकारिणीवरही त्यांची नियुक्ती झाली. पुढे ते प्राचार्य झाले. प्राचार्यांतूनही शिवाजी विद्यापीठाच्या सिनेटचे व व्यवस्थापन परिषदेचेही ते सदस्य झाले.

जीवनाच्या प्रथमार्धात आर्थिक शोषण झाले, पण आत्मिक पोषण झाले असे त्यांनी आपल्या आत्मनिवेदनात पृ. ९६ वर नमूद केले आहे. 'कामाला बहाद्दर, पण अंगठेबहाद्दर' आणि 'बाहेर पाऊसधारा, डोळ्यात अश्रूधारा' अशी काव्यात्मक भाषा आली आहे. विद्यार्थी असताना पाचशेएक बार साबणानं स्वत:चे कपडे धुवायचे आणि तोच साबण लावून आंघोळ करायचे. लगडवाडीत त्याकाळी कमालीची अस्पृश्यता होती. माने मास्तर मराठा होते म्हणून त्यांना वाडीत राहायला खोली मिळाली, पण सव्वाखंडे मास्तर दलित असल्याने त्यांना खोली मिळाली नाही. ते स्वत: शाळेत राहात व स्वयंपाक करीत. स्वत: खंडू रामुशीच्या घरी कुणी चहा प्यायचं नाही. हेळातून पाणी काढून कुणीतरी त्याला वरून पाणी वाढायचं, अशा प्रकारच्या जातिभेदाचे भेदक दर्शन घडविले आहे. प्रा. महानवरांच्या उदंड आशावादातच साम्यमन्वन्तराची पहाट उगवेल अशी आशा आहे.

पुस्तकात जागोजागी 'एकदा दादांनी मलाबी नेलं', झालावता, आठधा, सुक्काळीच्यानू अशी ग्रामीण भाषा वापरली आहे. प्रा. महानवर यांनी लग्नपत्रिकेत 'गणपती'ऐवजी कर्मवीर भाऊराव पाटलांचा फोटो छापला होता. 'श्री गजानन प्रसन्न' न छापता 'कर्मवीर कृपा' असं छापलं. त्यांच्या लग्नास श्रीमंत मालोजीराव नाईक निंबाळकर उपस्थित होते. त्यांच्या प्राथमिक शाळेत नोंदविलेलं संपूर्ण नाव धोंडिबा गेनू महारनवर. 'महाराचा नवरा' म्हणून पोरं हिणवायची म्हणून त्यांनी नामांतर केलं 'दीपा गेनबा महानवर' अशाप्रकारे व्यक्तिजीवनातील शल्यांचा शोध घेतला आहे.

महानवरांनी मेंढपाळांच्या अडाणी चालीरीती व अंधश्रद्धा नष्ट करण्यासाठी प्रयत्न केला. उदा. मेंढपाळ मातांनी कपाळावर आडवा मळवट भरावा अशी रूढी होती. ही प्रथा त्यांनी आपल्या घरातूनच नष्ट केली. आपल्या वृद्ध मंजुळाईला कपाळावर कुंकवाचा उभा टिकला लावण्यास सांगितले.

त्यांनी लिहिलेले 'रामा धनगरास अनावृत्त पत्र' 'साधना'मध्ये प्रसिद्ध झालं होतं. मेंढपालाच्या दलितसदृश हीन समाजस्थितीची जाणीव त्यांनी करून दिली होती. तरीही त्यांच्या प्रस्तुत आत्मकथेस दलित साहित्य म्हणता येणार नाही.

या पुस्तकास बुद्धिप्रामाण्यवादी डॉ. श्रीराम लागू यांची प्रस्तावना लाभली असून, त्यांनी विलक्षण विमुक्ती असलेली आत्मकथा असा गौरव केला आहे. प्रा. महानवर यांची तीव्र संवेदनशीलता पानोपानी दिसते. त्यांच्या अभिजात समाजानुवर्ती मनोवृत्तीचे दर्शन घडते. या पुस्तकात महानवर यांनी काही दलित साहित्यिक छापतात त्याप्रमाणे लोकहृदयाला अनुकूल असा सूर कुठेही लावला नाही हे विशेष आहे.

प्रस्तुत आत्मकथेत अनेक ठिकाणी 'धनगर' असा उल्लेख केला आहे. या जातिवाचक शब्दाऐवजी 'मेंढपाळ' असाच उल्लेख केला असता तर ते अधिक समर्पक ठरलं असतं. कारण हेच खरे 'विश्वधेनू मेंढपाळ' आहेत. तसेच आपली आई मंजुळा ही बाकदार राघू नाकाची गोरीपान होती असं म्हटलं आहे. आपल्या आईस तिच्या नावानं कुणी संबोधणार नाही. लेखकानं मंजुळा न म्हणता 'मंजुळाई' असं आदरार्थी म्हटलं असतं तर ते जास्त उजळलं असतं. लेखक महागड्या एस्टीम कारमध्ये बसलेले असले तरी दरिद्री लोकांचा संघर्ष, दु:ख व आर्तता विसरलेले नाहीत हाच त्यांच्या साम्यवादाचा विजय आहे. मानवतेचे क्रूर विडंबन थोपविण्यासाठी त्यांची लेखणी झिजत आहे हे गौरवास्पद आहे. विश्वधेनू मेंढपाळांच्या भीषण विटंबनेचा ते शोध घेत आहेत. हे सुचिन्ह आहे.

**राजा गायंगी** (दै. लोकसत्ता २० मार्च २०११)

**किंमत : २२०रु. सभासदांना : सवलतीत पोस्टेज : २५रु.**


**मेहता पब्लिशिंग हाऊस**

**गाजलेली आत्मकथने**

| **पुस्तकाचे नाव** | **लेखक** | **किंमत** |
|---|---|---|
| चाकाची खुर्ची | नसीमा हुरजूक | १८० |
| खाली जमीन वर आकाश | डॉ. सुनीलकुमार लवटे | १५० |
| जिहाद | हुसेन जमादार | २२० |
| भोगले जे दु:ख त्याला... | आशा आपराद | २२० |
| मी भरून पावले आहे | मेहरुन्निसा दलवाई | १६० |
| विमुक्ती | दिपा महानवर | २२० |
| मना सर्जना | डॉ. अनिल गांधी | २०० |
| पानगळीच्या आठवणी | शोभा चित्रे | २०० |
| आनंदाचं पासबुक | श्याम भुर्के | ३०० |

**पोस्टेज प्रत्येकी २५रु.** **मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे**

# पुरस्कार



*** एस. एल. भैरप्पा यांना 'सरस्वती सन्मान'**

प्रसिद्ध कन्नड साहित्यिक एस. एल. भैरप्पा यांना त्यांच्या 'मंद्र' या कादंबरीसाठी प्रतिष्ठेचा 'सरस्वती सन्मान' पुरस्कार जाहीर झाला आहे. के. के. बिर्ला फाउंडेशनच्या वतीने सर्वोत्कृष्ट साहित्यकृतीस हा पुरस्कार दिला जातो. रोख साडेसात लाख रुपये, मानपत्र आणि सन्मानपदक असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. माजी सरन्यायाधीश जी. बी. पटनाईक यांच्या अध्यक्षतेखालील समितीने भैरप्पा यांची विसाव्या पुरस्कारासाठी निवड केली. इसवी सन २००० ते २००९ या कालावधीतील साहित्यकृतींचा विचार केल्यानंतर समितीने भैरप्पा यांच्या पुस्तकांची निवड केल्याचे या संबंधीच्या निवेदनात म्हटले आहे. ७५ वर्षीय भैरप्पा यांच्या आजवर २२ कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या आहेत. 'भीमकाया' ही त्यांची पहिली कादंबरी १९५९ मध्ये प्रकाशित झाली होती. कन्नड भाषेतील 'बेस्टसेलर लेखक' म्हणून ख्यातकीर्त असलेल्या भैरप्पा यांच्या काही कादंबऱ्यांचे अन्य भाषांमध्ये अनुवाद झाले आहेत. 'पर्व' ही त्यांची सर्वाधिक लोकप्रिय साहित्यकृती मानली जाते.

*** विश्वास पाटील यांना 'मराठी भूषण पुरस्कार'**

कवी कुसुमाग्रज यांच्या स्मरणार्थ व जागतिक मराठी भाषा दिनानिमित्त शिवसेनेच्या वतीने 'मराठी भूषण पुरस्कार' इतिहासतज्ज्ञ निनाद बेडेकर यांच्या हस्ते कादंबरीकार विश्वास पाटील यांना प्रदान करण्यात आला.

पाटील म्हणाले, पानिपत कादंबरी ही देशाच्या एकात्मतेचे प्रतीक आहे. 'दिल्लीच्या रक्षणासाठी मराठ्यांचे लाखाहून अधिक सैन्य जाणे ही घटनाच न भूतो न भविष्यति अशी होती.'

बेडेकर म्हणाले की, आपणास वर्तमानाइतकेच इतिहासाचेही ज्ञान आवश्यक आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाम देशपांडे यांनी केले. याप्रसंगी आमदार चंद्रकांत मोकाटे, शहर प्रमुख नाना वाडेकर, शहर उपप्रमुख प्रशांत बधे, नगरसेवक अंकुश तिडके, डॉ. द. भि. कुलकर्णी, शं. ना. नवलगुंदकर, डॉ. सरोज भाटे, विश्वास मेहेंदळे, समीरण वाळवेकर, राजेंद्र शिंदे आदी उपस्थित होते.

‘मराठी भाषा काल, आज व उद्या’ या विषयावर परिसंवादाचे आयोजनही करण्यात आले.

*** प्रा. आशा आपराद यांना ‘डॉ. काशीबाई नवरंगे गौरव’पुरस्कार**

‘भोगले जे दु:ख त्याला’ या आत्मचरित्रातून व्यक्त झालेला आपला आत्मशोधाचा प्रवास अनेक स्त्रियांना आयुष्याशी झगडण्याची शक्ती देईल. अतिशय प्रतिकूल परिस्थितीत ज्ञानसाधना करून यशाचे शिखर गाठले. यातून स्त्री शक्तीचा एक आदर्श समाजापुढे उभा केला. आपल्या झुंजार वृत्तीचा सन्मान म्हणून आर्य महिला समाजातर्फे ‘डॉ. काशीबाई नवरंगे गौरव’पुरस्कार प्रदान करण्यात आला.



प्रा. आशा आपराद (डावीकडून) मानपत्र स्वीकारताना

*** लक्ष्मीवासुदेव भारतभूषण पुरस्कार**

आदित्य प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात येणारा ‘लक्ष्मी-वासुदेव भारतभूषण पुरस्कार’ लता मंगेशकर यांना देण्यात आला. ज्येष्ठ संगीतकार हृदयनाथ मंगेशकर, प्रवचनकार




तिसरी आवृत्ती

**आवरण**

**डॉ.एस्.एल्. भैरप्पा  अनु. उमा कुलकर्णी**

असत्याचं मूळ कुठलं? त्याला अंत नाहीच का? मानवी समूहाच्या आणि संपूर्ण राष्ट्राच्या पातळीवर उफाळून आलेल्या सत्य-असत्याच्या समस्येचा वेध घेणारी बहुचर्चित कादंबरी.

**२५०रु.  पोस्टेज २५रु.**

शंकर अभ्यंकर, प्रतिष्ठानच्या कार्यकारी विश्वस्त अपर्णा अभ्यंकर वगैरे यावेळी उपस्थित होते. सव्वालाख रुपये, सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह, महावस्त्र, व श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. पुरस्कारात मिळालेली सव्वालाख रुपयांची रक्कम लतादीदींनी प्रतिष्ठानच्या कार्यासाठी दिली. शंकर अभ्यंकर यांच्या 'गीतासागर' ग्रंथाच्या आठव्या सुधारित आवृत्तीचे प्रकाशन करण्यात आले.

मंगेशकर कुटुंबात जन्म मिळाला हा देवाने मला दिलेला सर्वांत मोठा पुरस्कार आहे, अशी भावना व्यक्त करून स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर म्हणाल्या की, आजचा सत्कार जीवनातील एक मोठा सत्कार आहे. इतके प्रेम मिळाल्याने व कौतुक झाल्याने मला भरून आले आहे. मी फार मोठे काम केले आहे असे नाही. मी केवळ चित्रपटांसाठी पार्श्वगायन केले आहे. संगीतकार देतात ती गीते. संगीतकाराने दिलेल्या प्रत्येक गाण्याला न्याय देण्याचे काम. ज्यांनी गाण्यांच्या चाली रचल्या ते मोठे लोक आहेत. मी संगीतकारांना सर्वाधिक महत्त्व देते. आणि माझ्याकडून चांगली गीते गाऊन घेतल्याबद्दल त्यांना धन्यवादही देते. बाबांनी मला थोडे शिकविले. पण त्यांच्याकडून जे शिकले ते नेहमीच उपयोगी पडले. त्यानुसारच गात गेले.

अभ्यंकर म्हणाले की, लतादीदींच्या कंठातून विश्वरूपी स्वर निघतो. गाण्याच्या सर्व प्रकारांना त्यांनी स्पर्श केला आहे. अभिजात संगीत न गाताही त्यांनी 'लता मंगेशकर' नावाचे स्वतंत्र घराणे निर्माण केले. असा ईश्वरदत्त स्वर युगानुयुगानंतरच जन्माला येतो.

*** आशा भोसले यांचा 'हाऊस ऑफ कॉमन्स'मध्ये गौरव**

गेल्या साठ वर्षांहून अधिक काळ देशविदेशातील संगीत रसिकांवर आपल्या स्वरांची मोहिनी घालणाऱ्या ज्येष्ठ पार्श्वगायिका आशा भोसले यांना त्यांच्या संगीत क्षेत्रातील विशेष योगदानाबद्दल इंग्लंडच्या हाऊस ऑफ कॉमन्स सभागृहात गौरविण्यात आले. पद्मविभूषण आशा भोसले या भारतीयांचे आदरस्थान असल्याचे हा विशेष गौरव सोहळा आयोजित करणारे मजूर पक्षाचे अनिवासी संसद सदस्य कीथ वाझ यांनी सांगितले.

लंडनचा रॉयल फेस्टिवल हॉल, बर्मिंगहॅमचा सिंफनी हॉल आणि लिसेस्टरचा डे मॉंटफोर्ट हॉल या ठिकाणी आशा भोसले यांनी कार्यक्रम सादर केले. या सर्व कार्यक्रमांना हाऊसफुल्ल प्रतिसाद मिळाला.

''इंग्लंडच्या पार्लमेंटमध्ये आपला सत्कार होईल, असे मला स्वप्नातही वाटले नव्हते. या गौरवाने मी अतिशय भारावून गेले आहे,'' असे भावोत्कट उद्गार आशाताईंनी काढले.

भारतीय कलाकारांचे इंग्लंडमध्ये कार्यक्रम घडवून आणण्यासाठी वाझ यांनी केलेल्या प्रयत्नांचे कौतुक करून 'वाझ' यांच्याप्रमाणेच मीही मूळची गोव्याची आहे,

असे त्या म्हणाल्या. अनिवासी उद्योगपती रामी रेंजर यांनी आशाताईंचा सत्कार ही लंडनवासीयांसाठी एक ऐतिहासिक घटना असल्याचे सांगितले.

१९४० पासून आशाताईंनी विविध भाषांमधील एक हजारांवर चित्रपटांसाठी गाणी गायली आहेत. वर्ल्ड रेकॉर्ड्स ॲकॅडमी या संस्थेने 'सर्वाधिक गाणी गाणारी गायिका' म्हणून २००९ मध्ये त्यांचा गौरव केला होता. प्रतिष्ठेचा दादासाहेब फाळके पुरस्कारही त्यांना मिळाला आहे.

## * डॉ. ह. वि. सरदेसाई यांना 'पुण्यभूषण' पुरस्कार

पुण्यभूषण फाउंडेशनतर्फे दिला जाणारा 'पुण्यभूषण पुरस्कार' या वर्षी पुण्याचे ज्येष्ठ वैद्यकीय तज्ज्ञ डॉ. ह. वि. सरदेसाई यांना जाहीर झाला आहे.

स्मृतिचिन्ह व एक लाख रुपये रोख असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये होणाऱ्या खास समारंभात हा पुरस्कार प्रदान करण्यात येईल.

तसेच या वेळी शांताबाई रायसोनी, शंकरराव जगदाळे, प्रभाकर गावडे, मुरलीधर कर्णिक, दिनकर मोकाशी या स्वातंत्र्यसैनिकांनाही गौरविण्यात येणार आहे, असे फाउंडेशनचे विश्वस्त डॉ. सतीश देसाई यांनी सांगितले.

डॉ. सरदेसाई वैद्यकीय सल्ला देण्याचा व्यवसाय गेली ५२ वर्षे करत आहेत. मुंबई विद्यापीठातून १९५० मध्ये इंटर सायन्सची परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाल्यानंतर त्यांनी सेठ जी. एस. वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश घेतला. मनोरमा हजरत पुरस्कार, सीनियर शिरवाळकर शिष्यवृत्ती, रतन शॉ सुवर्णपदक त्यांनी मिळविले.

अनेक विषयात विशेष प्रावीण्य व डीसा सुवर्णपदक मिळवून १९५५ साली त्यांनी एम.बी.बी.एस. पदवी मिळवली. त्यानंतर १९५८ साली एम.डी, १९६० साली एम.आर.सी.पी., नंतर एफआयसीए, एफआयआयडी अशा अनेक पदव्या त्यांनी मिळविल्या. महाराष्ट्र ॲकेडमी ऑफ सायन्सचे सदस्य (फेलो) म्हणूनही त्यांना सन्मानित करण्यात आले.

डॉ. सरदेसाई यांनी काही वर्षे बी.जे. वैद्यकीय महाविद्यालयात अध्यापन केले आणि 'उत्कृष्ट शिक्षक' म्हणून नाव कमाविले. १९५९ ते १९८५ दरम्यान त्यांनी ससून रुग्णालयात मानद वैद्यकीय तज्ज्ञ म्हणून काम केले. १९७१ मध्ये त्यांनी ससूनमध्ये न्यूरॉलॉजी विभाग स्थापन केला. शहरात वैद्यकीय सेवा करत असताना तळेगाव जनरल हॉस्पिटल, के.ई.एम. हॉस्पिटल, रत्ना हॉस्पिटल इत्यादी ठिकाणी तज्ज्ञ सल्लागार म्हणूनही काम केले आहे.

## * सुधीर गाडगीळ - नाबाद ६०

'झलक पुणे' संस्थेच्या त्रिदशकपूर्तीनिमित्त गोखले यांच्या हस्ते सुधीर गाडगीळ

यांचा षष्ट्यब्दीनिमित्त सत्कार करण्यात आला. ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. प्र. ल. गावडे अध्यक्षस्थानी होते. या प्रसंगी संस्थेचे अविनाश वैजापूरकर, लीनता वैजापूरकर आणि उपेंद्र खरे उपस्थित होते.

गोखले म्हणाले, ''पुण्यातील हा माझा मित्र इतका प्रसिद्ध निवेदक आहे, याचा मला अभिमान वाटतो. भरपूर अभ्यास,उत्तम भाषा, स्पष्ट शब्दोच्चार, व्याकरणाचे भान, स्वत:च्या आवाजाची ओळख, 'माईक' आणि संवादाचे ज्ञान या गुणांमुळे सुधीर उत्तम निवेदक ठरला. गाडगीळ जसे एखाद्याला बोलते करतात, तसेच ते बोलतीदेखील बंद करतात. त्यामागे त्यांचा दुष्ट हेतू अजिबात नसतो. तर, थेट बोलणाऱ्याकडून वदवून घेण्याचा प्रयत्न असतो.''

गाडगीळ म्हणाले, ''महाविद्यालयीन आणि पत्रकारितेच्या काळात वाद्यवृंदाच्या कार्यक्रमांना मी आवर्जून जात असे. 'चैत्रबन'च्या निमित्ताने निवेदनाची संधी मिळाली रसिकांचे प्रेम लाभले. शब्द निवडीची सहजता, संवादातील अनौपचारिकता, विचारांची स्पष्टता आणि प्रसंगी उत्स्फूर्तता यांचे भान ठेवले तर रसिकांशी सहज नाते जोडता येते.''

## * दिवाळी अंक पुरस्कार

महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे 'दिवाळी अंक स्पर्धा २०१०'चा पारितोषिक वितरण समारंभ डॉ. न. म. जोशी यांच्या हस्ते पार पडला. 'अनुभव' या दिवाळी अंकाला रत्नाकर पारितोषिक, 'मैत्र' अंकाला रावसाहेब मोरमकर पारितोषिक, 'अक्षरप्रतिष्ठा' अंकाला का.र. मित्र पारितोषिक, 'ऋतुरंग' अंकाला शं. वा. किर्लोस्कर पारितोषिक, ॲम्बुलन्स राइडला उत्कृष्ट कथेचे दि. अ. सोनटक्के पारितोषिक, सुगरणीची पिल्ले या लेखाला अनंत काणेकर पारितोषिक, 'आम्ही हुशार मुले' या अंकाला बालविभागासाठी विशेष पारितोषिक, 'कोकण दिनांक' अंकासाठी विशेष उल्लेखनीय पारितोषिक प्रदान करण्यात आले.

दिवाळी अंक म्हणजे महाराष्ट्राचा सांस्कृतिक शब्दोत्सव असून तो गेली अनेक वर्षे सुरू आहे. दिवाळी अंकांमधून वैचारिकता क्षीण झाली असून सध्याच्या साहित्यातून संवेदनशीलता आणि विश्वासार्हता ही मूल्ये हद्दपार होत आहे, असे जोशी म्हणाले.

दिवाळी अंकाचे परीक्षण आशा साठे, विनया खडपेकर यांनी केले.

## * पत्रकार दिनू रणदिवे यांना लोकमान्य टिळक पुरस्कार

मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील निवड समितीने लोकमान्य टिळक जीवनगौरव पत्रकारिता पुरस्कारासाठी ज्येष्ठ पत्रकार दिनू रणदिवे यांची निवड केली आहे. एक लाख रुपये रोख आणि मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. यापूर्वी हा पुरस्कार ज्येष्ठ पत्रकार नीळकंठ खाडिलकर, गोविंद तळवलकर आणि कुमार

केतकर यांना प्रदान करण्यात आला आहे. दिनू रणदिवे यांचा १९४२ च्या स्वातंत्र्यलढ्यात सक्रिय सहभाग होता. गोवा मुक्ती संग्रामातही ते अग्रेसर होते. झुंजार तत्त्वनिष्ठ पत्रकारिता करणाऱ्या रणदिवे यांनी संयुक्त महाराष्ट्र आंदोलनात 'संयुक्त महाराष्ट्र पत्रिका' सुरू करून या आंदोलनाला वेगळीच धार आणली होती.

'लोकसत्ता'चे अनिकेत साठे आणि सुहास सरदेशमुख विभागीय पुरस्काराचे मानकरी ठरले. मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, उपमुख्यमंत्री अजित पवार यावेळी उपस्थित होते.

*** निसर्गमित्र पुरस्कार**

''सन १९८० मध्ये ७२ विषारी सापांबरोबर काचेच्या घरात ७२ तास राहिलो. जाताना माणसांचा प्रतिनिधी म्हणून त्या काचेच्या घरात गेलो, मात्र काही वेळातच आम्ही ७३ झालो होतो. तेव्हाच सापांना वचन दिले की, आता यापुढे मी तुमचा प्रतिनिधी म्हणूनच माणसांत राहीन.'' कात्रज सर्पोद्यानाचे संचालक व ज्येष्ठ सर्पमित्र नीलमकुमार खैरे यांनी असे थरारक अनुभव सांगून अंतरंग उघड केले.

ॲडव्हेंचर फाऊंडेशनच्या वतीने खैरे यांना सामाजिक वनीकरण विभागाचे सहसंचालक विलास बर्डेकर यांच्या हस्ते 'मारुती चितमपल्ली निसर्गमित्र पुरस्कारा'ने गौरविण्यात आले. फाऊंडेशनचे अध्यक्ष विवेक देशपांडे व सदस्य अनिल गोहाड त्या वेळी उपस्थित होते. पुरस्कार सोहळ्यानंतर सुनील माळी यांनी त्यांची मुलाखत घेतली. वयाच्या १८व्या वर्षापासून जोपासलेले निसर्गाचे वेड, सापांच्या प्रेमामुळे वडिलांनी घरातून बाहेर काढल्याचा कटू प्रसंग, सर्पदंशानंतर एक हात गमवावा लागल्याची दुर्दैवी घटना, सापांच्या संवर्धनासाठी वाहिलेले आयुष्य अन् आता कामाचे काहीतरी सार्थक झाल्याचा आनंद... अशा पद्धतीने खैरे यांचा जीवनप्रवास मुलाखतीच्या माध्यमातून आला.

सुरुवातीच्या घटनांबाबत ते म्हणाले की, नोकरीच्या निमित्ताने माथेरानला असताना निसर्गाशी ओळख झाली. जंगलात फिरणे, साप पाहणे, त्यांचा संग्रह करणे, ग्रामस्थांकडून माहिती घेऊन डायरीत नोंद करणे याद्वारे हे जीवन वेगळेच



पाचवी आवृत्ती
**चला! उठा! कामाला लागा!**
**स्वाती-शैलेश लोढा अनु. अंजनी नरवणे**
स्वत:ला टप्याटप्याने ओळखत, स्वत:तले दोष बाजूला करत, गुणांना उजळवत यश कसे मिळवायचे याचे प्रात्यक्षिकांसह सहज सोपे मार्गदर्शन
**१४०रु. पोस्टेज २५रु.**

असल्याची जाणीव झाली. साप पकडण्याचे हे प्रकरण वडिलांपर्यंत गेल्यानंतर त्यांनी विरोध केला. त्यातून घर सोडावे लागले. पुन्हा निसर्गात गेलो. माथेरानच्या जंगलाने खूप शिकविले. तेथील दगड, झाड, प्राणी माझे गुरू झाले.

सर्पदंशानंतर डावा हात काढावा लागला. त्या घटनेबाबत ते म्हणाले की, सर्पमित्राला साप चावणे स्वाभाविक आहे, हात जाण्यामागे साप कारणीभूत नाही, तर त्या वेळी उपचारात झालेली दिरंगाई त्यास कारणीभूत आहे. हात काढला तेव्हा नंदिताबरोबर साखरपुडा झाला होता. 'आपण येथे आपला निर्णय थांबवू शकतो,' असे मी म्हणालो होतो. पण, मी तुझा डावा हात होईल, असे उत्तर तिने दिले. हात गेल्यानंतरच्या प्रसंगातून मी पुन्हा उभारी घेईन की नाही, याबाबत शंका होती. पण, पुढे तेच काम करण्याचे ठरविले. अनेक प्राण्यांना वाचविले. प्राणिसंग्रहालय व अनाथालय हे माझे मंदिर आहे. आम्ही कार्यकर्त्यांनी केलेल्या चळवळीतून पुण्यात सर्पपूजा बंद झाली. नागपंचमीला सर्पाच्या प्रतिमांची पूजा सुरू केली. त्यासाठी निसर्गाकडे पाहण्याचा चष्मा आपण बदलला पाहिजे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

पुरस्कार सोहळ्यात खैरे म्हणाले, पुरस्कार कधीच एकट्याचा नसतो. हा पुरस्कार संस्थेचा आहे.

डॉ. बर्डेकर म्हणाले की, खैरे यांनी सापाबद्दल लोकांची मानसिकता बदलण्यासाठी मोलाचे काम केले आहे.

खैरे यांच्या 'साप' या पुस्तकाच्या चवथ्या सुधारित आवृत्तीचे प्रकाशनही या वेळी करण्यात आले.

### * डॉ. यू. म. पठाण यांना स्वरूपानंद पुरस्कार

डॉ. यू. म. पठाण यांना पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रघुनाथ शेवगावकर यांच्या हस्ते 'स्वामी स्वरूपानंद पुरस्कार' प्रदान करण्यात आला. संत नामदेव अध्यासन, संत अध्ययन व संशोधन केंद्राने हा कार्यक्रम आयोजित केला होता. पठाण म्हणाले, ''लोक मला विचारतात की मंदिर, चर्च, गुरुद्वारा, मशिदीत गेल्यावर तुम्हाला काय वाटते? तेव्हा मी म्हणतो की सगळीकडे मला मन:शांती मिळते. प्रत्येकाचा देवावर विश्वास असायला हवा. श्रद्धा असायला हवी.'' या वेळी तेजस्विनी भक्ती मंडळाने भक्ती संगीत सादर केले. डॉ. लीला गोविलकर, प्रा. डॉ. शांताराम बुट्टे उपस्थित होते. डॉ. वीणा मनचंदा यांनी प्रास्ताविक केले. डॉ. अमृता मराठे यांनी सूत्रसंचालन केले.

### * चाळेगत कादंबरीला 'बाबूराव बागूल पुरस्कार'

बोरिवलीच्या 'शब्द द बुक गॅलरी'तर्फे लेखक प्रवीण बांदेकर यांच्या 'चाळेगत'

या कादंबरीला दिवंगत साहित्यिक बाबुराव बागुल पुरस्कार लेखिका शांता गोखले यांच्या हस्ते देण्यात आला. दहा हजार रुपये रोख आणि सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे. अध्यक्षस्थानी कवी नामदेव ढसाळ होते.

*** 'पांगिरा' सर्वोत्कृष्ट सामाजिक चित्रपट**

विश्वास पाटील यांच्या 'पांगिरा' या कादंबरीवर आधारलेल्या चित्रपटाने दहा पुरस्कार मिळवले आहेत.

सामाजिक विषयावरील सर्वोत्तम चित्रपटाचा पुरस्कार 'पांगिरा' या चित्रपटाला जाहीर झाला असून तिसऱ्या नाशिक आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवासाठीही त्याची निवड झाली. पांगिराचा विषय वैश्विक असल्याने 'पांगिरा' तेलगू भाषेतही डब केला गेला. संजय कृष्णाजी पाटील प्रस्तुत 'पांगिरा'चे दिग्दर्शन राजीव पाटील यांचे आहे. सामाजिक विषय अत्यंत संवेदनशीलपणाने हाताळणारा दिग्दर्शक अशी राजीव पाटील यांची ख्याती झाली आहे.

या चित्रपटात शेतकऱ्यांच्या उत्पादनाच्या हमी भावाचा प्रश्न हाताळला गेला आहे. पटकथा, संवाद आणि गीतरचना संजय कृष्णाजी पाटील यांची आहे. 'जोगवा' या चित्रपटाच्या निर्मितीनंतर 'पांगिरा'मध्ये त्यातील सर्व कलाकार पुन्हा एकत्र आले आहेत. आयड्रीम प्रॉडक्शनची निर्मिती असलेल्या 'पांगिरा'तल्या प्रमुख भूमिकांमध्ये प्रमोद पवार, किशोर कदम, मिता सावरकर, नारायण जाधव, संतोष जुवेकर, शशांक शेंडे, गिरीश साळवी, प्रशांत पाटील, चिन्मय मांडलेकर, नंदिनी जोग, स्मिता तांबे, हेमांगी कवी, शर्वणी पिल्ले, विजय साळवे, धनंजय मांद्रेकर, विनायक करंजीकर, मधुगंधा कुलकर्णी, प्रदीप कोथमिरे, दीपक पवार, अरुण गीते आदी छत्तीस कलाकारांसोबतच उपेंद्र लिमये आणि सई ताम्हणकर यांच्या विशेष भूमिका आहेत.

'पांगिरा'चे निर्माते श्रीपाल मोराखिया असून सिनेमॅटोग्राफर अमलेंद्रू चौधरी आहेत. संकलक राजेश राव हे असून, विपणन सल्लागार अनिल पाटील आहेत. आपला देश शेतीप्रधान आहे असे आपण म्हणत असलो तरी किफायतशीर शेतीची संकल्पना आणि शेतकऱ्याला मिळणारा हमीभाव यातल्या तफावतीचा विचार कुणी करत नाही, हे वास्तव 'पांगिरा'त दिसते. यात केवळ शेतकऱ्यांचा प्रश्न आहे असे नाही, सगळ्याच शेतकऱ्यांनी एकच पीक घेतले तर काय होईल, पीक तयार झाल्यावर त्याच्या विक्रीचे काय वगैरे प्रश्न हाताळले गेले आहेत. बदलत्या गावपंढरीची कहाणी म्हणून 'पांगिरा' अजोड आहे.

*** ग्रंथालय पुरस्कार**

सिल्लोडच्या लीलादेवी सीताराम अग्रवाल यांच्या नावे 'क' व 'ड' वाचनालयासाठी

दिला जाणारा उत्कृष्ट ग्रंथालय पुरस्कार माळगाव ता. सावंतवाडी जि. सिंधुदुर्ग येथील कै. प्रा. उदय रमाकांत खानोलकर वाचन मंदिर यास जाहीर झाला आहे.

ग्रंथालय क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तीस 'उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता' पुरस्कार देण्यात येतो.

यावर्षी या पुरस्कारासाठी घाटनांदूर ता. अंबाजोगाई येथील ग्रंथपाल नरहरी दादा मंठेकर यांची निवड करण्यात आली आहे. या दोन्ही पुरस्कारांचे स्वरूप पाच हजार रुपये व स्मृतिचिन्ह असे आहे.

*** दुर्गसाहित्य पुरस्कार पाळंदे यांना प्रदान**

'निसर्ग, सुंदर डोंगरमाथ्यांचे काय होणार या प्रश्नाचे उत्तर एका शब्दात द्यायचे झाले तर, ते 'नष्ट' या शब्दाने सांगावे लागते आहे. घाटमाथ्यावरील लोकांना शहरांचे तर, शहरवासीयांना घाटमाथ्याजवळील जमिनीचे वेध लागल्यामुळे निसर्गसौंदर्य लुप्त होण्याच्या मार्गावर आहे. जंगले नष्ट होऊन सिमेंटच्या जंगलांना सुकाळ आल्याने बिबटे शहरवासीयांच्या दारांपर्यंत येऊन ठेपत आहेत. हे चित्र बदलण्यासाठी जंगले वाचवली पाहिजेत,' असे मत दुर्गप्रेमी लेखक आनंद पाळंदे यांनी व्यक्त केले.

'गोनीदां' दुर्गप्रेमी मंडळाच्या वतीने पाळंदे यांना 'दुर्गसाहित्य' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. प्रा. डॉ. ब्रह्मानंद देशपांडे, प्रा. विजय देव, रवींद्र अभ्यंकर, आनंद देशपांडे, सौरभ देशपांडे, अशोक कीर्तने उपस्थित होते.

'निसर्गाचे व शेकडो वर्षे जपलेल्या दुर्गांचे काय होणार हे प्रश्न चिन्ह कायम असल्याने, दुर्गप्रेमी व सामान्य जनतेने प्रयत्नशील राहिले पाहिजे. केवळ निसर्गसौंदर्याचे जतन करून न थांबता दुर्गप्रेमींना प्रोत्साहन दिले पाहिजे. दुर्ग विषयाच्या लेखनाला व अभ्यासाला गती दिली पाहिजे,' असे पाळंदे म्हणाले.

कार्यक्रमात 'अमात्यांचे आज्ञापत्र', 'भारताचे संविधान', 'शिवतीर्थ रायगड' या पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. तसेच शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांनी लिहिलेल्या 'शिवशाहिरांचे शिवप्रेमींना पत्र' या पत्राचे वाचन आनंद देशपांडे यांनी केले.

*** श्रीनिवास जोशी स्मृती पुरस्कार**

सुप्रसिद्ध लेखक स्वर्गीय श्रीनिवास जोशी यांनी हिंदी आणि मराठी साहित्य क्षेत्रामध्ये भरीव काम केले तसेच क्रांतीसाठी ते अनेक वर्षे भूमिगतही होते. ते स्वातंत्र्यलढ्यासाठी तुरुंगात गेले नाहीत, केवळ याच कारणासाठी मध्य प्रदेश सरकारने त्यांना स्वातंत्र्यसेनानी म्हणून मान्यता दिली नाही ही गोष्ट दुर्दैवी आहे, असे मत प्रसिद्ध अभिनेत्री बेबी शकुंतला यांनी व्यक्त केले.

श्रीनिवास जोशी यांच्या स्मरणार्थ दिला जाणारा पुरस्कार डॉ. पद्मजा घोरपडे

यांना प्रदान करण्यात आला.

जोशी यांच्या 'तुम युग युग की पहचानी सी...' या कथासंग्रहाचे प्रकाशन बेबी शकुंतला यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी डॉ. दामोदर खडसे, अशोक कामत, सु. मो. शाह, मध्यभारत हिंदी साहित्य समिती इंदूरचे सूर्यकांत नागर, वंदना श्रीनिवास जोशी आदी उपस्थित होते.

खडसे म्हणाले, ''जोशी यांनी समाजातील विविध अंगांचे दर्शन आपल्या कथांमध्ये घडवले आहे. या कथा चाळीस-पन्नास वर्षांपूर्वी लिहिल्या गेल्या असल्या तरी आजही तितक्याच जिवंत आणि आत्ताच्या काळातील वाटतात. कथा सांगताना त्यातील दृश्य वाचकांसमोर उभे करणे यात लेखकाची खरी परीक्षा असते. त्यावर जोशी पूर्णपणे खरे उतरले आहेत. त्यांची शैली व्यंगपूर्ण आणि रोचक आहे. हसत-खेळत त्यांनी जीवनाचे दर्शन घडविण्याचा प्रयत्न केला आहे. महत्त्वाचे म्हणजे त्यांनी आपल्या कथांमधून कोणताही बोध देण्याचा प्रयत्न केलेला नाही. यामुळेच या कथा रंजक झाल्या आहेत.''

घोरपडे म्हणाल्या, ''माझ्या उमेदीच्या काळात दिशा देण्याचे काम जोशी यांनी केले ही गोष्ट अभिमानास्पद आणि प्रेरणादायी आहे.''

प्रतिभा शाहू मोडक यांनी सूत्रसंचालन केले.

### * डॉ. अवचट यांना पावन पुरस्कार

पावन प्रतिष्ठानतर्फे महापौर मोहनसिंग राजपाल यांच्या हस्ते प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते आणि लेखक डॉ. अनिल अवचट यांना पावन पुरस्कार प्रदान करण्यात आला.

पुणेरी पगडी, उपरणे, शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप होते. नगरसेवक अनिल शिरोळे यांच्या हस्ते पक्षिअभ्यासक डॉ. सत्यशील नाईक आणि अग्निशामक दलाचे राष्ट्रपती पदकविजेते अधिकारी प्रशांत रणपिसे यांचा सत्कार करण्यात आला.

### * व. पु. काळे साहित्य पुरस्कार

व. पुं.च्या साहित्याचा महाराष्ट्रभर प्रचार आणि प्रसार करणारे साहित्यिक आर. के. लोंढे यांना जंजिरे प्रतिष्ठानचे संस्थापक चंद्रकांत जंजिरे व शिक्षणमंडळाचे माजी उपाध्यक्ष रवींद्र माळवदकर यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह व व. पु. काळे लिखित ग्रंथ भेट देऊन सन्मानित करण्यात आले.

याप्रसंगी माळवदकर म्हणाले, आर. के. लोंढेंचा वाढदिवस व व. पुं.चा जयंतीदिवस हा योगायोगच म्हणावा लागेल. दोघांनाही माणसे जोडण्याचा व संवाद साधण्याचा छंद आहे. आर. के.सारख्या प्रामाणिकपणे धडपडणाऱ्या साहित्यिकाला

व. पुं.च्या नावाने पुरस्कार मिळणे म्हणजे व. पुं.ची खरी जयंती साजरी होणे होय.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी के. एल. मापारे होते.

## * पारनेरकर पुरस्कार

ब्रह्मतत्त्वाचा शोध घेत आपण अवघा संसार पिंजून काढत असतो, पण ब्रह्म तर आपल्या अंतर्मनातच दडलेले आहे. या ब्रह्माशी एकरूप होण्यासाठी अभंगासारखे दुसरे साधन नाही, असे मत ज्येष्ठ गायक अनुप जलोटा यांनी व्यक्त केले.

जीवन कला मंडळातर्फे पारनेरकर स्मृती अभिनव अभंग गानभूषण पुरस्कार ॲड. विष्णू महाराज पारनेरकर यांच्या हस्ते जलोटा यांना प्रदान करण्यात आला.

डॉ. घनश्याम बोरकर यांना 'श्रीमंत सरदार आबासाहेब मुजुमदार रसिकराज पुरस्कार' व 'भेंडीबझार' घराण्याच्या ज्येष्ठ गायिका डॉ. सुहासिनी कोरटकर यांना ज्येष्ठ समीक्षक श्री. के. क्षीरसागर स्मृती संगीत मर्मज्ञ पुरस्कार देण्यात आला.

जलोटा म्हणाले की, प्रसिद्धी आणि गुणवत्ता यापैकी नेहमी गुणवत्तेलाच मी श्रेष्ठ समजत आलो. ख्याती गुणवत्तेच्या मागोमाग आपणहून येते. आजही रोज नवीन काहीतरी शिकायचे आहे ही भावनाच मला ऊर्जा देते.

डॉ. कोरटकर यांनी सांगितले की, कोणत्याही गोष्टीचे ज्ञान मिळविण्यासाठी त्याचे मर्म जाणावे लागते. पण संगीत हे अंतरिक्षासारखे आहे. त्यातले नुसते मर्म कळून संगीत पुरते कळत नाही. त्यासाठी गुरुजनांचे आशीर्वादच कामी येतात. संगीताशी अध्यात्म जोडले गेल्यास नादयोग बनतो आणि अध्यात्माशी संगीत जोडले गेल्यास ते आनंदयोगाचा अनुभव देते.

डॉ. बोरकर म्हणाले की, रसिकपणा हा मनाचा निर्गुण गुण आहे, पण मूळ पिंडात रसिकतेचे बीज असावे लागते. जेव्हा मनातून विषयलोलुपतेचा पूर्णपणे निरास होतो, तेव्हा रसिकाचा 'रसिकराज' होतो. रसिक ते रसिकराज हा आध्यात्मिक प्रवास पूर्ण करण्याचे माझे प्रामाणिक प्रयत्न सुरू आहेत.

## * साहित्य साधना पुरस्कार

काळानुरूप युद्धाचे तंत्र बदलत आहे. काठ्या, भाले, तलवारी, धनुष्यबाण जाऊन त्यांची जागा आता अणुबॉम्ब, रासायनिक, जैविक अस्त्रांनी घेतली आहे. या अस्त्रांचा युद्धात केला जाणारा वापर घृणास्पद आहे. मानवाने विज्ञान, तंत्रज्ञानात केलेली अफाट प्रगती ही युद्धाचे तंत्र बदलण्यास कारणीभूत ठरली असून जगाचा नाश माणूस ओढवून घेऊ शकतो. या क्षेत्रातील प्रगती भीतिदायक आणि काळजी वाटावी अशी आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक अरुण साधू यांनी 'साहित्य साधना पुरस्कार' वितरण सोहळ्यात केले.

महाराष्ट्र सेवा संघ आणि मुलुंड येथील न. चिं. केळकर ग्रंथालय यांच्या वतीने

'लोकसत्ता'चे कार्यकारी संपादक गिरीश कुबेर यांच्या 'युद्ध जीवांचे' या पुस्तकास हा पुरस्कार ज्येष्ठ साहित्यिक अरुण साधू यांच्या हस्ते देण्यात आला. माणसाने विज्ञान क्षेत्रात धुमाकूळ घातला आहे. सध्या विकसित होत असलेल्या बायोचिप्सच्या तंत्रज्ञानामुळे उद्या माणसाच्या मनातील विचारही ओळखता येणार आहेत. या चिप्स मेंदूत बसवता येतील. असे तंत्रज्ञान जर युद्धासाठीच वापरले जाणर असेल तर ते धोकादायक आहे. त्यामुळे आपल्या मुलाबाळांचे काय होणार, अशी भीती साधू यांनी व्यक्त केली.

कुबेर यांच्याविषयी बोलताना ते म्हणाले, एका चांगल्या इंग्रजी वृत्तपत्रात काम करून ते आज 'लोकसत्ता'सारख्या अग्रगण्य दैनिकात आले आहेत. इंग्रजी वृत्तपत्रात विषयांची मांडणी करताना अभ्यासाची गरज असते. याच अभ्यासातून कुबेर यांचे जगातील युद्धनीतीच्या अर्थकारणावरील 'युद्ध जीवांचे' हे पुस्तक जन्माला आले आहे. यासारखी पुस्तके मराठी साहित्यात मोठ्या प्रमाणात यायला हवीत.

जागतिक पातळीवर घडणाऱ्या प्रत्येक घटनेचे परिणाम तुमच्या-आमच्या आयुष्यावर होत असतात. त्यामुळे त्याकडे सजगपणे पाहण्याची गरज कुबेर यांनी व्यक्त केली. पेट्रोल, डिझेल, गॅस यांच्याशी आपला दररोज संबंध येतो. तेल उत्पादन क्षेत्रात बोटावर मोजण्याइतक्या कंपन्या असून त्यांचा नफा प्रचंड आहे. त्यांची ही आर्थिक ताकद तुमच्या-आमच्या जगण्याला आकार देत असते. उत्पादन कमी आहे म्हणून किंमत वाढली, हा नियम तेलविषयक दरवाढीला लागू होत नाही. आखाती देशातील तेलसाठे, तेथील युद्ध, भारतातील बर्ड फ्लू या सर्व घटनांचा संबंध जागतिक अर्थकारणाशी आहे. अमेरिकेला हवे असलेले तेल मिळविण्यासाठी आखाती देशात वारंवार युद्धजन्य परिस्थिती निर्माण केली जात आहे. त्यामागेही जागतिक अर्थकारणच आहे, असे सांगून कुबेर म्हणाले, 'हे पुस्तक वाचून तुम्ही शांत झोपलात तर माझ्या लिखाणात काही कमतरता राहिली आहे असे मला वाटेल.'

### * 'निरर्थकाचे पक्षी'ला कोठावळे पारितोषिक

केशवराव कोठावळे पारितोषिक समितीने यंदाच्या पारितोषिकासाठी सुप्रसिद्ध कवयित्री नीरजा यांच्या निरर्थकाचे पक्षी या काव्यसंग्रहाची निवड केली आहे.

हे पारितोषिक १५१५१ रुपये व मानचिन्ह या स्वरूपाचे असून ५ मे २०११ रोजी केशवराव कोठावळे यांच्या स्मृतिदिनी ज्येष्ठ समीक्षक प्रा. पुष्पा भावे यांच्या हस्ते मुंबई मराठी साहित्य संघ, पुरंदरे सभागृह येथे दिला जाईल असे पुरस्कार समितीचे निमंत्रक श्री. अशोक कोठावळे यांनी सांगितले. यावेळी डॉ. वसंत पाटणकर प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहतील.

निरर्थकाचे पक्षी या संग्रहातील कविता समकालीन गुंतागुंतीच्या वास्तवाला प्रगल्भ प्रतिसाद देणारी आहे. विविध संदर्भात जगण्याला आलेल्या अवकळेचे विलक्षण अस्वस्थ करणारे दर्शन त्यातून घडते. जागतिकीकरण, शोषण, असमानता, असुरक्षितता यामागचे अंत:प्रवाह शोधण्यावर भर असल्यामुळे ही कविता केवळ वर्तमानाशी जखडलेली नाही. आशयाशी एकजीव होणारी प्रतिमासृष्टी आणि अत्यंत प्रभावी भाषाशैली या गुणवैशिष्ट्यांमुळे कोठावळे पारितोषिकासाठी निवड केल्याचे प्रा. मीना गोखले, सुबोध जावडेकर आणि डॉ. मीना वैशंपायन यांच्या निवड समितीने म्हटले आहे.

*** स्नेहवर्धन प्रकाशनातर्फे ग्रंथश्रेष्ठता पुरस्कार**

स्नेहवर्धन प्रकाशनातर्फे दरवर्षी दिले जाणारे ग्रंथश्रेष्ठता पुरस्कार यावर्षी पुढील मान्यवरांना जाहीर झालेले आहेत.

१) डॉ. प्र. न. जोशी संतमित्र पुरस्कार - प्रा. मा.ना. आचार्य (ध्वनितांचे केणें, पद्मगंधा प्रकाशन
२) डॉ. प्र. न. जोशी विज्ञानमित्र पुरस्कार - डॉ. श्याम टिळक (वायुजीवशास्त्र ते जैविक अंतराळ विज्ञान, मधुश्री प्रकाशन)
३) डॉ. वि. भि. कोलते समीक्षामित्र पुरस्कार - डॉ. विजया राजाध्यक्ष (शोध मर्ढेकरांचा, मौज प्रकाशन)
४) संजीवनी मराठे साहित्यसखी पुरस्कार - सौ. स्वाती शिंदे - पवार (वाटेवरती काचा ग, सायन पब्लिकेशन्स प्रा. लि.)
५) ग. ल. ठोकळ ग्रामीण साहित्यमित्र पुरस्कार - डॉ. आनंद यादव (सुप्रसिद्ध ग्रामीण साहित्यिक)
६) निर्मला गोपाळ किराणे प्रकाशकमित्र पुरस्कार - सौ. सुप्रिया शरद मराठे (नवचैतन्य प्रकाशन, मुंबई)
७) डॉ. पंजाबराव जाधव समाजमित्र पुरस्कार - ॲड. रावसाहेब शिंदे (अध्यक्ष, रयत शिक्षण संस्था, सातारा)

पुरस्काराचे स्वरूप रोख रुपये ३०००, स्मृतिचिन्ह आणि पुष्पगुच्छ असे आहे.

❐

# वाचकांचा प्रतिसाद



श्री. सुनील मेहता

**'मेहता मराठी ग्रंथजगत'** चे अंक म्हणजे एक मेजवानीच असते. हा अंक केवळ आपल्या प्रकाशनाची जाहिरात म्हणून वापरला जात नाही त्यातील 'साहित्यवार्ता' हे सदर संपूर्ण महाराष्ट्रातील साहित्यजगतातील घडामोडी सादर करते.

नवनवीन पुस्तकांचा परिचय आपल्या अंकातून होतो व ती पुस्तक खरेदी करून संग्रही ठेवण्याची प्रेरणा मिळते.

इतर भाषांतील विचारप्रवाह, लेखकांचा कल, त्यातील वैचारिक धन मराठी वाचकांना देण्याचे थोर कार्य आपण अनुवादित पुस्तकांतून करीत आहात.

आजकाल असे दिसते की तरुण मुला-मुलींमध्ये वाचनाची आवड कमी झालेली आहे. दृक्‌श्राव्य माध्यमाने वाचनावर कुरघोडी केल्यासारखे दिसते. परंतु आजही वृत्तपत्रे वाचली जातात ही थोडी समाधानाची बाब आहे. म्हणूनच वृत्तपत्रांतून मोठ्या प्रमाणात पुस्तक परिचय येण्याची गरज आहे.

माझे वय ७५चे वर पोचले आहे. परंतु वाचनाचा उत्साह कायम आहे. माझ्या जवळची १५०० मराठी पुस्तके राजाराम सीताराम दीक्षित वाचनालयाला देणगी दिली आहेत. ४५० हिंदी पुस्तके हिंदी साहित्य संघाला दिली. आजही पुस्तक खरेदी चालूच आहे.

**द. शं. कोठेकर**

गोरेपेठ, नागपूर ४४००१०.

श्री. शाम भुर्के यांना नमस्कार

दि. ४ जानेवारी २०११ रोजी शहरातील पुस्तक प्रदर्शनास गेलो असता तेथे आपले **'मंत्र श्रीमंतीचा'** हे पुस्तक खरेदी केले, मला आपल्या पुस्तकातील मनोगत आणि कथा आवडली. माझ्या मनात व्यवसाय करण्याची इच्छा होती ती आणखीन तीव्र झाली.

आशा करतो की अशाच प्रकारची आपली मार्गदर्शक पुस्तके आपणाकडून मिळत राहतील.

**प्रवीण निलजकर**

०९९८०२३९८९४

मा. प्रकाशक

मी श्रीमती मंजुश्री गोखले यांचे **तुकयाची आवली** हे पुस्तक वाचले. तुकारामांची बायको म्हणजे कजाग, कर्कशा असे वाचलेले होते. ते मत ह्या पुस्तकामुळे एकदम बदलले. त्यात धरणीची आणि वटवृक्षाची मूळ बनून जमिनीत खोल खोल पसरत गेली ही उपमा आवलीला देऊन तिची महती पटवून दिली आहे. त्यामुळे बघण्याचा दृष्टिकोन बदलतो. शेवट मंदिरावर कळस चढवल्यासारखा आहे. पुस्तक खूप आवडले. ह्यातून विठ्ठल हा प्रत्यक्ष अवलीला भेटला असे वाटते व तुकारामांच्या बरोबरच तिची पण साधना होती हे लक्षात येते.

**गिरीश निसळ**
९९६०५७१२४२

श्री. शाम भुर्के,

सार्वजनिक वाचनालयामध्ये गेलो असताना तुम्ही लिहिलेले **'आनंदाचं पासबुक'** हे पुस्तक वाचले. खूपच सुंदर लिहिले आहे. रसिक व्यक्तिमत्त्व, लिखाणाचा छंद, कर्तृत्ववान अधिकारी आणि विद्यार्थी परिषदेचे कार्यकर्ते हा सर्व दुग्धशर्करा योग आहे. अतिशय मोजक्या व मार्मिक शब्दांत तुम्ही वाचकांना आनंद देण्याचा प्रयत्न केला आहे.

**नितिन जोगळेकर**
**९४२३५४०७४६**

❒

**वाचकमित्रहो,**

**आपल्या** अखंड प्रेमामुळे **'मेहता मराठी ग्रंथजगत'** हे वाङ्मयीन मासिक चांगलेच लोकप्रिय झाले आहे. या अंकातील 'वाचकांचा प्रतिसाद' या सदरासाठी आपण 'मेहता पब्लिशिंग हाऊस'च्या वाचलेल्या पुस्तकांविषयी प्रतिक्रिया जरुर कळवाव्या.

पत्ता : मेहता पब्लिशिंग हाऊस, द्वारा-मेहता मराठी ग्रंथजगत, १९४१, सदाशिव पेठ, बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३०.

# श्रद्धांजली

*** गुजराती मुद्रक-प्रकाशक जितेंद्र देसाई**

ख्यातनाम गुजराती प्रकाशक, लेखक, नवजीवन ट्रस्टचे कार्यकारी विश्वस्त, गुजरात प्रकाशक मंडळाचे अध्यक्ष जितेंद्र देसाई यांचे २१ मार्च २०११ रोजी दुःखद निधन झाले. ते ७३ वर्षांचे होते. ते कॉपीराइट कायद्याचे चांगले अभ्यासक होते. १९७१ मध्ये लंडनहून ग्रंथमुद्रणाचा डिप्लोमा घेऊन त्यांनी मुद्रणक्षेत्रात प्रवेश केला. अक्षरमुद्रा नावाचे मुद्रणविषयक मासिक त्यांनी सुरू केले. अखंड आनंद, लोकजीवन, कल्याणयात्रा, हरिवाणी वगैरे नियतकालिकांच्या संपादनात त्यांचा सहभाग होता. गांधी स्मारक संग्रहालय (साबरमती आश्रम), सरदार पटेल मेमोरियल सोसायटी, सस्तु साहित्यवर्धक कार्यालय, मोरारजी देसाई लोक केळवणी प्रतिष्ठान, सद्‌विचार प्रतिष्ठान वगैरे संस्थांशी त्यांचा संबंध होता. जुन्या मुद्रणयंत्रांचे एक संग्रहालय स्थापन करण्याचा त्यांचा संकल्प होता. गुजराती मुद्रण-प्रकाशन क्षेत्रातील एक विधायक कर्तृत्वशाली व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांचे स्मरण होत राहील.

*** मामासाहेब हतवळणे**

हिंद सेवा मंडळ, माध्यमिक शिक्षक संघ, नगर अर्बन बँक, रिमांड होम अशा अनेक संस्थांमध्ये मोठे योगदान असलेले सदाशिव विनायक उर्फ मामासाहेब हतवळणे यांचे २६ मार्च रोजी वृद्धापकाळाने पुण्यात निधन झाले.

गेल्या वर्षापासून मामासाहेबांचे वास्तव्य पुण्यात त्यांचे चिरंजीव डॉ. अरुण यांच्याकडे होते. मामासाहेबांचा शंभरावा वाढदिवस गेल्या २४ ऑक्टोबरला नगर येथील दादा चौधरी शाळेत मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला होता. मामासाहेब म्हणजे नगरच्या शिक्षणक्षेत्राचा चालता-बोलता इतिहास होता. ते उत्तम क्रिकेटपटू होते. टेनिसही खेळत. व्यायामाची, अभिनयाची त्यांना आवड होती. १९५४ मध्ये मामासाहेब दादा चौधरी विद्यालयाचे मुख्याध्यापक झाले. मामासाहेबांमुळे अनेक थोरामोठ्यांचे पाय या शाळेला, नगरला लागले. पंडित नेहरू, डॉ. झाकीर हुसेन, राज्यपाल श्रीप्रकाश, हरेकृष्ण मेहताब, विजय मर्चंट, काकासाहेब गाडगीळ, रँग्लर

परांजपे, सेतू माधवराव पगडी, दत्तो वामन पोतदार, स. गो. बर्वे, आचार्य अत्रे, नरहर कुरुंदकर आदींना त्यांनी आवर्जून संस्थेत बोलावले. स. चिं. वाळिंबे यांच्याबरोबर मामासाहेबांनी ११ पुस्तके लिहिली. अंकगणित, बीजगणित, भूमिती, नवगणित ही त्यांची पुस्तके अनेक वर्षे शाळांमध्ये शिकवली गेली. राज्य सरकारने १९६८ मध्ये पुरस्कार देऊन सन्मानित केले. आपले आजोबा शंकरराव हतवळणे यांनी लिहिलेल्या 'स्वचरित्रा'चे संपादन तसेच 'जीवनश्रद्धा' या आत्मचरित्राचे प्रकाशनही केले.

## * पटकथालेखक सचिन भौमिक

'आई मिलन की बेला', 'जानवर', 'लव्ह इन टोकियो', 'गोलमाल', 'हम किसिसे कम नही', 'क्रिश', 'किसना', 'कोई मिल गया' यांसारख्या ७० चित्रपटांचे पटकथालेखन करणारे सचिन भौमिक यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. ते ८२ वर्षांचे होते. त्यांच्यामागे पत्नी आणि दोन मुलगे आहेत.

१९५८ साली नर्गिस यांची प्रमुख भूमिका असलेल्या 'लाजवंती' या चित्रपटापासून त्यांच्या पटकथा लेखनाला सुरुवात झाली. त्यानंतर १९६०साली बलराज साहनी व लीला नायडू यांच्या अभिनयाने गाजलेल्या 'अनुराधा' चित्रपटाला त्यावर्षीचा सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा राष्ट्रीय पुरस्कार मिळाल्याने भौमिक कथा-पटकथा लेखक म्हणून प्रस्थापित झाले. १९६८ साली प्रदर्शित झालेल्या 'ब्रह्मचारी' या शम्मी कपूर-राजश्री अभिनीत चित्रपटासाठी त्यांना पटकथा लेखनाचा पुरस्कार मिळाला होता. भौमिक यांचे अनेक चित्रपट तिकिटबारीवर यशस्वी झाले.

## * ज्येष्ठ विनोदी लेखक वि. आ. बुवा

ज्येष्ठ विनोदी साहित्यिक विनायक आदिनाथ बुवा यांचे एका खाजगी रुग्णालयात निधन झाले. ते ८५ वर्षांचे होते. साहित्य परिवारात ते 'वि.आ.बुवा' या नावाने ओळखले जात.

वि.आ.बुवांचा जन्म पंढरपूर येथे ४ जुलै १९२६ रोजी झाला. त्यांचे शालेय शिक्षण पंढरपूर आणि मिरज येथे झाले. मुंबईतील व्ही.जे.टी.आय. तांत्रिक महाविद्यालयात त्यांनी १९८६ पर्यंत निवृत्त होईपर्यंत नोकरी केली. १९५० मध्ये त्यांनी आपल्या लेखनाला प्रारंभ केला. आत्तापर्यंत त्यांची विनोदी शैलीतील १५० पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. त्यांच्या घरातील ग्रंथभांडारात दीड हजार पुस्तके आहेत. 'संघर्ष टाळून संवाद साधणे' हे जीवनातील वाटचालीचे उद्दिष्ट ठेवून बुवा यांनी वाटचाल केली. 'जेव्हाच्या तेव्हा, जिथल्या तेथे, ज्याचे त्याला, स्वयं अनुशासन आणि संघर्ष विरहित सुसंवाद' या पंचसूत्रीचा आयुष्याच्या शेवटपर्यंत त्यांनी अवलंब केला. आपल्या कुटुंबियांना, सहवासातील मित्र परिवाराला याच वाटेवरून चालण्याचे धडे दिले. 'पुस्तके येथे घेऊन वाचा. घरी नेण्यास मिळणार नाहीत' ही बुवांच्या घरातील

ग्रंथभांडारातील पाटी त्यांच्या शिस्तीचे आणि काटेकोर जीवनाचे उदाहरण देते. भूगोल आणि व्याकरण या विषयांचा त्यांचा खूप व्यासंग होता. विविध प्रकारचे नकाशे त्यांनी जतन करून ठेवले आहेत. कितीही कठीण असलेला विषय साध्या-सोप्या नर्मविनोदी शैलीत मांडून त्या विषयाची व्याप्ती वाढविणे, रसिकांच्या गळ्यात तो विषय उतरविणे यात बुवांचा हातखंडा होता.

*** एलिझाबेथ टेलर**

आपल्या अलौकिक सौंदर्याने साऱ्या जगातील चित्रपट रसिकांना वेड लावणाऱ्या हॉलिवूड स्टार एलिझाबेथ टेलर यांचे २३ मार्च रोजी दीर्घ आजाराने निधन झाले. त्या ७९ वर्षांच्या होत्या. २००४ पासून त्या हृदयविकाराने आजारी होत्या.

एलिझाबेथ यांनी बालअभिनेत्री म्हणून चित्रपटात पदार्पण केले. १९५०-६० च्या दशकात त्यांची कारकीर्द बहरली. या काळात त्यांनी 'जायंट', 'कॅट ऑन ए हॉट टिन रुफ' आणि 'क्लिओपात्रा'सारखे अनेक हिट सिनेमे दिले. त्यापूर्वीचा 'नॅशनल वेलवेट' ही खूप गाजला. 'जेन आयर'मधील भूमिका अविस्मरणीय ठरली. 'बटरफिल्ड ८' आणि 'हू इज अफ्रेड ऑफ व्हर्जिनिया वूल्फ' या सिनेमांसाठी त्यांना ऑस्करने सन्मानित करण्यात आले. हॉलिवूडचा सर्वाधिक खर्चिक चित्रपट 'क्लिओपात्रा' अजरामर ठरला. उत्तमोत्तम सिनेमांप्रमाणेच त्या गाजल्या त्या त्यांच्या प्रेमप्रकरणांमुळे. त्यांच्या ९ विवाहांची रसभरीत वर्णन छापण्यात टॅब्लॉइडमध्ये स्पर्धा चालत असे. जगातील प्रसारमाध्यमांनी त्यांना 'सेक्स सिम्बल' ठरविले होते. अभिनेते रिचर्ड बर्टन यांच्याबरोबरची त्यांची जोडी आदर्श ठरली. रिचर्डबरोबर त्यांनी दोन वेळा लग्नगाठ बांधली.

*** बॉब क्रिस्टो**

बॉलिवूडमधील प्रसिद्ध अभिनेते बॉब क्रिस्टो (वय ७०) यांचे २१ मार्च रोजी बेंगळूर येथे निधन झाले. क्रिस्टो मूळचे ऑस्ट्रेलियाचे नागरिक होते. संजय खान यांच्या 'अब्दुल्ला' या चित्रपटात त्यांना प्रथम संधी मिळाली. ते सिव्हिल इंजिनिअर होते. त्यांनी कालिया, मर्द, नास्तिक, कुर्बानी, मि. इंडिया, रूप की रानी - चोरोंका राजा, गुमराह आदी चित्रपटांतून खलनायक साकारला. त्यांचे आत्मचरित्र 'फ्लॅशबॅक : माय टाइम्स इन बॉलिवूड अँड बियाँड'चे जूनमध्ये अक्षयकुमारच्या हस्ते प्रकाशित होणार आहे.

❐

# बालनगरी

## सुट्टीचे दिवस

मे महिन्याची सुट्टी पडली की आमचा मुक्काम टिंघरीला असायचा. डोंबिवली मालेगाव बसने निघायचे. मालेगाव ते टिंघरी हा वीसबावीस किलोमीटरचा रस्ता मात्र गोट्यांनी आणि खड्ड्यांनी खचाखच भरलेला असे. आजूबाजूचं उजाड माळरान, त्याच्यावर उगवलेली बोरी-बाभळी, खुरटी रोपं अन् रणरणतं ऊन. आपल्याबरोबर प्रचंड धुराळा उडवत बस निघायची आणि एखादं खेडं आलं की मागचं-पुढचं काही न बघता अचानक गपकन थांबून जायची.

टिंघरीला उतरलं की सामान नोकराकडे देऊन घराकडे धूम ठोकायची.

मी मागच्या दाराने आणि भाऊ पुढच्या दाराने एकदम आत घुसायचो.

टिंघरीचं घर प्रचंड मोठे असल्याने पुढच्या अंगणात, पडवीत बसलेले काका गावडे ओरडत यायचे. ''अरे, पाहुणे आले, पाहुणे आले!''

मागच्या अंगणात निवड किंवा झाडझूड करत असलेल्या माझ्या काकवा मला कवटाळून पुढच्या दिवाणखान्यात सांगायला धावायच्या, ''मंडळी आली बरं का!'' आणि एकच गोंधळ उडायचा. सगळीकडे आनंद फसफसायचा.



आम्ही चुलत, आत्ये भावंडे मिळून २०-२५ च्या घरात.

दिवाळी आणि मे महिना म्हणजे प्रत्येकाचा टिंघरी हा हक्काचा डेरा! त्यामुळे घरात लहान दहाबारा मुले सापडायची.

आम्हाला घरी कधी चहा मिळायचा नाही. नेहमी दूध! काळी होशील ही धाक असायचा, पण डोळा मात्र चहावर असे. मला तर चहा प्राणप्रिय, कदाचित तो मिळत नव्हता म्हणून जरा जास्तच लाडका! टिंघरीला गेलं की एखादी काकू विचारायची, "पोरं दूध घेणार ना?" आम्ही दोघेही एकमुखाने आईकडे न बघता, ओरडायचो "नाही. चहा!"

आजोबा पूर्वीचे वतनदार तर काका सरपंच. घरात लोकांची सतत वर्दळ. दोघांचाही लोकसंग्रह फार.

पांढरंस्वच्छ धोतर आणि अंगात खिशांची बंडी घातलेले आजोबा मधल्या दिवाणखान्यात जाजम टाकून तक्याला टेकून बसलेले असायचे. हातात नेहमी जपमाळ. बाजला पानाचा पितळेचा चकाकता डबा.

आजोबांच्या पायाला हात लावून लोकं नमस्कार करायची. त्यांची काय काय विषयावर बोलणी चालायची ते काय समजायचं नाही. आम्हीही एका ठिकाणी टिकायचो नाही.

आजोबा अडचणीत अडकलेल्या लोकांना हरप्रकारे मदत करत. लोक त्यांना सल्ला विचारायला येत. आलेल्यांना किमान चहा-पाणी विचारलं पाहिजे हा घराचा दंडक असल्याने चुलीवर चहा उकळत असायचा. घरातील एखादी बाई चहा करण्याच्या कामात अडकलेली असायची.

लोकांचा एक ग्रुप उठून गेल्यावर दुसरा ग्रुप येऊन बसे. कामाचं झाल्यानंतर रिकाम्या चौकश्या करत लोकं आरामात बसून राहात. आमची पळापळ चालूच असे.

''पोराहो SS बाहेर निघा.'' असे एखादे वेळी आजोबा म्हणत. पण आजोबांचं बोलणं फार गंभीरपणे घ्यायचं कारण नाही असं आम्हाला वाटायचं. ते आम्हाला आमच्यातले वाटायचे. ते कुणाला रागावल्याचं स्मरणात नाही.

एखादं पोरगं अचानकपणे आजोबांच्या पाठगुळी जाऊन लटकायचं. त्यांच्या डोक्यावरची गांधी टोपी आपल्या डोक्यावर ठेवायचं.

आमची मस्ती चालायची पण आम्ही मुली अनुभवाने शहाण्या झाल्या होतो. खेळायचं पण स्वयंपाकघराच्या, जेवणाच्या खोलीच्या आसपास जायचं नाही. गेलं तर आई,

आजी, काकू आम्हाला पकडत आणि ''जा पटकन. चहाचा ट्रे नेऊन दे जा बाहेर.'' असं म्हणून कामाला लावत. रिकामा ट्रे घरात आणून ठेवला तर दुसरा ट्रे तयार असे. मग त्यातून सुटका होणं कठीण होऊन जाई. त्यापेक्षा आपल्यावर राज्य आलेलं परवडलं!

घरातली माणसांची गर्दी ओसरली की आम्ही लपाछपी खेळायचो. घरात लपण्याच्या जागा इतक्या होत्या की विचारता सोय नाही. कुणी धान्याच्या खोलीत पोत्यांच्या मागे; तर कुणी दिवाणखान्यातच पाचसहा फूट उंच आरशाच्या मागे. कुणी अडगळीच्या खोलीत तर कुणी मागच्या अंगणातल्या लाकूडफाटाच्या ढिगामागे. कुणी आडाच्या कोनाड्यात म्हणजे न्हाणीघरात लपायचे.

सगळ्यांच्या आपापल्या खास आवडीच्या जागा होत्या.

आपली जागा कुणाला कळू नये, दुसऱ्याची खुफीया जागा मात्र कळावी ह्यासाठी आमची धडपड चालायची. राज्य घेणाऱ्याच्या पाठीवरच धप्पा करायचा म्हणजे त्यालाच परत राज्य घ्यावे लागे. त्यासाठी  काहीतरी व्यूहरचनाही आम्ही करत असू.

एक दिवस असंच लपाछुपी खेळताना माझ्या लहान अत्तेबहिणीवर राज्य होतं. खूप वेळ झाला तरी तिला कुणी सापडेचना. शेवटी ती कंटाळून गेली.

न्हाणीघरातच पाण्याने भरलेला आड (विहीर) होता. रहाटावरच्या दोरीला एक बादली बांधलेली असे. ती तिनं आडात सोडून दिली. मोठा आवाज झाला.

त्याबरोबर ती ओरडायला लागली, ''आडात पडले, पडले.

धावा. धावा.''

त्याबरोबर लपलेले, बिनलपलेले सगळे न्हाणीघराकडे धावले. जोरजोरात दार वाजवू लागले.

तिने आतून दार लावलेलं होतं. त्यामुळे पटकन कुणाला आतही जाता येत नव्हते. सगळेच घाबरून गेले.

इकडे ही मात्र दार आणि भिंत याच्या फटीतून सगळी मजा बघत होती. ''अभिदादा नंबर १, मकरंद नंबर २, क्षमा नंबर ३'' असा पुकारा करू लागली.

तिने दार उघडल्यावर अनेकांच्या हाताचा प्रसाद तिला मिळाला. बायकांच्या तोंडचे पट्टे ऐकून घ्यायला लागले. एवढं रागावण्यासारखं काय झालं हेच तिला समजत नव्हते, पण आम्ही पोरं मात्र तिच्या हुषारीवर एकदम खूष होऊन गेलो.

आमची आजी दिसायला सुंदर आणि स्वभावाने प्रेमळ होती. गोरी, सतेज आणि सडसडीत उंच होती. कुठल्याही रंगाचं लुगडं तिला शोभून दिसे. तिच्या कानात नेहमी कुडी असे. वेणी घालून मानेच्या वर केसांचा अंबाडा घातलेला असे. कपाळावर ठसठशीत लाल कुंकू.

खांबाला दोरी बांधून मातीच्या प्रचंड रांजणात ताक घुसळत बसायची तेव्हा तर ती मला 'माय यशोदाच' वाटायची. त्या प्रचंड ताकाच्या पांढऱ्या समुद्रावर हळूहळू लोण्याचे हिमनग तरंगायला लागायचे. हे हिमनग आजी अलगद दुसऱ्या भांड्यात काढायची. ओठावर ओव्या, गाणी, श्लोक असायचे.

आमचं लक्ष मात्र तेव्हा लोणी आणि ताकावर असायचं.

''जा रे, वाट्या घेऊन या.'' असं म्हटल्याबरोबर आम्ही ताकासाठी मोठे ग्लास आणि लोण्यासाठी चमचा घेऊन यायचो. आमचं आधी ताक मग लोणी, मग आधी लोणी मग ताक असं चाललेलं असायचं.

आमची आजी फक्त दुसरीपर्यंत शिकलेली होती. तरी भगवद्‌गीता, ज्ञानेश्वरी यांची पारायणं चाललेली असायची. बोलण्यामध्ये एखादा श्लोक नाहीतर एखादी ओवी असायची.

आजोबा उत्तम प्रवचनकार होते. लांबलांबून आजोबांना प्रवचनासाठी, सप्ताहासाठी बोलावणी असत. आजोबा सकाळी आम्हाला उठवायला येत. त्याच्या धीरगंभीर आवाजात भूपाळी गात.

*उठी गोपाळजी उठ पुरुषोत्तमा,*
*जा धेनूकडे, वाट पाहे रमा,*
*पाहती सोंगडे दावी मुखचंद्रमा,*
*वाट तुझी सकळीका ।।*

आजी गोष्टीवेल्हाळ होती. राम, कृष्ण, पुराणातल्या राजाराणी यांच्या गोष्टींचा तिच्याकडे प्रचंड साठा होता. रात्रीचं जेवणं खेड्यामध्ये तसंही फार लवकर व्हायचं. लाईट नव्हते. दुसरं काही करमणुकीचं साधन नसायचं. साडेसातला जेवणं चाललेली असतानाच गडी पुढच्या अंगणात अंथरूण घालायचा. छान चौकोनी गाद्या.

रात्रीचं सर्व एकदम शांत होऊन जाई. नीरव शांतता. पण शांततेलाही एक प्रकारचा आवाज असतो. 'कुईऽऽ' असा. अन् तो कानात खूप खुपतो. आम्ही पोरं अंथरुणात फार फार मस्ती करायचो, आरडाओरडा करायचो.'मस्ती

करू नका' असं आम्हाला म्हणणारी मंडळी जेवणात गर्क असायची. आम्ही ऐकणाऱ्यातले नव्हतोच.

फार झालं की मोठा काका हातात काठी घेऊन आम्हाला धाक दाखवायचा.

मग कुणी काका, कुणी मामा, कुणी बाबा म्हणून हाताला धरून त्यालाच मस्तीत ओढून घ्यायचं. आमच्या नकला, कोडी, भेंड्यांमध्ये अजून एका मेंबरची भर पडायची. आमच्या कोवळया हसण्याच्या आवाजाला एक गडगडाटी हसण्याची साथ मिळायची. सगळं मजेशीर वाटायचं. त्यांच्याबद्दलच्या रागाने आमच्यात त्वेष निर्माण झाला. पहिल्यांदा छोटीशी धक्काबुक्की सुरू झाली आणि शेवट एकमेकींच्या वेण्या ओढण्यात झाला.

आमची मस्ती मात्र आजी येई पर्यंतच चाले. कारण आजी जेवून आली की आम्ही नातवंडं तिच्यामागे 'आजी गोष्ट, आजी गोष्ट' म्हणून लागत असू. आजी लोळली की तिला चिकटून झोपायची ज्याची त्याची धडपड असे. तिच्या पदराला टिंघरीच्या मातीचा, दिवसभराच्या चुलीतल्या धुराचा, शेतातल्या झाडांचा अन् तिचा स्वतःचा प्रेमाचा, वात्सल्याचा असा सगळयाचा मिळून एक सुंदर वास असायचा. तो वास तर आम्हा सगळयाच नातंवंडांना परिचित आहे. आत्तासुद्धा कधीकधी स्वप्नात मला हा वास स्पष्ट जाणवतो. अगदी नाकाजवळून गेल्यासारखा!

तर आजी आम्हाला रोज छान छान गोष्टी सांगायची. खूप रंगवून सांगायची. आम्हाला बोट धरून गोष्टीत घेऊन जायची. कधी सीतास्वयंवर, कधी कृष्णलीला तर कधी

समुद्रमंथन. आम्ही त्या गोष्टींमध्ये एवढे समरसून जायचो की आपोआप रागाने आमच्या मुठी आवळल्या जायच्या. दुःखाने डोळयात पाणी यायचं. तर कधी कुणाच्या विदुषकी करामतीने गदगदून हसायचो.

एकदा तर कैकेयी आणि मंथरेच्या कटकारस्थानांमुळे माझ्यात अन् माझ्या चुलत बहिणीत चांगलीच जुंपली.

मंथरेला एक सणसणीत लगावून द्यावी म्हणून तिने फिरवलेला हात माझ्या पोटात लागला. त्यासरशी कैकयीच्या कोत्या वृत्तीचं फलीत म्हणून एक ठोसा बहिणीच्या पाठीत बसला.

कुणालाच कारण काही समजेना, गोष्ट चांगली रंगात आली असताना यांच्या मारामाऱ्या का सुरू झाल्या ते!

आम्हाला कारण विचारल्यावर आम्हालाही कारण काही सांगता येईना. शेवटी अयोध्येत शिजलेल्या कटकारस्थानांचे पडसाद देशपांडे परिवाराला इतक्या वर्षानंतर इतक्या तीव्रतेने भागावे लागतील हे कुणाला खरे वाटले नसते. त्या रात्रीपुरती का होईना, कैकेयी अन् मंथरा या द्वयीने आम्हा दोघा बहिणीत दुही निर्माण केली हे मात्र सत्य आहे!

आजीला स्वतःला कृष्णजन्माची गोष्ट सांगायला फार आवडायची! तिच्या तोंडून आम्ही ही गोष्ट अक्षरशः अगणित वेळा ऐकली आहे. पण तीच गोष्ट ती प्रत्येक वेळेला वेगवेगळया पद्धतीने सांगायची अन् ऐकणारा त्यात अडकून पडायचा. हे तिचं वाक्चातुर्य होतं असं म्हणायला पाहिजे.

आज जेव्हा आम्ही आमच्या मुलांना गोष्टी सांगत असतो तेव्हा जाणवतं की आपणही आजीची नक्कल करतोय.

आजीसारखा गोष्टी सांगायचा प्रयत्न करतोय. पण तो आपोआपच होतोय. मारून मुटकून काही नाही.

शेवटी गोष्टीत काय किंवा जीवनात काय, रंग भरणं महत्त्वाचं! जो तो आपापल्या परीने आपापल्या कुवतीने रंग भरत असतं. कुणाला गडद रंग आवडतात तर कुणाला हलके, फिक्के. रंग भरून चित्र पूर्ण झाल्याशी कारण.

आमच्या लहानपणी आमच्याही नकळत आजी-आजोबांच्या कृतीतून, मोठ्यांच्या वागणुकीतून, आजूबाजूच्या परिस्थितीमुळे आमच्या तरल मनाच्या कॅनव्हासवर काही सुंदर चित्रं रेखाटली गेली. ती जशीच्या तशी मी आठवणीच्या कुपीत बंद करून ठेवली आहेत.

**अनघा तांबोळी,**
anagha.tamboli@rediffmaill.com
०९८८६६७४०२९, ०९८८६००२१६४





# हॅरी पॉटर मालिका

**मराठीत प्रसिद्ध झालेली पुस्तके**




**हॅरी पॉटर**

मुळ लेखक
**जे. के. रोलिंग**

**आणि फिनिक्ससेना**

**।अनुवाद - मंजूषा आमडेकर।**

**किंमत ४९५रु. पोस्टेज ४०रु.**




**हॅरी पॉटर**

मुळ लेखक
**जे. के. रोलिंग**

**आणि हाफ ब्लड प्रिन्स**

**।अनुवाद - मंजूषा आमडेकर।**

**किंमत ३७५रु. पोस्टेज ३०रु.**

| **पुस्तकाचे नाव** | **अनुवाद** | **किंमत** |
|---|---|---|
| हॅरी पॉटर आणि परीस | बाळ उर्ध्वरेषे | १९५ |
| हॅरी पॉटर आणि रहस्यमय तळघर | मंजूषा आमडेकर | १९५ |
| हॅरी पॉटर आणि अझ्कबानचा कैदी | प्रियंका कुलकर्णी | १९५ |
| हॅरी पॉटर आणि अग्निचषक | मंजूषा आमडेकर | ३२५ |

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**

# ओळखा पाहू



सुप्रसिद्ध विनोदी लेखक

विजेत्यास रु. १०१ चे रोख पारितोषिक दिले जाईल.

आपली उत्तरे दिनांक १५जून २०११ पर्यंत आम्हाला मिळायला हवीत. बरोबर उत्तरे देणाऱ्यांपैकी एकाची ड्रॉ पद्धतीने निवड करण्यात येईल. निकाल जुलै २०११च्या अंकात जाहीर होईल.

'मार्च' अंकातील 'ओळखा पाहू'चे उत्तर

८०व्या वर्षात पदार्पण केलेल्या प्रख्यात गायिका - किशोरी आमोणकर

स्पर्धेचे विजेते - **मोहन पोतदार, अकोला**

स्नेहल फणसे, रमेश थेटे, रा.द.ढुमणे, शि.वा.आठवले, रमेश गटकळ, सुमंगला गोखले हर्षद रत्नपारखी - पुणे, मीरा साळुंखे, लक्ष्मण खंडकर, सविता सबनीस - कोल्हापूर, नारायण गोडबोले, जी.विनायक, साधना शिंदे, सुरेश पिटकर - मुंबई, वामन काटीकर - सांगली, व्ही.वाय.राजवाडकर - रत्नागिरी, चंद्रकांत अंबाडे - भुसावळ, जी.डी.देशमुख, मृणालिनी कोटूर - कर्नाटक, डॉ. सुशीला पाटील, वैशाली कुऱ्हेकर, उषा कंठे, गिरीजा कंठे, आशिष पचलोड - अमरावती, अर्चित असनारे, वंदना घाटे - अकोला, नदीम देशमुख - बुलढाणा, राघव चोपकर - नागपूर, भीमराव गुंडे - सोलापूर, जगन्नाथ दुर्गुळे - सांगली

**प्रायोजक**

**श्री.राजू जगदीशचंद्र मेहता, मे. हिराचंद नानचंद अँड कंपनी,**
साडी आडतीचे व लुंगीचे होलसेल व्यापारी
टिळक चौक, मालेगाव, **जि.नाशिक.**

**सूचना** - प्रायोजकांच्या पत्त्यावर उत्तरे पाठवू नका.

**उत्तरे पाठविण्याचा पत्ता :**

**मेहता पब्लिशिंग हाऊस,** मेहता मराठी ग्रंथजगत विभाग, १९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, पुणे टेलिफोन भवनसमोर, पुणे-४११ ०३०.

# मेहता मराठी ग्रंथजगत

**एप्रिल २००९ पासून वर्गणीदारांसाठी पुस्तक खरेदीवर सवलत**

**एक वर्षाला २०%  तीन वर्षांना २५%  पाच वर्षांना ३०%**

**एक वर्षाची** **वर्गणी १५०रु.**

**तीन वर्षाची** **वर्गणी ३५०रु.**

**पाच वर्षांची** **वर्गणी ५००रु.**

**तीन किंवा पाच**
**वर्षांसाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट**

३ वर्षांची वर्गणी पाठवल्यास
**'चतुर बोकोबा' आणि 'नशीबवान शेखर'**
लेखिका : वृषाली पटवर्धन
प्रत्येकी ३० रु. ची
पुस्तके भेट!
पोस्टेज २०रु.

५ वर्षांची वर्गणी पाठवल्यास
**'शिवणकला-एक छंद'**
(सलवार कमीज । स्कर्ट-ब्लाऊज
इव्हिनिंग गाऊन्स । मिडी)
लेखिका : हेमा कळके
हे ८० रु. चे
पुस्तक भेट!
पोस्टेज २०रु.




**भेट पुस्तके प्रती शिल्लक असेपर्यंतच**

**मेहता मराठी ग्रंथजगत,** द्वारा मेहता पब्लिशिंग हाऊस,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे ४११ ०३०. फोन - (०२०) २४४७६९२४

**वर्गणी मनीऑर्डर अथवा डिमांड ड्राफ्टने वरील पत्त्यावर पाठवावी.**

RNI NO-MAHMAR/2000/2739 Licence to post WITHOUT PREPAYMENT/
Regd.No.:L2/RNP/PNW/M/184/09-2011/ L.NO.LWP-50/Posted at Marketyard Pso, Pune
Posting Date 11 May 2011


# खास सुट्टीसाठी रंगीत चित्रमय छान छान गोष्टी













किंमत प्रत्येकी ५०रु.
पोस्टेज ३०रु. एकत्रित




* T बुक क्लब व मेहता मराठी ग्रंथजगत मेंबर्सना सवलत

## मेहता पब्लिशिंग हाऊस

१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे – ३०. फोन – (०२०) २४४७६९२४


प्रति, ______________________________

______________________________

______________________________

______________________________

संपादक, मुद्रक, प्रकाशक : सुनील अनिल मेहता यांनी हे मासिक १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
पुणे ४११ ०३० येथून प्रसिद्ध केले. मुद्रण स्थळ : जय गणेश ऑफसेट, ३५६, अ गणेश पेठ, पुणे २.